
# लोकराज्य



# निवडणूक जणू स्वयंवर

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने ग्रामगीतेतील अभंगातून अत्यंत मूलभूत असे चिंतन केले आहे. ते आजही अतिशय संयुक्तिक ठरते..**

जीवनाची जबाबदारी । किती आहे निवडणुकीवरि ।
हे पटवोनि निवडणूक खरी । करवावी न गोंधळता
विचार केलिया हळूहळू । आपैसाचि मार्ग ये कळू ।
निवडणुकीचे तत्व जाता आकळू । मिटेल गोंधळ सहजचि
अहो ! पुढारीपण कशाला ? सेवा गावाची करावयाला ।
मग सेवेची कसोटी लावा की आपुला । समजेल पुढारी कोण तो
कोण गावासाठी झटे । कोण उठतो रोज पहाटे ।
घेऊनि हातामाजी खराटे । झाडतो कोण ?
साध्या राहणीने दिवसभरी । कोण गरीबाचे काम करी ?
कोण पायी फिरोन करी वारी । गावाची आमुच्या ?
कोण नीतीने असे चांगला ? । पक्षपात न आवडे कोणाला ? ।
छदामासि नसे लाजीम झाला । गाव-निधीच्या ।।
कोण सर्वांचे पाहतो सुख, दुःख ।
कोणाचे दिसे सेवेसाठी मुख ।
हीच त्याची जाणावी ओळख । निवडावया ।।
किंवा सकळांना सांगा काम ।
सोडा हुकूम आपुला बेफाम ।
कोण पहा न करिता आराम । काम करी गावाचे ।।
मग तोचि म्हणावा पुढारी ।
आंधळाहि त्याची निवड करी ।
येथे कासयास ही टिमकी भरजरी ।
जाहिरातींची ? ।।
गावचा जो प्रत्येक घटक ।
त्यासि ठाऊक असावा माणूस एकेक ।
कोण चुकार, कोण सेवक । चालक कोण ? ।।
कोण गावाची सेवा करतो ? । कोण प्रतिष्ठेसाठी मिरवितो ? ।
सांगावा प्रसंग येता स्पष्ट तो । गावामाजी ।।
तेथे नसावी लाज, शरम । त्याने बिघडेल गावाचे काम ।
म्हणोनि सर्वांनी द्यावे त्याचेच नाम । न गोंधळता ।।
ज्यासि गावाचा जिव्हाळा । जो कार्यज्ञानाचा पुतळा ।
तोचि सुखी करील गाव सगळा । निवडोनि देता ।।
ऐसे न करता भांडणे माजती । गावाची होईल अनावर स्थिति ।
मग फावेल स्वार्थी जनांप्रति । सज्जन राहती वेगळेचि ।।
यासाठी उत्तम गुणी निवडावा । ज्याची सर्व करिती वाहवा ।
गावाचा बागडोर त्यासि द्यावा । आपुला पुढारी म्हणोनिया ।।
नाहितरि गावचे महणविती पुढारी । दात बसला सवाई-दिढीवरी ।
आपण होऊनि वाघापरी । गाव मारिती उपवासी ।।
काही लोक भाषणे करिती । बोलूनि पक्षभेद पाडिती ।
जुळल्यांची तोडूनि मति । भरती करिती झगड्यांची ।।
ऐसा नकोच पुढारी । ज्याने नाही केली कर्तबगारी ।
तो मित्र नव्हे, वैरी । समजतो आम्ही ।।
ज्याने केले असेल उन्नत ग्राम । अथवा समुदायाचे आदर्श काम ।
तोचि बोलण्याचा अधिकारी उत्तम । समजतो आम्ही ।।
एरव्ही पैशाचे मिळाले तीन । देती भराभरा भाषण ।
न बसावे कोणाचेहि मन । तयावरि ।।
ऐसे पुढारीपण जेथे दिसे । गावाने लावूनि न घ्यावे पिसे ।
जो इमानदार सेवक असे । तोचि समजावा गावधनी ।।
बोलणे एक चालणे एक । लपविणे एक, दाखविणे एक ।
हे गावासि होईल घातक । समजावे श्रोती ।
ऐसे न करावे वर्तन । असतील जे इमानदार सेवकजन ।
तेचि द्यावेत निवडोन । एकमते सर्वांनी ।।
सर्वास असावी चिंता समाजी ।
कोण आहे लायक जनांमाजी ।
कोण घेई गावाची काळजी । सर्वकाळ ।।
तोचि करावा पुढारी ।
एरव्ही पडो नये कुणाच्याहि आहारी ।
धन वेचतो म्हणोनि गावाधिकारी ।
करु नये कोणासि ।।
पुढारीपण सेवेनेच मिळे । हेच बोलावे मिळोनि सगळे ।
तेथे पक्षबाजीचे चाळे । वाढोचि न द्यावे ।।
नाती, गोती, पक्ष-पंथ । जातपात, गरीब-श्रीमंत ।
देवधेव, भीडमुर्वत । यासाठी मत देऊचि नये ।।
भवितव्य गाव अथवा राष्ट्राचे ।
आपुल्या मतावरीच साचे ।
एकेक मत लाख मोलाचे ।
ओळखावे याचे महिमान ।।
मत हे दुधारी तलवार । उपयोग न केला बरोबर ।
तरि आपलाचि उलटतो वार ।
आपणावर शेवटी ।।
दुर्जन होतील शिरजोर । आपुल्या मताचा मिळता आधार ।
सर्व गावास करितील जर्जर । न देता सत्पात्री मतदान ।।
मतदान नव्हे करमणूक । निवडणूक नव्हे बाजार-चुणूक ।
निवडणूक जणू स्वयंवर । ज्या हाती देणे जीवनाचे बागडोर ।
त्यासि लावावी कसोटी सुंदर । सावधपणे ।।
फोड चोखाया लावोनि जैसे । शिष्य निवडिले रामदासे ।
मृत्यूच्या कसोटीवर पाहणे तैसे । गुरु गोविंदसिंहाचे ।।
गडी पळावयासि लागले । कोण थकले, कोण बाद झाले ।
कोणाचे नंबर पुढे आले । सहजचि कळे या रीती ।।
तैसेचि आहे निवडणुकीचे । कामचि पाहावे सगळ्यांनी त्याचे ।
ज्याचे काम अधिक मोलाचे । तोचि निवडावा मुख्य ऐसा ।।



**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**




६ – १४


| | |
|---|---|
| बिगुल वाजला... | ६ |
| मतदार व्हा... मतदान करा! | १२ |
| निवडणुकीसाठीचे आरक्षण... | १४ |
| परिवर्तनाचे साधन | १६ |
| दीपोत्सव | १८ |
| फटाके: जरा सांभाळून... | २१ |
| समृद्धीच्या स्मार्ट दिशा | २२ |
| समृद्ध भाषा, रुचकर भोजन | २४ |
| सायबर फसवणुकीपासून सावधान | २७ |
| दिवाळीतील किल्ले | २८ |
| महाराष्ट्र माझा छायाचित्र स्पर्धा २०१६ | ३० |
| नयनरम्य गौताळा... | ३२ |
| किनारीदुर्ग आणि जलदुर्ग | ३४ |
| प्रभावी 'गुगलिंग'साठी! | ३६ |
| नागपूरचा कांदा परदेशात | ३८ |
| प्रयोगातून समृद्धीकडे | ४० |
| महाराष्ट्राबाहेरील 'महा'राष्ट्र | ४२ |
| प्रबोधनाची रात्र | ४५ |
| परसबाग फुलली... | ४६ |
| लोकसेवेची स्वयंप्रेरणा... | ४८ |
| गाव हेची तीर्थ | ५० |
| राखण रान | ५२ |
| संसदीय गुरुकुल | ५४ |
| सर्वत्र 'लोकराज्य' | ५६ |
| पत्रे | ५८ |


## परिवर्तनाचे साधन



स्वतंत्र भारताची राज्यघटना म्हणजेच संविधान २६ नोव्हेंबर १९४९ पासून या देशाला अर्पण करण्यात आले. त्यामुळे हा दिवस देशभर 'संविधान दिवस' म्हणून साजरा केला जातो.

१६

## समृद्धीच्या स्मार्ट दिशा



गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून बचत हा उत्तम पर्याय नसला तरीही तत्काळ उपलब्धता आणि सुरक्षितता या दोन महत्त्वाच्या निकषांवर बचतीचे पारडे कायम जड राहिले आहे. आपली गुंतवणूक चलनवाढीवर मात करू शकते का हे तपासणे महत्त्वाचे.

२२


## समृद्ध भाषा, रुचकर भोजन



खाणं आणि बोलणं या दोन कामासाठी माणसाच्या तोंडाचा उपयोग होत असतो. आपण जे अन्न खातो त्याचा कस आपल्या रक्तात उतरतो. रक्तातून स्वभावात उतरतो आणि स्वभाव दिसतो तो शब्दशैलीतून.

२४

## नयनरम्य गौताळा...



औरंगाबादपासून ७५ कि.मी अंतरावर असलेले गौताळा अभयारण्य निसर्गसहलीसाठी आवर्जून भेट द्यावे असे ठिकाण आहे. डोंगरदऱ्यांच्या कपारातून वाट काढत, उंचावरून कोसळणारे धबधबे, उंचचउंच डोंगर डोळ्याचे पारणे फेडतात.

३२

## दीपोत्सव



भारतीय सण- उत्सवांचा मूळ उद्देश शरीराचे आणि मनाचे आरोग्य चांगले राखणे हा आहे. ऋतूप्रमाणे आहार घेतला तर शरीराचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. सणांचा आनंद घेताना माणसे दु:ख, चिंता विसरून जातात.

१८

## फटाके: जरा सांभाळून...



पर्यावरणस्नेही दिवाळी करण्यासाठी शेकडो पर्याय उपलब्ध आहेत. ही दिवाळी साजरी करताना पर्यावरणाचे भान सहज राखले जाऊ शकते.

२१

## राखण रान



जंगलातील नैसर्गिक संपदेचे जतन होण्यासाठी, कळसुबाई, हरिश्चंद्रगड परिसरातील परंपरागत पशुपालक आदिवासी जमातीमार्फत प्रयत्न केले जातात. खास गुरांच्या चाऱ्यासाठी असलेल्या 'राखण राना'ची पिढ्यान्‌पिढ्या निगुतीने देखभाल करतात.

५२

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

## संपादन

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | ब्रिजेश सिंह |
| प्रबंध संपादक | अजय अंबेकर |
| संपादक | सुरेश वांदिले |
| कार्यकारी संपादक | प्रवीण टाके |
| विशेष साहाय्य | सुनंदा भोर |
| उपसंपादक | राजाराम देवकर<br>गजानन पाटील |

## प्रशासन

| | |
|---|---|
| प्रशासन व वितरण अधिकारी | दिगंबर पालवे |
| वितरण | अश्विनी पुजारी |
| साहाय्य | आमिर संग्रार |

## मांडणी

| | |
|---|---|
| मुखपृष्ठ | सीमा रनाळकर |
| मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| मुद्रण | प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई. |

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

फॉलो करा...www.twitter.com/MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com/dgipr

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण – ०२२–२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

# शुभ वर्तमान

## सातारा सैनिक शाळेत प्रवेश

**सातारा** येथील सैनिक शाळेची सन २०१७-१८ च्या सत्रातील ६ वी आणि ९ वीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून प्रवेशासाठी ठरावीक नमुन्यातील अर्ज मागवण्यात येत आहेत. हे अर्ज १७ आक्टोबर ते १८ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत ऑनलाइन भरायचा आहे. या प्रवेशांसाठी १५ जानेवारी २०१७ रोजी प्रवेश परीक्षा होईल. संरक्षण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त आधिपत्याखाली १९६१ साली ही सैनिक शाळा स्थापन झाली आहे.

ऑनलाइन अर्ज भण्यासाठी www.sainiksatara.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## महाराष्ट्र सिटी टॅक्सी योजना २०१६ चा मसुदा प्रसिद्ध




**शासनाने** महाराष्ट्र सिटी टॅक्सी योजना २०१६ चा मसुदा प्रसिद्ध केला असून या मसुद्याबाबत जनतेकडून सूचना अथवा हरकती मागवण्यात आल्या आहेत. या मसुद्याची इंग्रजी व मराठी प्रत www.mahatranscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

नागरिकांनी मसुद्याबाबत सूचना व हरकती परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ या पत्त्यावर पाठवाव्यात.

## ६५० अभियंत्यांना संधी

**महाराष्ट्र** राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित अर्थात महानिर्मितीमध्ये सहायक अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदांकरिता उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

सहायक अभियंता यांची ४०० व कनिष्ठ अभियंता यांची २५० पदे भरली जातील. या पदांसाठी उमेदवार हे संबंधित विषयातील अभियांत्रिकी पदवीधर असावेत तसेच त्यांची वयोमर्यादा २१ वर्षे पूर्ण इतकी असणे आवश्यक आहे. या पदांसाठी लेखी परीक्षा व मुलाखतीच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यात येईल. या पदांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ०७ नोव्हेंबर, २०१६ अशी आहे.

अधिक माहिती करिता महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

# आपले मत, अपार शक्ती

यंदा महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वजण आनंदी आहेत. नद्या, नाले, तलाव पूर्ण भरले आहेत. चांगले पीक आले आहे. या आनंदाच्या वातावरणात यंदाची दिवाळी आली आणि आपला आनंद द्विगुणित झाला. या समाधानी आणि आनंदाच्या वातावरणातच आता आपणास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जायचे आहे.

राज्यातील पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुका नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत होत आहेत.


स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या स्थानिक विकास आणि प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असतात. या निवडणुकांद्वारे आपणांस सुशासन देऊ शकणाऱ्या लोकप्रतिनिधींची निवड करता येते. त्यामुळे सर्व मतदारांनी निवडणुकीत मत देण्याचा हक्क बजावलाच पाहिजे. आपले एक मत म्हणजे मोठी शक्ती आहे, ही बाब ध्यानात ठेवायला हवी. या शक्तीच्या बळावर स्थानिक प्रशासनाचा चेहरामोहरा बदलू शकतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी निवडणुकींना स्वयंवराची उपमा दिली आहे. आपले गाव किंवा नगर हेच तीर्थ असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सर्वांगीण विकासाने परिपूर्ण आपले शहर आणि गाव हेच खऱ्या अर्थाने तीर्थ ठरते, हे तुकडोजी महाराजांनी व्यक्त केलेले मत अतिशय संयुक्तिक ठरते. अशा या आपल्या तीर्थाचे पावित्र्य जपणाऱ्या सुयोग्य उमेदवारांना निवडून देण्याची संधी या निवडणुकांमुळे सुजाण मतदारांना मिळाली आहे.

मतदानाचा हा हक्क देणाऱ्या आपल्या देशाची घटना याच महिन्यात २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी देशाला अर्पण करण्यात आली. त्यामुळे हा दिवस देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. संविधानाने आपणास दिलेल्या या हक्काचा आपण अतिशय जागरूकरीत्या वापर केला पाहिजे.

या अंकातील नागपूरचे युवा उद्योजक दाम्पत्य हसन शफिक आणि सारा शफिक यांच्या परिश्रमातून उभ्या राहिलेल्या फ्रोजन कांदा निर्मितीची आणि देशविदेशातील त्याच्या विक्रीची यशकथा नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. दिल्ली येथे पोलीस सहआयुक्त म्हणून उत्कृष्ट कार्य करत असलेले लातूर जिल्ह्यातील हरेश्वर विश्वनाथ स्वामी यांची वाटचाल तरुण-तरुणींना यशस्वी होण्यासाठी प्रेरणा देईल.

हा अंक आपणास आवडेल, अशी आशा आहे.




**ब्रिजेश सिंह**

**(मुख्य संपादक)**


LOCAL SELF GOVERNMENT




# बिगुल वाजला...

**राज्यातील १९२ नगरपरिषदा व २० नगरपंचायतींच्या (एकूण २१२) सार्वत्रिक निवडणुकांसाठी चार टप्प्यांत २७ नोव्हेंबर, १४ व १८ डिसेंबर २०१६ आणि ८ जानेवारी २०१७ रोजी मतदान होणार आहे. त्याचबरोबर यातील १९२ नगरपरिषदांच्या थेट अध्यक्षपदांच्या निवडणुकांसाठीदेखील या दिवशी मतदान होणार आहे.**

राज्यातील १९० नगरपरिषदा व ४ नगरपंचायती; तर नवनिर्मित २ नगरपरिषदा व १६ नगरपंचायतींसाठी निवडणुका होत आहेत. सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रात आणि त्याचबरोबर ज्या जिल्ह्यात चार किंवा त्यापेक्षा जास्त नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होत असल्यास त्या जिल्ह्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आचारसंहिता लागू झाली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणीची आचारसंहिता संपुष्टात येईल.

**जगदीश मोरे**

### नामनिर्देशनपत्रांसाठी संगणक प्रणाली

नगरपरिषदांसाठी बहुसदस्यीय पद्धतीनुसार आणि थेट अध्यक्षपदांसाठी निवडणुका होतील; तर नगरपंचायतींच्या निवडणुका एकसदस्यीय पद्धतीने होतील. या निवडणुकांसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे सहजरीतीने भरता यावीत, यासाठी एक संगणक प्रणाली विकसित केली आहे. त्यासाठीच्या संकेतस्थळावरील नामनिर्देशनपत्रे आणि शपथपत्रात आवश्यक ती सर्व माहिती भरून त्याची प्रत काढावी आणि त्यावर सही करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित वेळेत सादर करावे लागते.

### जातवैधता प्रमाणपत्राचा पुरावा

राखीव प्रभागातून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे;

परंतु जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यासाठी पडताळणी समितीकडे केलेल्या अर्जाची पोच पावती नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यांची निवड पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्याची संबंधित अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे.



## निवडणुकीचे चार टप्पे

**टप्पा क्र. १**: २७ नोव्हेंबर २०१६ रोजी मतदान होणाऱ्या नगरपंचायती व नगरपरिषदांची जिल्हानिहाय नावे अशी:

**पालघर**: विक्रमगड (नवीन न.पं.), तलासरी (नवीन न.पं.), मोखाडा (नवीन न.पं.).

**रायगड**: खोपोली, उरण, पेण, अलिबाग, मुरूड-जंजिरा, रोहा, श्रीवर्धन, महाड, माथेरान.

**रत्नागिरी**: चिपळूण, रत्नागिरी, दापोली न.पं., खेड, राजापूर.


**सिंधुदुर्ग**: वेंगुर्ले, सावंतवाडी, मालवण, देवगड-जामसांडे (नवीन न.पं.).

**सोलापूर**: बार्शी, पंढरपूर, अक्कलकोट, करमाळा, कुर्डूवाडी, सांगोला, मंगळवेढा, मैंदर्गी, दुधनी.

**कोल्हापूर**: इचलकरंजी, जयसिंगपूर, मलकापूर, वडगाव-कसबा, कुरूंदवाड, कागल, मुरगुड, गडहिंग्लज, पन्हाळा.

**सांगली**: इस्लामपूर, विटा, आष्टा, तासगाव, कवठे-महाकाळ (नवीन न.पं.), कडेगाव (नवीन न.पं.) खानापूर (नवीन न.पं.), शिराळा (नवीन न.पं.), पलूस (नवीन नगर परिषद).

**सातारा**: सातारा, फलटण, कराड, वाई, म्हसवड, रहिमतपूर, महाबळेश्वर, पाचगणी, कोरेगाव (नवीन न.पं.), मेढा (नवीन न.पं.), पाटण (नवीन न.पं.), वडूज (नवीन न.पं.), खंडाळा (नवीन न.पं.), दहिवडी (नवीन न.पं.).




निवडणुकीचे चार टप्पे

**नाशिक**: मनमाड, सिन्नर, येवला, सटाणा, नांदगाव, भगूर.

**अहमदनगर**: संगमनेर, कोपरगाव, श्रीरामपूर, शिर्डी, रहाता, पाथर्डी, राहुरी, देवळाली, प्रवरा.

**नंदुरबार**: शहादा.

**धुळे**: शिरपूर-वरवाडे, दोंडाईचा-वरवाडे.

**जळगाव**: भुसावळ, चोपडा, अंमळनेर, चाळीसगाव, पाचोरा, यावल, फैजपूर, सावदा, रावेर, एरंडोल, धरणगाव, पारोळा, बोदवड (नवीन न.पं.).

**जालना**: जालना, भोकरदन, अंबड, परतूर.

**परभणी**:

गंगाखेड, सेलू, जिंतूर, मानवत, पाथरी, सोनपेठ, पूर्णा.

**हिंगोली**: हिंगोली, बसमतनगर, कळमनुरी.

**बीड**: बीड, माजलगाव, परळी-वैजनाथ, अंबेजोगाई, गेवराई, धारूर.

**उस्मानाबाद**: उस्मानाबाद, परांडा, भूम, कळंब, तुळजापूर, नळदुर्ग, मुरूम, उमरगा.

**यवतमाळ**: यवतमाळ, दिग्रस, पुसद, उमरखेड, वणी, घाटंजी, आर्णी, दारव्हा.

**अकोला**: अकोट, बाळापूर, मूर्तिजापूर, तेल्हारा, पातूर.

**वाशीम**: कारंजा, वाशीम, मंगरूळपीर.

**अमरावती**: अचलपूर, अंजनगावसूर्जी, वरूड, चांदुरबाजार, मोर्शी, शेंदुरजनाघाट, दर्यापूर, चांदूर रेल्वे, धामणगाव.

**बुलडाणा**: शेगाव, नांदुरा, मलकापूर, खामगाव, मेहकर, चिखली, बुलडाणा, जळगाव-जामोद, देऊळगाव राजा.

**वर्धा**: वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सिंदी, पुलगांव, देवळी.

**चंद्रपूर**: बल्लारपूर, वरोरा, मूल, राजुरा, सिंदेवाही (नवीन न.पं.) (एकूण १४७ नगरपरिषदा व १८ नगरपंचायती).

**टप्पा क्र. २**: १४ डिसेंबर २०१६ रोजी मतदान होणाऱ्या नगरपरिषदांची जिल्हानिहाय नावे अशी: **पुणे**: लोणावळा, दौड, तळेगाव-दाभाडे, आळंदी, इंदापूर, जेजुरी, जुन्नर, सासवड, शिरूर. **लातूर**: उदगीर, औसा, निलंगा, अहमदपूर. (एकूण १४ नगरपरिषदा).

**टप्पा क्र. ३**: १८ डिसेंबर २०१६ रोजी मतदान होणाऱ्या नगरपरिषदा व नगरपंचायतींची जिल्हानिहाय नावे अशी:

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# लोकशाही बळकट करण्याची संधी

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्याशी साधलेला संवाद...**



ज. स. सहारिया, राज्य निवडणूक आयुक्त

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या पातळीवर कशा प्रकारे तयारी सुरु आहे?**

स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्यास साधारणतः सहा महिने शिल्लक असतानाच निवडणुकीची तयारी सुरू होते. मतदार नोंदणीसाठी तर गेल्या वर्षापासूनच प्रयत्न सुरु आहेत. जागांची संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना व आरक्षण निश्चित करणे, मतदार यादी तयार करणे आणि प्रत्यक्ष निवडणूक घेणे, असे साधारणतः निवडणुकीचे वेगवेगळे टप्पे असतात. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी २५ नोव्हेंबर २०१६ रोजी अंतिम प्रभाग रचना व आरक्षण जाहीर केले जाईल.

महानगरपालिका निवडणुकांसाठीदेखील प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. २२ नोव्हेंबर २०१६ रोजी बृहन्मुंबईची; तर उर्वरित महानगरपालिकांची अंतिम प्रभाग रचना २५ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रसिद्ध केली जाईल.

**निवडणूक प्रक्रिया म्हटली की राजकीय पक्षांची महत्त्वाची भूमिका असते. त्यासाठी आपण राजकीय पक्षांशी कशा प्रकारे संवाद साधता?**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत राजकीय पक्ष महत्त्वाचा घटक असल्यामुळे आगामी निवडणुकांच्या दृष्टीने आम्ही तीन वेळा मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये आगामी सर्व सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत माहिती देण्यात आली. सर्व पात्र नागरिकांचे मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी आम्ही मतदार जागृती अभियान राबवत आहोत. नगराध्यक्षपदाची थेट निवडणूक, नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुकीसाठीची नवीन बहुसदस्यीय पद्धत याबाबत सर्व संबंधित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचेही म्हणणे जाणून घेण्यात आले.

**महानगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी आता बहुसदस्यीय पद्धत अवलंबवली जाणार आहे. त्यासाठी कशी मतदार जागृती करणार?**

बहुसदस्यीय पद्धतीमुळे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणांची संख्या वाढू शकते. हे लक्षात घेता मतदान केंद्रावरील मतदार संख्यादेखील कमी केली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत एका मतदाराला आपल्या प्रभागाच्या सदस्यसंख्येएवढी साधारणतः ३ ते ५ मते द्यावी लागतील. नगरपरिषदेच्या निवडणुकीत प्रत्येक मतदाराला एक मत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासाठी द्यावे लागेल. याशिवाय आपल्या प्रभागाच्या सदस्यसंख्येएवढी साधारणतः २ ते ३ अशी एकूण ३ ते ४ मते द्यावी लागतील. या सर्व प्रक्रियेचा विचार करून प्रती मतदान केंद्रासाठी किती मतदार संख्येचा निकष असावा याबाबत आम्ही विचारविनिमय केला आहे. त्यासाठी विविध नगरपरिषदांच्या ठिकाणी मॉकपोलही घेतले आहेत. त्या आधारावर मतदार संख्येचे निकष ठरवण्यात आले आहेत. मतदारांनी काळजीपूर्वक मतदान करावे यासाठी मतदान केंद्रावर पोष्टर लावण्यात येतील व इतर मार्गानेही जनजागृती केली जाईल.

**मतदान प्रक्रियेचे संपूर्ण संगणकीकरण आणि अत्याधुनिकीकरण करण्यात येणार असल्याचे आपण सांगितले आहे. त्याचे स्वरुप नेमके काय आहे?**

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक प्रक्रियेचे अधिकाधिक संगणकीकरण आणि आधुनिकीकरणाच्या दिशेने राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वीच पावले उचलली आहेत. माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाऑनलाईन यांच्या सहयोगाने नवनवीन संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू आहे. संगणकीकरण आणि आधुनिकीकरणाचा एक भाग म्हणून २१४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना करताना गुगल मॅपचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजनदेखील संगणक प्रणालीद्वारे करण्यात आले आहे. नामनिर्देशनपत्रे संकेतस्थळाद्वारे भरण्याची सुविधादेखील प्रोयोगिक तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**शब्दांकन: जगदीश मोरे**

**औरंगाबादः** वैजापूर, कन्नड, पैठण, गंगापूर, खुल्ताबाद. **नांदेडः** धर्माबाद, उमरी, हदगाव, मुखेड, बिलोली, कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, देगलूर, अर्धापूर (न.पं.), माहूर (न.पं.). **भंडाराः** पवनी, भंडारा, तुमसर, साकोली (नवीन न.पं.). **गडचिरोलीः** गडचिरोली, देसाईगंज (एकूण २० नगरपरिषदा व २ नगरपंचायती).

**टप्पा क्र. ४**: ८ जानेवारी २०१७ रोजी मतदान होणाऱ्या नगरपरिषदांची जिल्हानिहाय नावे अशीः **नागपूरः** कामठी, उमरेड, काटोल,



कळमेश्वर, मोहपा, रामटेक, नरखेड, खापा, सावनेर. **गोंदियाः** तिरोरा, गोंदिया (एकूण ११ नगरपरिषदा).

## स्वतंत्र आणि समतुल्य

लोकसभा, विधानसभा निवडणुका भारत निवडणूक आयोग तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपवण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगालाही भारत निवडणूक आयोगाप्रमाणे अधिकार आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक स्वायतत्ता आणि अधिकार प्रदान करण्यात आले; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत घेण्यासाठी प्रत्येक राज्यात राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली. त्या अनुषंगाने महाराष्ट्रात राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३के आणि २४३झेडए अन्वये २६ एप्रिल १९९४ रोजी 'राज्य निवडणूक आयोगा'ची स्थापना करण्यात आली.

भारत निवडणूक आयोगातर्फे लोकसभा, राज्यसभा, विधानसभा विधानपरिषद आदी निवडणुका घेतल्या जातात. भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोग या दोन्ही स्वतंत्र व संविधानिक संस्था आहेत. राज्य निवडणूक आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांची व्याप्ती प्रचंड आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता पाच वर्षांतून सुमारे २ लाख ३८ हजार सदस्यांसाठी निवडणूक घेतली जाते. ही प्रक्रिया प्रचंड मोठी आहे.

महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपवण्यात आली आहे. राज्यात सध्या २६ महानगरपालिका, २३० नगरपरिषदा, ११० नगरपंचायती, ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व सुमारे २८ हजार ग्रामपंचायती आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका अधिकाधिक निर्भय, मुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगातर्फे वेळोवेळी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने कायमस्वरूपी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या अनेक महत्त्वाच्या घटना आयोगाच्या इतिहासात नोंदवल्या गेल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

### एक दृष्टिक्षेप

- **मुदत संपणाऱ्या १९० नगरपरिषदा व ४ नगरपंचायती;**
- **नवनिर्मित २ नगरपरिषदा व १६ नगरपंचायती**
- **एकूण २१२ नगरपरिषदा व नगरपंचायती**
- **नगरपरिषदेच्या १९२ थेट अध्यक्षपदासाठी निवडणूक**
- **एकूण प्रभाग २,४८५**
- **एकूण जागा ४,७५०**
- **महिलांसाठी एकूण आरक्षित जागा २,४४५**
- **अनुसूचित जातींसाठी एकूण आरक्षित जागा ६०८**
- **अनुसूचित जमातींसाठी एकूण आरक्षित जागा १९८**
- **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी एकूण आरक्षित जागा १,३१५**

### महत्त्वपूर्ण उपाययोजना

- **व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक**
- **भरारी पथक**
- **चेक पोष्टसाठी पथक**
- **तक्रार निवारण कक्ष**
- **निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती**
- **मतदार जागृती अभियान**
- **मतदारांना वोटर स्लिपचे वाटप**

| निवडणुका होत असलेले जिल्हे | नगरपरिषदा/ नगरपंचायतींची संख्या | नामनिर्देशनपत्रांची कालावधी | मतदानाची तारीख | मतमोजणीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| २५ जिल्हे | १४७ नगरपरिषदा व १८ नगरपंचायती | २४ ते २९ ऑक्टोबर २०१६ | २७ नोव्हेंबर २०१६ | २८ नोव्हेंबर २०१६ |
| २ जिल्हे | १४ नगरपरिषदा | ११ ते १९ नोव्हेंबर २०१६ | १४ डिसेंबर २०१६ | १५ डिसेंबर २०१६ |
| ४ जिल्हे | २० नगरपरिषदा व २ नगरपंचायती | १९ ते २५ नोव्हेंबर २०१६ | १८ डिसेंबर २०१६ | १९ डिसेंबर २०१६ |
| २ जिल्हे | ११ नगरपरिषदा | ९ ते १७ डिसेंबर २०१६ | ८ जानेवारी २०१७ | ९ जानेवारी २०१७ |

# राज्य निवडणूक आयुक्त

राज्य निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली राज्य निवडणूक आयोगाचे कामकाज चालते. शासनाचे प्रधान सचिव किंवा त्यापेक्षा अधिक दर्जाचे पद धारण केलेल्या व्यक्तीची राज्य निवडणूक आयुक्तपदी पाच वर्षांसाठी राज्यपालांकडून नियुक्ती केली जाते.

पहिले राज्य निवडणूक आयुक्त म्हणून दे. ना. चौधरी यांची नियुक्ती झाली होती. सध्या ज. स. सहारिया पाचवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. एक संविधानात्मक संस्था म्हणून राज्य निवडणूक आयोगाला नावारूपाला आणण्याच्या कामात आतापर्यंतच्या सर्व राज्य निवडणूक आयुक्तांनी आपापल्या परीने योगदान दिले आहे.

ज. स. सहारिया यांनी ५ सप्टेंबर २०१४ रोजी राज्य निवडणूक आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला आहे. तत्पूर्वी, त्यांनी राज्याचे मुख्य सचिव आणि महाराष्ट्र व दिल्लीत विविध महत्त्वाच्या पदांची धुरा सांभाळली आहे. त्यांनी अलाहाबाद विद्यापीठातून एम.ए.; तर अहमदाबादच्या आय.आय.एम.मधून एम.बी.ए. केले आहे.

## राज्य निवडणूक आयुक्त व कार्यकाल

१) दे. ना. चौधरी : २६ एप्रिल १९९४ ते २५ एप्रिल १९९९
२) य. ल. राजवाडे : १५ जून १९९९ ते १४ जून २००४
३) नंदलाल : १५ जून २००४ ते १४ जून २००९
४) नीला सत्यनारायण : ६ जुलै २००९ ते ५ जुलै २०१४
५) ज. स. सहारिया : ५ सप्टेंबर २०१४ पासून

निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार करण्याऐवजी विधानसभेच्या मतदार याद्यांचा या निवडणुकांसाठी वापर सुरू केल्याने कामाची दुरुक्ती टाळणे शक्य झाले. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनचा वापर सुरु केला.

ग्रामपंचायत सदस्य म्हणून विजयी होणाऱ्या महिलांसाठी क्रांतिज्योती प्रकल्प राबवला. नोटाची (NOTA) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यासारख्या अनेक बाबी सांगता येतील. निवडणूक सुधारणांना आता आणखी गती देण्याचा प्रयत्न सुरू आहे.




### अधिकार, दर्जा व शक्ती

लोकसभा, विधानसभा निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची घटनात्मक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रियादेखील थोड्याफार फरकाने लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच असते. म्हणूनच राज्य निवडणूक आयोगाला भारत निवडणूक आयोगाप्रमाणे समान अधिकार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने मोहिंदर सिंग गील विरुद्ध मुख्य निवडणूक आयुक्त या प्रकरणातही महत्वपूर्ण निकाल दिला आहे.

(लेखक राज्य निवडणूक आयोगाचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)

## मागे वळून पाहताना

| | |
|---|---|
| २६ एप्रिल १९९४ | : राज्य निवडणूक आयोगाची स्थापना |
| २९ जानेवारी १९९६ | : विधानसभेच्या मतदार यादीचा वापर |
| २९ मार्च २००४ | : इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनद्वारे मतदान |
| २० नोव्हेंबर २००४ | : राजकीय पक्षांच्या नोंदणीस सुरवात |
| ८ जानेवारी २०१० | : क्रांतिज्योती प्रकल्पाचा प्रारंभ |
| २७ मार्च २०१० | : शाईऐवजी मार्कर पेनचा वापर |
| १२ नोव्हेंबर २०१३ | : मतदारांसाठी नोटाची (NOTA) सुविधा |
| २३ डिसेंबर २०१४ | : नामनिर्देशनपत्रे भरण्यासाठी संकेतस्थळ |
| २ फेब्रुवारी २०१५ | : संगणक प्रणालीद्वारे प्रभाग रचनेचा प्रयोग |
| ४ जून २०१५ | : कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या पक्षांना नोटिसा |

- राज्य निवडणूक आयोग स्वतंत्र आहे.
- राज्य निवडणूक आयुक्तांचा दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या दर्जाशी समतूल्य आहे.
- राज्य निवडणूक आयुक्तांना आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
- आवश्यकता भासल्यास राज्य निवडणूक आयोग राज्य शासनाच्या विरोधात 'रिट ऑफ मँडमस'नुसार न्यायालयात दाद मागू शकतो.




# मतदार व्हा... मतदान करा!

**राज्य निवडणूक आयोगातर्फे मतदार नोंदणी आणि मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी मतदार जागृती अभियान राबवले जाते. वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव नोंदवावे आणि मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करावे, हा या अभियानाचा उद्देश असतो. मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठीही अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे...**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत होणाऱ्या निवडणुकांसाठी गेल्या वर्षभरापासून दोन ते तीन वेळा मतदार नोंदणीसाठी मतदार जागृती अभियान राबवण्यात आले आहे.

विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे, गेल्या वर्षी ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम राबवण्यात आला होता. तेव्हादेखील संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर मतदार जागृती अभियान राबवण्यात आले होते.

## जनजागृतीसाठी समिती

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या दृष्टीने मतदार जागृती अभियानाची प्रभावी दिशा व रूपरेषा निश्चित करण्यासाठी; तसेच मतदार जागृती साहित्य तयार करण्याकरिता समिती गठित करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमांतून मतदार जागृतीसाठी ठाणे महानगरपालिकेने विविध माध्यमांकरिता जाहिराती व व्हिडिओ क्लिप्स तयार केल्या आहेत.




## मतदार यादी शुद्धीकरण कार्यक्रम

नगरपरिषद, नगरपंचायतींच्या नोव्हेंबर व डिसेंबर २०१६ मध्ये होणाऱ्या निवडणुकांसाठी १० सप्टेंबर २०१६ रोजी अस्तित्वात येणारी विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्यासाठी या यादीत मतदारांनी ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत नावे नोंदवणे आवश्यक आहे, तरच त्यांना या निवडणुकीत मतदान करता येईल. याबाबत नागरिकांना माहिती व्हावी म्हणून निवडणूक होत असलेल्या सर्व संबंधित नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात व्यापक प्रमाणात मतदार जागृती अभियान राबवले गेले. योगायोग म्हणजे ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत भारत निवडणूक आयोगातर्फे राष्ट्रीय मतदार यादी शुद्धीकरण कार्यक्रम (एनईआरपी) राबवण्यात आला. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या

## मतदार नोंदणीसाठी नावीन्यपूर्ण उपाययोजना

- **विद्यापीठे व महाविद्यालयांचा मतदार जागृतीत सहभाग**
- **विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मतदार नोंदणीची व्यवस्था**
- **मान्यवर व्यक्तींच्या माध्यमातून मतदारांना आवाहन**
- **सहकारी गृहनिर्माण संस्थांना १०० टक्के मतदार नोंदणीसाठी विनंती**
- **मतदार जागृतीसाठी मोबाईल कंपन्यांकडून जनहितार्थ एसएमएस**
- **उद्योजक, बँक व कंपन्यांना मतदार जागृतीसाठी आवाहन**
- **कम्युनिटी रेडिओच्या माध्यमांतून मतदार जागृती**
- **सोशल मीडियाचा मतदार जागृतीसाठी वापर**
- **विद्यार्थ्यांसाठी निबंध, पोस्टर्स स्पर्धेचे आयोजन**
- **नाटकांच्या मध्यांतरात थिएटरमध्ये मतदार जागृतीची उद्‌घोषणा**

निवडणुकांसाठी याचा चांगला उपयोग झाला.

### विधानसभा मतदार संघाची यादी

बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या महानगरपालिकांच्या मुदती मार्च- एप्रिल २०१७ मध्ये संपत आहेत; तर भिवंडी- निजामपूर, मालेगाव, चंद्रपूर, परभणी आणि लातूर या महानगरपालिकांच्या मुदती जून २०१७ पर्यंत संपत आहेत; तसेच २६ जिल्हा परिषदा आणि २९६ पंचायत समित्यांच्या मुदती मार्च २०१७ मध्ये संपत आहेत. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी १ जानेवारी २०१७ च्या अर्हता दिनांकावर आधारित तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरली जाणार आहे.

### मतदार यादी पुनर्निरीक्षण कार्यक्रम

भारत निवडणूक आयोगातर्फे विधानसभा मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत मतदार यादी पुनर्निरीक्षण कार्यक्रम राबवण्यात आला. त्यासाठी १ जानेवारी २०१७ हा अर्हता दिनांक होता. या कालावधीत मतदार यादीत नाव नोंदवलेल्या मतदारांनाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगरपरिषद व नगरपंचायती वगळून) आगामी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदान करता येणार आहे. याची माहिती करून




देण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर व्यापक प्रमाणात मतदार जागृती अभियान राबवण्याबाबत सूचना दिल्या होत्या. भारत निवडणूक आयोगाने हा कार्यक्रम २१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत वाढविला. त्यामुळे महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील नागरिकांना नावे नोंदवण्यासाठी अधिक संधी मिळाली.

### माध्यमांचा प्रभावी वापर

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी विशेषत: महानगरपालिकांनी पारंपरिक पद्धतीबरोबरच नावीन्यपूर्ण पद्धतीने मतदार जागृती अभियान राबवले. होर्डिंग, एस.एम.एस., बस, ट्रेन वृत्तपत्रे, आकाशवाणी, वृत्तवाहिन्या, टीव्ही चॅनल्सवर जाहिराती देण्याबरोबरच सोशल मीडिया आणि कम्युनिटी रेडिओचाही प्रभावी वापर केला. बहुतांश ठिकाणी पथनाट्याचाही आधार घेण्यात आला. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही मतदार जागृती कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात आले. नेहमीच्या ठिकाणांबरोबरच महानगरपालिकांची प्रभाग कार्यालये आणि महाविद्यालयांमध्येही मतदार नोंदणी केंद्रे सुरू करण्यात आली होती. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सर्व पात्र सभासदांनी मतदार यादीत नावे नोंदवावित व मतदान करावे, यासाठी त्यांच्या पदाधिकाऱ्यांनाही विनंती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या 'लोकराज्य', 'शेतकरी', 'दक्षता', 'किशोर' इ. नियतकालिकांच्या माध्यमातूनही मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसारित होणाऱ्या आकाशवाणीवरील 'दिलखुलास' तसेच दूरदर्शनवरील 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात निवडणूक आयुक्तांच्या मुलाखती प्रसारित करण्यात आल्या. भारत निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रितपणे मतदार नोंदणीसाठी मोहीम राबवण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यानिमित्ताने एक नवीन पाऊल उचलले गेले आहे.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# निवडणुकीसाठीचे आरक्षण...

**राज्यातील १८ नगरपंचायतींच्या व २३३ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदांची आरक्षण सोडत बुधवार ५ ऑक्टोबर २०१६ रोजी मंत्रालयात काढण्यात आली. २३३ नगरपरिषदांपैकी लोकसंख्येनुसार अनुसूचित जातीसाठी ३१, अनुसूचित जमातीसाठी १०, नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी ६३ पदे आरक्षित ठेवण्यात आली. १२९ पदे खुल्या प्रवर्गासाठी ठेवण्यात आली. या २३३ पदांपैकी ११७ पदे महिलांसाठी तर ११६ पुरुषांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.**



महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार नगरपरिषदेचे नगराध्यक्ष हे जनतेतून थेट निवडून येणार असून त्यांचा पदावधी ५ वर्षांचा आहे. नगरपंचायतीचे नगराध्यक्ष हे पूर्वीप्रमाणेच नगरसेवकांमधून निवडण्यात येणार असून त्यांचा पदावधी अडीच वर्षांचा राहणार आहे.

### नगराध्यक्षपदाचे आरक्षण

सुधारणा अध्यादेश प्रस्थापित होण्यापूर्वी नगरपरिषदा व नगरपंचायती यांचा अध्यक्ष पदाचा कार्यकाळ व निवड याबाबत सारख्याच तरतुदी होत्या. त्यामुळे नगराध्यक्षपदाचे आरक्षण निश्चित करताना राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीमधील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणानुसार अध्यक्षांची पदे राखीव ठेवण्यात आली होती. तर महिलांसाठी ५० टक्के पदे आरक्षित ठेवण्यात आली आहेत. आता, नगरपरिषदा व नगरपंचायत यांच्या अध्यक्षपदाची निवड व पदावधी यामध्ये समानता राहिली नसल्यामुळे या दोन्ही प्रकारच्या नागरी स्थानिक संस्थांचा स्वतंत्रपणे विचार करून नगराध्यक्षपदाचे आरक्षण निश्चित करणे आवश्यक होते.

### लोकसंख्येनुसार आरक्षण

राज्यात स्थापन झालेल्या एकूण १२२ नगरपंचायतींपैकी एकूण १०४ नगरपंचायतींचे आरक्षण यापूर्वीच निश्चित करण्यात आल्याने या वेळी १८ नगरपंचायतींचे आरक्षण निश्चित करण्यात आले. या १८ नगरपंचायतींपैकी लोकसंख्येनुसार अनुसूचित जातीसाठी २, अनुसूचित जमातीसाठी ५, नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी ६ पदे आरक्षित ठेवण्यात आली. ५ पदे खुल्या प्रवर्गासाठी ठेवण्यात आली. या १८ पदांपैकी ८ पदे महिलांसाठी तर १० पुरुषांसाठी ठेवण्यात आली आहेत.

**विलास बोडके**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ५१-ए-१ए नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिला या प्रवर्गांसाठी/ घटकांसाठी आरक्षण ठेवण्यात येते. या कलमांतर्गत महाराष्ट्र नगरपरिषदा (अध्यक्ष पदासाठी थेट निवडणुका) नियम २०१६ तयार करण्यात आले आहे. याद्वारे आरक्षणाची पद्धत ठरवण्यात आलेली आहे.

नगरपंचातींच्या अध्यक्ष पदासाठी सोडत काढण्यात आलेल्या १८ नगरपंचायतीपैकी अनुसूचित जाती प्रवर्ग - सिंदेवाही, तर (महिला) - कवठेमहांकाळ. अनुसूचित जमाती प्रवर्ग - विक्रमगड, नेवासा, तर (महिला)- मोखाडा, तलासरी, मेढा. नागरीकांचा मागास प्रवर्ग - पाटण, खंडाळा (महिला)- कडेगांव, वडूज, दहिवडी, शिराळा. खुला प्रवर्ग- बोदवड, रेणापूर, खानापूर, कोरेगाव, देवगड-जामसांडे.

नगराध्यक्षपदासाठी सोडत काढण्यात आलेल्या २३३ नगरपरिषदांपैकी अनुसूचित

जाती प्रवर्ग - शेंदूरजनाघाट, जामखेड, दुधनी, उमरखेड, पलूस, चाकण, पाचोरा, बसमत, दारव्हा, सिल्लोड, कारंजा (जि. वाशिम), सासवड, मानवत, तासगाव, इचजकरंजी, तर (महिला)- महाबळेश्वर, अंबड, चाळीसगांव, शेवगांव, वाई, साकोली, खामगांव, लोणार, पाथरी, खोपोली, पातूर, जयसिंगपूर, आळंदी, सिंदी रेल्वे, नांदूरा, कराड. अनुसूचित जमाती प्रवर्ग-चिमूर, नागभीड, सिंदखेडराजा, सिन्नर, देवळी तर (महिला)- गडचांदूर, यावल, आर्णी, चांदवड, फैजपूर. नागरिकांचा मागास प्रवर्ग - किल्लेधारुर, गेवराई, राजापूर, पैठण, म्हसवड, बारामती, रहीमतपूर, वडगाव, मलकापूर, राहूरी, मेहकर, पारोळा, एरडोल, अंबरनाथ, वेंगूर्ला, भडगांव, निलंगा, आर्वी, मुदखेड, राजगुरुनगर, नांदगांव, चांदूररेल्वे, अलिबाग, बार्शी, मुरगुड, तळोदे, भंडारा, लोहा, किनवट, चांदूरबाजार, खेड, कळमनुरी. (महिला)- जत, जेजुरी, मंगळवेढे, उरण, पन्हाळा, चिखली, रिसोड, आष्टा, तळेगांव दाभाडे, पुसद, सावनेर, कुंदलवाडी, भूम, पुर्णा, गडचिरोली, अहमदपूर, पवनी, कन्नड, मुरुम, जळगांव जामोद, अचलपूर, कळंब, परळी वैजनाथ, पेठ उमरी, हादगांव, धर्माबाद, फलटण, बुलडाणा, कागल, उमरगा, जामनेर. खुला प्रवर्ग- कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, संगमनेर, अकोट, बाळापूर, दर्यापूर बानोसा, धामणगाव रेल्वे, अंजनगाव, खुलदाबाद, माजलगाव, बीड , तुमसर, मलकापूर (बुलढाणा), बल्लारपूर, भद्रावती, गडूर, राजुरा, वरोरा, दोंडाईचा-वरवाडे, गोंदिया, हिंगोली, भुसावळ, वरणगाव, रावेर, धरणगाव, गडहिंग्लज, कुरुंदवाड, उदगीर, औसा,कामठी,वाडी (सीटी), रामटेक, नरखेड, मोवाड, मुखेड,देगलूर,नंदुरबार ,शहादा, इगतपुरी , येवला, सटाणा, त्र्यंबक, उस्मानाबाद, परांडा, जव्हार, डहाणू, गंगाखेड, शैलू, जुन्नर, पेण, श्रीवर्धन, रोहा अष्टमी ,रत्नागिरी ,इस्लामपूर,पाचगणी, सावंतवाडी, मालवण, कुर्डवाडी, करमाळा, सांगोले, पंढरपूर, वर्धा, हिंगणघाट,देवळी, वाशिम, वणी. (महिला)- चिपळूण, सातारा, मुर्तिजापूर, आंबेजोगाई, मनमाड, खापा, लोणावळा, पांढरकवडा, दौंड, विटा, शिरुर, मोर्शी, अक्कलकोट, चोपडा, सोनपेठ, कन्हान पिंपरी, राहता पिंपळस, कळमेश्वर, भोर, नवापूर, कर्जत, काटोल, अंमळनेर, नळदुर्ग, मंगळूरपीर, दिग्रस, नेर नबाबपूर, मुरुड-जंजीरा, देऊळगांवराजा, माथेरान, जिंतूर, बदलापूर, कंधार, मोहपा, घाटंजी, श्रीगोंदा, देसाईगंज, इंदापूर, ब्रम्हपूरी, भगूर, मैंदर्गी, चिखलदरा, मूल, तिरोडा, तेल्हारा, पालघर, भोकरदन, शेगांव, महाड, सांगोले, वैजापूर, तुळजापूर, बिलोली, उमरेड, यवतमाळ, श्रीरामपूर, भोकर, शिरपूर वरवाडे, पुलगांव, जालना, मोहोळ, परतूर, गंगापूर, वरुड, सावदा. याप्रमाणे नगरपरिषदा व नगरपंचायतींचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.



## ११७ पदे महिलांसाठी आरक्षित

**राज्यातील एकूण २३३ नगरपरिषदांपैकी सार्वत्रिक निवडणुकांसाठी सामोरे जाणाऱ्या एकूण १९२ नगरपरिषदा व नवनिर्मित ३ नगरपरिषदा (साकोली, नागभीड व पलूस) अशा १९५ नगरपरिषदांचे या सोडतीद्वारे निश्चित केलेले अध्यक्षपदाचे आरक्षण त्यांना तत्काळ लागू होणार आहे. तर ११ नगरपरिषदांचे पुढील पदावधीचे आरक्षण निश्चित नसल्याने, त्यांचे सध्याचे आरक्षण संपुष्टात आल्यावर या सोडतीद्वारे निश्चित केलेले आरक्षण लागू राहणार आहे. तसेच पूर्वी निश्चित केलेल्या आरक्षणाचा पदावधी संपुष्टात आल्यानंतर २७ नगरपरिषदांना या सोडतीद्वारे निश्चित केलेले आरक्षण लागू राहणार आहे. अशाप्रकारे २३३ नगरपरिषदांपैकी लोकसंख्येनुसार अनुसूचित जातीसाठी ३१, अनुसूचित जमातीसाठी १०, नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी ६३ पदे आरक्षित ठेवण्यात आली. तर १२९ पदे खुल्या प्रवर्गासाठी ठेवण्यात आली. तसेच या २३३ पदांपैकी ११७ पदे महिलांसाठी तर ११६ पुरुषांसाठी ठेवण्यात आली आहेत.**

(लेखक विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)
संपर्क:०९८७०९३४९६२

# परिवर्तनाचे साधन

**स्वतंत्र भारताची राज्यघटना म्हणजेच संविधान २६ नोव्हेंबर १९४९ पासून देशाला अर्पण करण्यात आले. त्यामुळे हा दिवस देशभर 'संविधान दिवस' म्हणून साजरा केला जातो.**




समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, दर्जाची व संधीची समानता, राष्ट्रीय एकता आणि एकात्मता वृद्धिंगत करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले भारतीय संविधान' हे जगातल्या समग्र मानव कल्याणकारी मूल्यांचा अर्क आहे.

१९४७ साली आपला देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला आणि देशातील राष्ट्रजीवनाची वाटचाल करणारी स्वतंत्र भारताची राज्यघटना म्हणजेच संविधान २६ नोव्हेंबर १९४९ पासून देशाला अर्पण करण्यात आले. पुढे २६ जानेवारी १९५० पासून ते अमलात आले. तेव्हापासून आजतागायत अखंड ६७ वर्षे या विशाल, खंडप्राय देशाची वाटचाल अत्यंत दिमाखात सुरू आहे.

संविधानाची निर्मिती होण्यापूर्वी देशात व जगात अनेक धार्मिक, राजकीय, सामाजिक सांस्कृतिक ग्रंथाची निर्मिती झाली. त्या त्या काळात त्या-त्या ग्रंथांनी मार्गदर्शन केले, पण भारतीय संविधान जेव्हापासून अमलात आले तेव्हापासून समग्र भारतीयांचे या संविधानामुळे कल्याण झाले. हे संविधान म्हणजे केवळ देशाची प्रशासकीय यंत्रणा

**डॉ. बबन जोगदंड**

कार्यप्रवण करण्याचा दस्तऐवज नसून एक सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे साधन आहे. त्याचबरोबर मानवास प्रतिष्ठा, हक्क, स्वातंत्र्य समता बंधुता प्रदान करणारा हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

## संविधान निर्मिती

दुसरे महायुद्ध १९४५ ला संपल्यानंतर भारताच्या स्वतंत्र्याच्या प्रश्नाला प्रधान्य प्राप्त झाले. या प्रश्नांवर विचार विनिमय करण्यासाठी ब्रिटिश शासनाने एक त्रिसदस्यीय मंडळ भारतात पाठवले. हे शिष्टमंडळ सत्ता हस्तातरणांचा निर्विघ्न मार्ग, पद्धती, प्रक्रिया आणि साधने सुचवण्याच्या हेतूने भारतात पाठविण्यात आले होते. या शिष्टमंडळाला 'कॅबिनेट मिशन' असे संबोधण्यात आले होते. या कॅबिनेट मिशनने १६ मार्च १९४६ रोजी सत्ता हस्तांतरणाची आपली योजना घोषित केली. भारताचा भावी राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीने संविधान निर्मितीसाठी एक संविधान सभा स्थापन करण्यात यावी, असे या योजनेत सूचित करण्यात आले होते. संविधान निर्मितीच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची २९ ऑगस्ट १९४७ रोजी अविरोध निवड झाली. मसुदा समितीची पहिली बैठक ३० ऑगस्ट १९४७ रोजी झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान अत्यंत परिश्रमाने लिहून देशातील प्रत्येक समूहाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. तब्बल २ वर्ष ११ महिने १७ दिवस संविधानाच्या लिखाणाचे काम चालले. डॉ. आंबेडकरांनी सर्व समाजाचे हित डोळ्यासमोर ठेवून संविधानात ३९५ कलमे समाविष्ट केली आणि एकूण २२ भागात त्याची विभागणी केली. संविधानात जी अनेक कलमे आहेत त्यातील काही कलमे, भाग हे मानवी उत्कर्षासाठी, मानवी हक्कासाठी अत्यंत प्रेरक असे आहेत. त्यातील काही कलमे अभ्यासल्यास आपणांस असे दिसून येईल की, संविधानाच्या तिसऱ्या भागात भारतीय जनतेला मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत. या मूलभूत हक्काने भारतीयांमध्ये कसल्याही

प्रकारचा भेदाभेद केलेला नाही.

**सरनाम्याचे स्वरूप**

संविधान सरनाम्याचे विश्लेषण करताना तीन भागात त्याचे वर्गीकरण करता येणे शक्य आहे ते असे:

१) घोषणा/जाहीरनामा भाग, २) उद्देश अथवा अनिवार्यता, ३) वर्णनात्मक भाग

भारतीय संविधानाचा सरनामा मूळ इंग्रजीतला ८५ शब्दांचा असून त्यातील विचार व आशय शब्दरचना, मांडणी ही एक नवी दिशा व्यक्त करते. भारतीय लोकांच्या भावना, संकल्पना व आदर्श हे सरनाम्यातून प्रवर्तीत होताना दिसून येतात. संविधानपर आशय, हा त्याचे ध्येय आणि उद्दिष्ट यांना पूर्ण करण्यासाठी दिलेली घोषवाक्ये आहेत. संविधानाच्या सरनाम्यातील पहिला भाग -

**घोषणा अथवा जाहीरनाम्याचा भाग**

'आम्ही भारताचे लोक, आमच्या संविधान सभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत''.

**उद्दिष्टांचा भाग**

''भारताचे सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा संकल्प करत आहोत अशी ग्वाही देताना दिसत आहे पुढील वर्णनात्मक भागात लोकशाहीवादी मूल्य, संकल्पनाचा प्रामुख्याने उल्लेख आढळतो. त्याचा सरनाम्यात वर्णनात्मक भाग तो असा : ''त्याचा सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना याचे स्वातंत्र्य, दर्जाचे व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांची आश्वासन देणारी बंधुता'' प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करण्याचे आश्वासन देताना प्रामुख्याने नमूद करण्यात आले आहे.

संविधानाच्या प्रास्ताविकेत 'व्यक्तीची प्रतिष्ठा' 'राष्ट्राची एकता आणि एकात्मता' याचे आश्वासन देणारी 'बंधुता' प्रवर्तीत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आलेला आहे. 'एकात्मता' ही शब्दसंकल्पना (१९७६) मध्ये ४२व्या घटना दुरुस्तीने आणलेली आहे. या देशात एकता, एकात्मता व बंधुता वृद्धिंगत झाल्याशिवाय भारताचा विकासच काय पण त्याचे अस्तित्वच टिकून राहणे शक्य नाही. म्हणून घटनाकारांनी व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकता व एकात्मता याचे आश्वासन देणारी बंधुता विकसित करण्याचा संकल्प केला होता.

संविधानाचे काम पूर्ण झाल्यानंतर २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनासभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले होते. त्यात त्यांनी संविधान निर्मितीचा प्रवास उलगडला. त्यांनी आपल्या ५५ मिनिटांच्या प्रदीर्घ भाषणात म्हटले, 'घटनाकाळात समितीची एकूण ११ अधिवेशने झाली. त्यापैकी ६ अधिवेशने उद्दिष्टांचा ठराव आणि मूलभूत हक्क व केंद्राची घटना, केंद्राचे अधिकार, प्रांतिक घटना, अल्पसंख्याक जमाती, शेड्युल्ड विभाग व शेड्युल्ड जमाती यासंबंधीच्या कमिट्यांचे रिपोर्ट पास करण्यात खर्ची पडली, उरलेली अधिवेशने घटना मसुद्याच्या विचारांकरिता उपयोगी पडली.

एवढ्या कमी कालावधित हा घटनेचा मसुदा तयार झाला तरी तो परिपूर्ण असून, सर्वसमावेशक आहे. एवढ्या महत्प्रयासाने हे संविधान तयार झाले. ते कितीही चांगले असले तरी ते राबवणारे लोक चांगले असायला हवेत. यावरून डॉ. बाबासाहेबांना घटनेच्या भावी यशापयशासंबंधी चिंता होती, पण त्यांची चिंता आज दूर झालेली दिसते. गेल्या ६७ वर्षांत संविधान अत्यंत व्यवस्थितपणे काम करते आहे.

संविधान हा देशातील सर्वश्रेष्ठ ग्रंथ असल्याने या ग्रंथाची माहिती व्हावी, यातील कलमे आपणांस समजावीत, यासाठी माजी सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे शाळांमधून सामूहिक वाचन व्हावे, म्हणून प्रयत्न केले. त्याला यश आले. संविधानाच्या प्रचार-प्रसारासाठी आणखी जनजागृती केल्यास त्याचा समाजाला उपयोगच होईल !


(लेखक हे यशदा पुणे येथे संशोधन अधिकारी आहेत.)
संपर्क:०९८२३३३८२६६

## संविधानातील महत्त्वाची कलमे

■ संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये समानतेचा अधिकार बहाल केला आहे. सर्वांना समान पातळीवर आणणारा हा अत्यंत महत्त्वपूर्ण असा अधिकार आहे. संविधानात व्यवसाय स्वातंत्र्य, भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. ■ कलम २३ व २४ मध्ये शोषणविरुद्धचा अधिकार दिला आहे. या कलमान्वये जर कोणी धनदांडगे सामान्य नागरिकास वेठीस धरून त्यांच्याकडून सक्तीने काम करून घेत असेल तर ते या अधिकाराने थांबविता येऊ शकेल. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार हासुद्धा संविधानात समाविष्ट केला आहे. यामुळे प्रत्येकजण आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा वापर करून कुठलाही धर्म अंगीकृत करू शकतो.

■ संविधानात सगळ्यात महत्त्वपूर्ण कलम जे मला वाटते ते आहे, कलम २१ (१) अन्वये सांस्कृतिक व शिक्षणाचा अधिकार घटनाकारांनी बहाल केला आहे. कारण शिक्षण हे समग्र क्रांतीचे महत्त्वाचे साधन आहे, हे घटनाकार ओळखून होते. शिक्षणामुळे माणूस ज्ञानी, सुसंस्कृत बनतो त्यामुळे प्रत्येकजण शिकून सुसंस्कृत बनावा यासाठी शैक्षणिक अधिकाराचे कलम हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संविधानाचे प्रत्येक कलम हे अत्यंत मौलिक आहे. प्रत्येक कलमात या देशातील सामान्य, वंचित, उपेक्षित, पीडितांचे हित सामावलेले आहे. विशेषत संविधानाचा जो सरनामा आहे, ज्याला आपण preamble (प्रास्ताविक) म्हणतो, तो तर अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या सरनाम्याची सुरुवातच ''आम्ही भारताचे'' लोक अशी करण्यात आली आहे. यामध्ये समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, विचार, विश्वास, श्रद्धा, अभिव्यक्ती असे शब्दप्रयोग आहेत. या सरनाम्यातच संविधानाचे संपूर्ण सार सामावलेले आहे.

# दीपोत्सव



**भारतीय सण- उत्सवांचा मूळ उद्देश शरीराचे आणि मनाचे आरोग्य चांगले राखणे हा आहे. ऋतूप्रमाणे आहार घेतला तर शरीराचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. सणांचा आनंद घेताना माणसे दु:ख, चिंता विसरून जातात. ऋतू हे सूर्यावर अवलंबून असतात आणि सण-उत्सव हे चंद्रावर. त्यामुळे ठरावीक सण हे ठरावीक ऋतूत येत असतात. थंडीच्या दिवसात भूकही चांगली लागते म्हणून दिवाळीसारखे सण हे थंडीमध्ये येत असतात.**



भारत हा शेतीप्रधान देश आहे. शरद ऋतूमध्ये शेतात तयार झालेले धान्य घरात येत असते. घर समृद्ध झालेले असते. म्हणून दिवाळीसारखा आनंदोत्सव साजरा करणारा सण हा याच दिवसात येत असतो.

## दिवाळीची तयारी

दीपावली हा 'सणांचा राजा' मानला जातो. कारण हा सण सर्व आबालवृद्ध स्त्री-पुरूष, गरीब-श्रीमंत सारेच मोठ्या प्रमाणात व मोठ्या आनंदात साजरा करतात. माणसे दैनंदिन जीवनातील चिंता, दु:ख, काळजी, मतभेद सारे काही विसरून दिवाळीचे आनंदाचे क्षण उपभोगत असतात. विजयादशमी - दसरा सण झाला की सर्वांना दिवाळीचेच वेध लागतात. सारे जण दीपावली सणाचे स्वागत करण्यास उत्सुक असतात. दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा सजतात. दिवाळीची तयारी करण्यात प्रत्येक जण आनंद घेत असतो. दिवाळीचा सण जवळ आला की खेडेगावात अंगण सारवून स्वच्छ केले जाते. घरात स्वच्छता केली जाते. यानिमित्ताने घरातील नको असलेल्या जुन्या गोष्टी टाकून दिल्या जातात. घराला रंग दिला जातो. नवीन कपडे, दागिने यांची खरेदी केली जाते. महिला दिवाळीच्या फराळाचे पदार्थ करण्यात

**दा. कृ सोमण**

दंग असतात. विविध प्रकारचे लाडू, चकली, कडबोळी, चिवडा, शंकरपाळे, शेव, अनरसे हे पदार्थ घरोघरी केले जातात. किंवा बाजारातून या पदार्थांची खरेदी केली जाते. दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव असतो. पणत्यांची किंवा आकाशकंदिलांची खरेदी केली जाते. काही मुले तर दिवाळीच्या आधी घरीच



साहित्य आणून आकाशकंदील करण्यात मग्न असतात. तर मुले दिवाळीनिमित्त क़िल्ले तयार करतात. दीपावली सण हा अंधाराला घालवून सारे घर प्रकाशमान करणारा असतो. म्हणून या सणाला 'प्रकाशाचा उत्सव' म्हटले जाते. दीपावली सणाचा उपयोग अज्ञान, आळस, अस्वच्छता, अंधश्रद्धा, अनीती यांच्या रूपात वावरणाऱ्या अंधाराला दूर करण्यासाठी करून घेतला जातो.

दीप म्हणजे दिवा ! 'दीप्यते दीपयति वा स्वं परं चेति' म्हणजे स्वत: प्रकाशतो किंवा दुसऱ्याला प्रकाशित करतो तो दीप अशी दीप शब्दाची व्याख्या केलेली आहे. दिवा हे अग्नीचे किंवा तेजाचेच एक रूप आहे. अंधकाराचा नाश करणारा दीप दीपावलीचा सण तेजोमय करीत असतो.

### दिवाळीचे दिवस !

गुरुद्वादशी हा श्रीदत्तात्रेयाचे एक अवतार श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या पुण्यतिथीचा दिवस आहे.या दिवशी दत्तमंदिरात दीपोत्सव केला जातो. भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे आपण दिवाळी साजरी करण्यापूर्वी आश्विन कृष्ण द्वादशीच्या दिवशी वसुबारस - गोवत्सद्वादशी साजरी केली जाते. या दिवशी वासरासह गाईची पूजा केली जाते. दिवाळीच्या सणाला आश्विन कृष्ण त्रयोदशीपासून म्हणजे धनत्रयोदशीपासून सुरुवात होते.

एका प्राचीन कथेमध्ये दीपदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी धनत्रयोदशीच्या दिवशी जो दीपदान करील त्याच्या कुटुंबात कुणालाही अपमृत्यू येणार नाही असे सांगण्यात आले आहे. गरिबांनाही दीप लावून दिवाळी साजरी करता यावी, यासाठी मुद्दाम या दिवशी दीपदान करण्यास सांगितलेले आहे. दीपाबरोबरच वस्त्रे, दिवाळीचे पदार्थ यांचेही दान करण्यात येते. भारतीय संस्कृतीत दानाला विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. डोनेशन म्हणजे दान नव्हे. डोनेशन देणाऱ्याचे नाव जाहीर करण्यात येते. दान हे गुप्तपणे दिले जाते.

आयुर्वेदाचा प्रवर्तक धन्वंतरी यांचा जन्म धनत्रयोदशीच्या दिवशी झाला. म्हणून धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी जयंती साजरी केली जाते. धन्वंतरीने आयुर्वेदाचे तेरा ग्रंथ लिहिले आहेत. या दिवशी ज्येष्ठ-श्रेष्ठ डॉक्टर्सना 'धन्वंतरी पुरस्कार' देऊन त्यांचा सत्कार केला जातो. व्यापारी या दिवशी आर्थिक हिशेब लिहिण्याच्या वह्या-रोजमेळ खरेदी करतात. धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्याचे दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू यांची स्वच्छता व निगा राखून त्यांची पूजा केली जाते. तसेच या दिवशी विष्णू, लक्ष्मी, कुबेर, योगिनी, गणेश, नाग,व द्रव्यनिधी या देवतांचे पूजन केले जाते.

### नरकचतुर्दशी

आश्विन कृष्ण चतुर्दशी चंद्रोदयाला असेल त्या दिवशी नरकचतुर्दशी असते. या दिवशी चंद्रोदयापासून सूर्योदयापर्यंत अभ्यंगस्नान करण्यास सांगितले आहे. थंडीच्या दिवसात आपल्या त्वचेला सुरकुत्या पडत असतात. तसेच थंडीत त्वचा कोरडी पडते. यावर अभ्यंगस्नान हा उत्तम उपाय आहे. शरीराला सुगंधी उटणे व तेल लावून मसाज केल्यानंतर गरम पाण्याने स्नान करणे यालाच 'अभ्यंगस्नान' म्हणतात. अभ्यंगस्नान केल्याने स्नायू बळकट होतात. त्वचा तेजस्वी होते.



नरकचतुर्दशी संबंधी एक पौराणिक कथा आहे. आश्विन कृष्ण चतुर्दशीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाने प्रजेला त्रास देणाऱ्या नरकासुर राक्षसाला ठार मारले. मरतेसमयी त्याने श्रीकृष्णाकडे एक इच्छा प्रकट केली,

आजच्या तिथीला जो अभ्यंगस्नान करील त्याला नरकाची पीडा होऊ नये. तसेच माझा हा मृत्युदिन सर्वत्र दिवे लावून साजरा केला जावा. त्यावर भगवान श्रीकृष्णाने 'तथास्तु' म्हटले. त्यामुळे नरकचतुर्दशीच्या दिवशी अभ्यंगस्नान करून दिवे लावण्याची प्रथा सुरू झाली. या दिवशी दीपदानही केले जाते.

### लक्ष्मी- कुबेरपूजन

आश्विन अमावास्या प्रदोषकाली असेल त्या दिवशी लक्ष्मी-कुबेर पूजन केले जाते. यादिवशी घरासमोर रांगोळी काढली जाते. याविषयी पुराणात एक कथा आहे. आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र फिरते. आपल्या निवासासाठी जागा शोधू लागते. जिथे स्वच्छता, सौंदर्य, रसिकता, उद्योगप्रियता असेल तेथे ती आकर्षित होते. तसेच ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, धर्मनिष्ठ, संयमी, सदाचारी, क्षमाशील, माणसे राहतात तेथे वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते. चांगल्या मार्गाने मिळवलेल्या आणि चांगल्या मार्गाने खर्च होणाऱ्या पैशालाच 'लक्ष्मी' म्हणतात.

### अलक्ष्मी निस्सारण

अलक्ष्मी ही दुर्भाग्याची आणि अशुभाची देवता मानली जाते. समुद्रमंथनातून लक्ष्मीच्या आधी अलक्ष्मी बाहेर आली म्हणून तिला लक्ष्मीची मोठी बहीण मानले जाते. समुद्रमंथनातून बाहेर आल्यावर तिने देवांना विचारले --- मी कुठे राहू ?

देवानी सांगितले की जिथे केरकचरा, अंधार आहे तेथे तू राहा. ज्या घरात कलह, अशांतता, असत्य व कठोर भाषण, गुरू -देव - अतिथी यांचा अनादर होतो तेथे तू

राहा. अलक्ष्मीचे वाहन गाढव असून तिच्या हातात झाडू आहे. घरात लक्ष्मी यावी आणि अलक्ष्मी घरात येऊ नये यासाठी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराबाहेरच अलक्ष्मीची शेणाची मूर्तीची पूजा करून ती घराबाहेर ठेवली जाते. तसेच अलक्ष्मी घरात येऊ नये यासाठी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घरात झाडूची पूजा केली जाते.



### बलिप्रतिपदा

कार्तिक शुक्ल प्रतिपदेच्या दिवशी बलिप्रतिपदा येते. या दिवशी विक्रम संवत् २०७३ किलकनाम संवत्सराचा प्रारंभ होतो. याला 'दिवाळी पाडवा' असेही म्हणतात. बलिप्रतिपदा हा दिवस साडेतीन मुहूर्तातील एक दिवस मानला जातो. या दिवशी पत्नी पतीला ओवाळते आणि त्याला शुभेच्छा देते. पती पत्नीला भेटवस्तू देतो. पतिपत्नीचे प्रेम वृद्धिंगत करणारा हा सण आहे. व्यापारी लोक या दिवशी शुभवेळ-शुभचौघडी पाहून पूजन केलेल्या वहीमध्ये हिशेब लिहिण्यास प्रारंभ करतात. महाराष्ट्रातील काही मंदिरांमध्ये 'अन्नकूट' केले जाते. प्रत्येक जण आपापल्या घरून एक खाद्यपदार्थ मंदिरात घेऊन येतो. आणि एकत्र बसून सर्वजण प्रसाद म्हणून खातात. सहभोजनाची ही पद्धत फार प्राचीन काळापासून महाराष्ट्रात चालत आलेली आहे. बलिप्रतिपदेच्या दिवशी आप्तेष्ट व मित्रांना मिठाई देऊन नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या जातात. नवीन विक्रम संवताच्या या पहिल्या दिवशी सकाळी मीठ खरेदी करण्याचीही प्रथा आहे. या दिवसाविषयीही एक कथा आहे. वामनाने बळीच्या डोक्यावर पाऊल ठेऊन त्याला पाताळात पाठवले. त्यापूर्वी वामनाने बळीला वर मागण्यास सांगितले, बळी म्हणाला....

देवा, केवळ लोककल्याणासाठी मी एक वर मागत आहे. या दिवशी जो दीपदान करील त्याला यमयातना भोगाव्या लागू नयेत. त्याच्या घरात लक्ष्मीचे कायमचे वास्तव्य असावे. यावर वामनाने तथास्तु म्हटले. म्हणून या दिवशीही दीपदान करण्याची प्रथा पडली. इंद्र पाऊस पाडतो अशी गोकुळवासीयांची समजूत होती. कृष्णाने गोकुळवासीयांना समजावले की, गोवर्धन पर्वतामुळे पाऊस पडतो, इंद्र पाऊस पाडीत नाही. त्यामुळे गोवर्धन पर्वताची पूजा केली पाहिजे. म्हणून सर्व लोक बलिप्रतिपदेच्या दिवशी गोवर्धन पर्वताची पूजा करू लागले. या दिवशी बळीचीही पूजा केली जाते.



### भाऊबीज – यमद्वितीया

कार्तिक शुक्ल द्वितीयेच्या दिवशी भाऊबीज असते. पुराणातील एका कथेप्रमाणे या दिवशी मृत्युदेव यम याने आपली बहीण यमी हिच्या घरी जाऊन तिला वस्त्रालंकार दिले. तिच्या घरी आनंदाने भोजन केले. भाऊबीजेचा हा सण भावा- बहिणीच्या मायेचा सण आहे. या दिवशी भाऊ बहिणीच्या घरी जातो. बहीण भावाला ओवाळते. भाऊ तिच्या घरी भोजन करतो. तिला भाऊबीज म्हणून भेटवस्तू देतो. या निमित्त भाऊबीजेच्या दिवशी तरी बहिणीच्या घरी जातो, सासरी गेलेल्या बहिणीला माहेराहून आलेल्या भावाच्या भेटीमुळे खूप आनंद होतो.

सामाजिक भान ठेवून गरिबांना मदत करण्याचे प्रमाणही वाढत आहे. सध्या दीपावलीच्या निमित्ताने अनेक शहरातून 'दिवाळी पहाट'सारखे संगीताचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत ही एक आनंदाची गोष्ट आहे. यामुळे अनेक कलावंतांना कलाप्रदर्शनाची संधी मिळते. शिवाय रसिकही तृप्त होतात. त्यांना आनंद प्राप्त होत असतो. तसेच वाचक - रसिकांची भूक भागवण्यासाठी दिवाळीच्या निमित्ताने शेकडो 'दीपावली अंक' प्रसिद्ध होत असतात. वाचकांना त्यामुळे कसदार साहित्य वाचावयास मिळते. आनंद प्राप्त होतो. दीपावलीचा सण येतो आणि जातो. माणसे दुःख - चिंता विसरतात. दीपावली सण साजरा करून आनंदित होत असतात. दीपावलीच्या निमित्ताने मोठी आर्थिक उलाढाल होत असते. अनेक हाताना कामे मिळत असतात.हा सण सर्वांना सुखी जीवन जगण्याची उमेद देत असतो.

**(लेखक संस्कृतीचे अभ्यासक आहेत.)**

# फटाके: जरा सांभाळून...

**फटाके फोडण्यापासून ते आकाश दिव्यांपर्यंत, शुभेच्छापत्रे, अंगणात चकाकी भरणाऱ्या रांगोळीपासून ते सुगंधी उटण्यापर्यंत निसर्गाने आम्हाला पर्यावरणस्नेही दिवाळी करण्यासाठी शेकडो पर्याय उपलब्ध केले आहेत. हे पर्याय नसून कृषी संस्कृतीशी नाळ जोडली गेलेली पर्यावरणस्नेही दिवाळी आहे. ही दिवाळी साजरी करताना पर्यावरणाचे भान सहज राखले जाऊ शकते.**



अनेक कुटुंबांनी 'फटाकेबंदी' अगदी मनापासून स्वीकारली आहे. परंतु दिवाळीच्या सर्व परंपरेमध्ये फटाक्यांच्या हव्यासाने दिवाळीचे स्वरूप विशेषत: लहान मुले तसेच वृद्ध वा आजारी लोकांसाठी अत्यंत त्रासदायक पर्व बनवले आहे. फटाक्यांच्या ज्वलनाने हवेत वाढणाऱ्या तरंगकणांनी श्वसनाचे आजार - दमेकरी लोकांसाठी एक महिना अत्यंत खडतर असतो. फटाके सर्वांनी एकत्र शक्यतो ठरावीक वेळात व मोकळ्या मैदानात वाजवले पाहिजेत. असुरक्षित फटाक्यांच्या हाताळणीने होणारे अपघात, आग लागण्यासारखे प्रसंग, भाजणे आदींसारखी दुखापत या सर्वांपासून दूर सुरक्षित दिवाळी साजरी करण्यासाठी दिवाळीचे फटाक्यांशी असलेले नाते दृढपणे आपण हळूहळू तोडून टाकले पाहिजे.

आपण दिवाळीत अनेकांना भेटवस्तू देतो.. त्या टाकाऊ कागदी वेष्टनात कशासाठी? झाडांचा नाश आणि कचऱ्यात वाढ. मग प्लास्टिकची पिशवी पर्यावरणाला घातक. कापडाच्या किंवा ज्यूटच्या आकर्षक पिशव्यांमधूनच आपण ही भेट दिल्यास ती पिशवी नंतर वापरात राहील.

'कंदील' हा रंगीत कागदापासून तयार करून लावण्याचा 'सृजनाचा' आनंद आहे, त्याला दीपाचे तेज आहे. पर्यावरण दक्षता मंचाने तसेच इतर अनेक संस्थांनी असे कागदी कंदील तयार करण्यासाठी कार्यशाळांचेही आयोजन केले. प्लास्टिकचा एकच कंदील वर्षानुवर्ष लावणे ही दिवाळीची संकल्पना नाही. तेलाच्या मोजक्या पणत्यांनी किंवा मेणाच्या पणत्यांनी आकर्षक सजावट करावी.

अंगणातील रांगोळीमधील रंग जितका भडक रंग तितके 'ॲक्टीव्ह केमिकल'... या सर्व रांगोळ्या फुलांनी, पाकळ्यांनी सजविल्यास अधिक आकर्षक वाटतील. फेसबुकवर धुंडाळल्यास अनेक रंगीत पानांनी बनवलेली डिझाइन्स.. परिसरातील पाने शोधून अविष्कृत केल्यास आपल्या अंगणातील रांगोळी इतरांचे आकर्षण ठरेल. दिवाळीच्या शुभेच्छांचीही एक मोठी बाजारपेठ आहे. आकर्षक दिसणारी व आकर्षक लिहिलेली भेटकार्डे पाठवणे ही आपली सवय .. खरंतर या काळात पोस्टमन व पोस्टावर इतका भार येतो की, दिवाळीच्या शुभेच्छा दिवाळी संपल्यानंतरच पोहोचतात, म्हणूनच नव्या तंत्रज्ञानाने इमेलच्या किंवा एसएमएसच्या माध्यमातून हलती बोलती चित्रयुक्त शुभेच्छा पाठवता येतील. निसर्गाकडे व नैसर्गिकतेकडे नेणारी दिवाळी - निसर्गनिर्मिती अनेक रंग, गंध व स्वाद यांचा आस्वाद घेण्यासाठीच निर्मिली आहे. मग कृत्रिम सेंट किंवा फवारे वापरून सुगंधी होण्यापेक्षा नैसर्गिक तेल, उटणे तसेच निसर्गनिर्मित वस्तूंच्या वापरांनीच दिवाळी अधिक सुंदर, सुगंधी व चविष्ट बनवता येईल.

**प्रा. विद्याधर वालावलकर**

(लेखक ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आहेत.)

# समृद्धीच्या स्मार्ट दिशा



**बचत हा गुंतवणुकीचा पाया आहे. गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून बचत हा उत्तम पर्याय नसला तरीही तत्काळ उपलब्धता आणि सुरक्षितता या दोन महत्त्वाच्या निकषांवर बचतीचे पारडे कायम जड राहिले आहे. गुंतवणूक करताना परतावादेखील तपासून पहिला पाहिजे. आपली गुंतवणूक चलनवाढीवर मात करू शकते का हे तपासणे महत्त्वाचे.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही सावंतांकडे लक्ष्मी पूजनाची जोरदार तयारी चालू होती. मात्र उत्साह नेहमी प्रमाणे दिसत नव्हता. पूजेच्या चौरंगावर सावंत उतरलेल्या चेहऱ्याने त्यांच्या गुंतवणुकीची फाइल ठेवीत असतानाच मी त्यांना त्यांच्या नाराजीच कारण विचारले. त्यांचे उत्तर अर्थात कुणालाही विचार करायला लावणार होते. सावंत तीनच वर्षांपूर्वी निवृत्त झाले होते. मिळालेली सर्व पुंजी त्यांनी निरनिराळ्या बँकेत मुदत ठेवींच्या स्वरूपात, तसेच वरिष्ठ पेन्शन योजना, पोस्ट आणि काही कंपनी मुदत ठेवीत गुंतवली होती. मात्र या तीन वर्षांत व्याज दरात जी मोठी कपात झाली होती त्याचा फटका सावंतांना बसलेला दिसत होता. तीन वर्षांपूर्वी मिळत असलेले वार्षिक ९.५०% व्याज आता ७.५०% वर आले होते. महागाई निर्देशांकात घट झाल्यामुळे रिजर्व बँकेने गेल्या दोन वर्षांत व्याजदरात कपात केली होती त्याचेच हे परिणाम. बर तसे म्हटले तर स्वस्ताई झालेली दिसत नव्हती. यंदाच्या वर्षी सावंतांची आवक कमी होणार हे स्पष्ट दिसत होते.

वरील उदाहरणातील सावंतांसारखे असे अनेकजण असतील ज्यांना घसरत्या व्याजदराचा फटका बसणार आहे. खरे तर मराठी मध्यमवर्गीय कुठलाही वायफळ खर्च न करता,

**अजय वाळिंबे**

काटकसर करून बचत करत असतात. मात्र आयुष्यभर बचत करूनही श्रीमंती काही दिसत नाही. परंतु खरी गोम इथेच आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बचत म्हणजे गुंतवणूक नव्हे.

### बचत आणि गुंतवणूक

खरे तर बचत सगळेच करतात अगदी एखाद्याकडे बँक खाते नसले तरीही घरात रोख रक्कम बचत करणारे आहेतच की. अर्थात बचत आणि गुंतवणूक यांत फरक असतो हे बरेच जणांना अजूनही माहीत नसल्याने, बचत म्हणजेच गुंतवणूक अशा गैरसमजात अनेक शहरी भागातील सुशिक्षितही आहेत सगळीच रक्कम बचत खात्यात किंवा अगदी मुदत ठेवीत ठेवणे म्हणजे तोटा किंवा नुकसानीची गुंतवणूक हे किती जणांना माहीत आहे?

बचतीतून गुंतवणूक आणि संपत्ती निर्माण करण्यासाठी गुंतवणुकीवरील परतावा चलन वाढीच्या दरापेक्षा जास्त हवा. म्हणजेच चलन वाढीचा सरासरी दर ९% असेल तर आपण केलेल्या गुंतवणुकीवरचा परतावा किमान वार्षिक १२ % तरी हवाच. पारंपरिक गुंतवणूक म्हणजे बँकेतील मुदत ठेवी ज्या सध्या साधारण ७.५०% ते ८.५०% वार्षिक दराने व्याज देतात. तर काही कंपनी मुदत ठेवी १०% व्याज देत असल्या तरीही आजही अनेक कंपन्या जेव्हा जनतेच्या मुदत ठेवी परत करू शकत नाहीत किंवा व्याजही देऊ शकत नाहीत तेंव्हा गुंतवणुकीचा हा मार्गदेखील धोकादायक आहे हे लक्षात येते. रोखे किंवा मुदत ठेवीतील गुंतवणूक प्रभावी ठरण्यासाठी व्याजदर चढे असायला हवेत. प्रत्यक्षात भारतासारख्या विकसनशील देशात चढे व्याजदर अर्थव्यवस्थेला मारक ठरत असल्याने ते दीर्घकाळ चढे राहू शकत नाहीत. गुंतवणुकीतून संपत्ती निर्माण करण्यासाठी किंवा भविष्याची तरतूद करण्यासाठी वार्षिक २०-२५ टक्के परतावा हवा. अर्थात अशा परतव्यासाठी गुंतवणुकीचा रास्त मार्गच अवलंबावा.



चलनवाढीवर मात करणारा परतावा केवळ म्युचुअल फंड अथवा शेअर बाजारातूनच मिळू शकतो हे आताशा बऱ्याच गुंतवणूकदारांच्या लक्षात येऊ लागले आहे. अर्थात तरीही बँक, पोस्ट ऑफिस, सोने, पतपेढ्या आणि चिट फंड्ज अशा पारंपरिक गुंतवणुकीच्या तुलनेत शेअर बाजार किंवा म्युचुअल फंडांतील गुंतवणूक नगण्य म्हणजे एकूण लोकसंख्येच्या केवळ २% आहे. अर्थात याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्यावर लहानपणी झालेले संस्कार. सुदैवाने आताशा



अभ्यासक्रमातही शेअर्स आणि म्युचुअल फंडांतील गुंतवणूक यांचा समावेश केला आहे. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज या दोन्ही एक्सचेंजतर्फे शेअर बाजाराविषयी विविध अभ्यासक्रम आणि उपक्रम राबवले जातात पण किती मराठी लोक यांचा फायदा घेताना दिसतात? मुळात अनेकांना शेअर बाजाराविषयी कुतूहल असले तरीही भीती पण आहेच. त्यामुळेच अजूनही बहुतांशी मराठी गुंतवणूकदार पारंपरिक गुंतवणूक करताना दिसतो.

### जीवन विमा म्हणजे गुंतवणूक नव्हे

गंमत म्हणजे अनेक गुंतवणूकदार आर्थिक वर्षाच्या शेवटाला केवळ कर वाचवण्यासाठी जीवन विम्यात किंवा युलिप्समध्ये पैसे टाकून त्याला गुंतवणूक समजतात. म्हणजे ही गुंतवणूक केवळ एक कर वाचवण्याचा सोपा

दिलेल्या) गुंतवणूक पर्यायांचा जरूर विचार करावा.

या पर्यायांत आपली गुंतवणूक कशी विभागावी हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरीही अशा वेळी राष्ट्रीय निवृत्ती योजनेचे (एनपीएस) मापदंड वापरावेत. म्हणजे एकूण गुंतवणुकीपैकी ५०% हिस्सा शेअर बाजारात किंवा इक्विटी म्युचुअल फंडांत गुंतावावा तर उर्वरित ५०% इतर पर्यायात गुंतवावेत. ज्यांना शेअर बाजारातील काही कळत नसेल त्यांनी सरळ म्युचुअल फंडांत गुंतवणूक करावी. म्युचुअल फंडातील एसआयपी म्हणजे दरमहा ठरावीक रक्कम एखाद्या योजनेत गुंतवणे. हे दीर्घकालीन गुंतवणुकीचे एक उत्तम साधन आहे. म्युचुअल फंडांतील दीर्घकालीन (१० वर्षे) गुंतवणूक निश्चित फायद्याची ठरू शकते. शेअर्स आणि इक्विटी म्युचुअल फंडातील दीर्घकालीन (एक वर्षावरील) गुंतवणुकीवरील



म्युचुअल फंडात करावी. तसेच केवळ कर्ज मिळते म्हणून दुसरी सदनिका घेऊन ती भाड्याने देण्याचा पर्याय चुकीचा आहे. कारण अशा गुंतवणुकीवर परतावा मिळतो तो केवळ २-३% आणि तो ही करपात्र! त्यामुळे रिअल इस्टेट हा गुंतवणूक पर्याय म्हणून टाळावा.

### गुंतवणुकीचे वय

खरे तर योग्य गुंतवणुकीला काळवेळ असे काही नसते. पण प्रदीर्घ गुंतवणूक उत्तम परतावा देत असल्याने वयाच्या पंचविशीत केलेली गुंतवणूक किंवा गुंतवणुकीचे योग्य नियोजन तुम्हाला निवृत्तीचे दडपण देत

| क्र. | गुंतवणूक पर्याय | कर | अपेक्षित वार्षिक व्याज/ परतावा % |
|---|---|---|---|
| १ | शेअर्स | १ वर्षावरील भांडवली नफा संपूर्ण करमुक्त | २५ |
| २ | करमुक्त रोखे | संपूर्ण करमुक्त | ७.२५-९ |
| ३ | सूचिबद्ध रोखे (डिबेंचर्स) | स्लॅब प्रमाणे व्याजावर कर लागू | ८-१० |
| ४ | निवडक कंपन्यांतील मुदत ठेव योजना | स्लॅब प्रमाणे व्याजावर कर लागू | ८-१० |
| ५ | म्युचुअल फंडातील इक्विटि योजना/ ईटीएफ | संपूर्ण करमुक्त | १२-२५ |
| ६ | सरकारी सुवर्णरोखे (गोल्ड बाँड्स) | व्याज कर प्राप्त परंतु मुदत संपल्यानंतरचा नफा कर मुक्त | २.७५ |
| ७ | राष्ट्रीय निवृत्ती योजना (एनपीएस) | २००,००० लाखापर्यंतची गुंतवणूक कर वजावटीसाठी प्राप्त | १२-१५ |
| ८ | पीपीएफ ( संपूर्ण कर मुक्त) | संपूर्ण करमुक्त | ८.३० |



प्रकार म्हणून केलली असते. मुळात जीवन विमा ही गुंतवणूक नसून ते केवळ एक सुरक्षा कवच आहे हे अनेक सुशिक्षितांना माहीत नाही. विमा एजंटदेखील संधीचा फायदा याच काळात उचलत असतात. खरे तर आता टर्म पॉलिसी ऑनलाइन मिळत असल्याने तुम्हाला एजंटची गरज नाही. तसेच आपण वारंवार अशा विविध विमा पॉलिसी घेऊन शेवटी नक्की काय मिळवत आहोत त्याचाही लेखाजोखा करायला हवा.

चलनवाढीवर मात करण्यासाठी तसेच काळाच्या ओघात टिकून राहण्यासाठी आपल्या पोर्टफोलियोमध्ये (चौकटीत

भांडवली फायदा तसेच लाभांश संपूर्ण करमुक्त असतो.

### रिअल इस्टेट मधील गुंतवणूक

हल्ली बहुतांशी घरांत पती- पत्नी दोघेही नोकरीत असतात. त्यामुळे गृहकर्ज काढून वीकेंडला मुंबई बाहेर राहण्यासाठी एखादे दुसरे घर घ्यावे असा विचार अनेकांच्या मनात येणे साहजिक आहे. मात्र असे घर घेतल्यानंतर आपण तेथे किती वेळा जाऊन येऊ शकू याचाही विचार करायला हवा. वयोपरत्वे प्रवासाचा उत्साह कमी होऊ लागतो. तसेच या घराच्या देखभालीचा खर्च करावा लागतो. त्यामुळे वीकएंड घरांचा विचार मध्यमवर्गीयांनी बाजूला ठेवावा. त्याऐवजी ही गुंतवणूक

नाही. अर्थात याचा अर्थ पन्नाशीत गुंतवणूक करू नये असा होत नाही. अनेकजण इतकी वर्ष काही केले नाही, आता उशीर झाला म्हणून गुंतवणूक करायची टाळतात आणि मुदत ठेव किंवा आवर्ती ठेव योजना अशा गुंतवणुकीचा मार्ग अवलंबतात. परंतु तुम्ही कुठल्याही वयात गुंतवणुकीचा उत्तम पर्याय निवडलात तर तो फायद्याचाच ठरतो. गुंतवणुकीचा कालावधी मात्र दीर्घ असावा. योग्य वेळी केलेले अचूक आर्थिक नियोजन म्हणूनच महत्त्वाचे. शुभस्य शीघ्रम!!

(लेखक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आहेत.)
संपर्क: ०९८१९९०८८९४

# समृद्ध भाषा, रुचकर भोजन

**माणूस खाण्यासाठी जगत नाही तर, जगण्यासाठी खातो आणि व्यक्त होण्यासाठी भाषा बोलतो. खाणं आणि बोलणं या दोन कामासाठी माणसाच्या तोंडाचा उपयोग होत असतो. आपण जे अन्न खातो त्याचा कस आपल्या रक्तात उतरतो. रक्तातून स्वभावात उतरतो आणि स्वभाव दिसतो तो शब्दशैलीतून.**


## डॉ.अनुपमा उजगरे


ऑस्ट्रो ह्या अमेरिकन प्राध्यापकाने एकाच विश्वविद्यालयातल्या एकाच वर्गातल्या पंचवीस विद्यार्थ्यांना कमीत कमी वेळात शंभर शब्द लिहायला सांगितले तेव्हा एकूण पाच हजार शब्द त्यांना मिळाले खरे, परंतु त्यात पुनरुक्ती बरीच असल्याचंही त्यांना आढळलं. त्यात एक विशेष गोष्ट त्यांच्या लक्षात आली ती अशी की, पुरुषांनी लिहिलेल्या शब्दांमध्ये अन्नवाचक शब्द त्रेपन्न होते तर स्त्रियांनी लिहिलेल्या शब्दांमध्ये ते एकशे एकोणऐंशी इतके होते. हा प्रयोग परदेशात झालेला असला तरी आपल्याकडे निदान महाराष्ट्रातही असंच असावं असं मला वाटतं.

### म्हणीत खाद्यसंस्कृती

'अन्नासाठी दाही दिशा फिरविशी आम्हा जगदीशा' म्हणत देवाला दोष देणारा माणूस समोर अन्न आलं की, 'अन्नासारखा लाभ नाही नि मरणासारखी हानी नाही' म्हणत सगळी कामधामं सोडून 'आधी पोटोबा मग विठोबा' म्हणत, अगदी पंचपक्वान्न समोर नसली आणि 'वेळंला केळं' असलं तरी पंचपक्वान्नाचं भोजन असल्यासारखं 'तोंड आहे की तोबरा?' असं कुणी हटकेपर्यंत 'ताव मारतो'. 'नगं नगं मला न् माझा जीव त्याला' असा संकोच काही तो बाळगत नाही. कारण 'पंक्तीस चुकला तो जेवणास मुकला!' पेशव्यांचा इतिहास सांगतो 'अन्न हे तर परब्रह्म!' मग त्याला कसं मुकायचं? मग भलेही कुणी 'अति खाणं नि मसणात जाणं' म्हणो!

'मागून खाणाऱ्याला महाग काय न् स्वस्त काय?' काहीच फरक पडत नाही. 'मागून खाई त्याला कमी नाही' हे सर्वश्रुत आहेच. 'रोडग्यासाठी जीव झाला कोडगा' अशी कबुली आवडत्या पदार्थासाठी द्यायला लोक कमी करत नाहीत.

'भिकेची हंडी शिंक्यास चढत नाही' ह्या म्हणीसारखी म्हण कष्टाचं महत्त्व बिंबवते आणि



'कष्टाचं खावं पण उष्टं खाऊ नये' ही म्हण समजूतदार शिकवण देते. 'पोट वीतभर कष्ट हातभर', 'रक्ताचं पाणी न् हाडाचा मणी', 'हंडी खाते खंडी, खापरी खाते सव्वा हंडी' अशा कष्टाच्या मानाने फळ अल्प असल्याचं सूचित करणाऱ्याही काही म्हणी आहेत. आपली शक्ती व्यर्थ वाया न घालवण्याच्या संदर्भात 'वालाला पाणी घालत बसू नको', 'लष्कराच्या भाकरी भाजू नकोस', 'पाण्याने वाती पाजळत नसतात' असा सल्ला चार पावसाळे पाहिलेली माणसं देत असत.

### मानवी स्वभावाचे विविध पैलू

माणसाचा स्वार्थी स्वभाव दाखवून द्यायचा असेल तर 'असतील शितं तर जमतील भुतं,' 'गूळ तिथे माशा', 'गुळावरल्या माशा नि साखरेचे मुंगळे', 'कामापुरता मामा न् ताकापुरती आजीबाई' अशा केवढ्या तरी



म्हणी आहेत. कामात दक्ष असलेल्यासाठी 'ज्याच्या शेताला ताटी, त्याच्या ताटी तुपाची वाटी' असं म्हटलं जातं तर, आळशी आणि कामचुकार माणसाचा उद्धार करायचा असेल तर 'खायला आधी, निजायला मधी नि कामाला अधीमधी', 'खायला काळ नि भुईला भार', 'बुधलाभर तूप खाऊन बुधल्याचा भार नाही', 'तोबऱ्याला पुढे लगामाला मागे', 'जिच्या कपाळी आढी ती काय वाढी?'अशा म्हणी कामी येतात.

'साखरेचा खाणार त्याला देव देणार' हे सत्य असलं तरी 'तापल्या तव्यावर पोळी शेकून' 'आपल्या पोळीवर तूप ओढून घेणारे' लोक गोड बोलून स्वतः मात्र काम करण्याचे कष्ट घेत नाहीत, त्यासाठी प्रसंगी 'ताकापुरतं रामायण' ऐकून घेण्याची आणि 'दुभत्या गाईच्या लाथा गोड' मानून घेण्याची तयारी ठेवतात आणि 'बोलण्यात साखर न् कामाला खापर' किंवा 'लाडं लाडं खाई हाडं' अशा म्हणींचे धनी होतात.

'तूप खाल्ल्याबरोबर रूप येत नाही' हे माहीत असूनही एखाद्याचा स्वभाव कितीही बदलायचा प्रयत्न केला तरी बदलला जात नसेल तर 'तुपात घोळलं, साखरेत लोळलं तरी कारलं कडू ते कडूच' असा अहेर मिळतो.

कर्जबाजारी असूनही 'उधारीचं पोतं न् सव्वा हात रितं' करायची काहींची नेहमीच तयारी असते.

'माय जेवू घालीना अन् बाप भीक मागू देईना' अशा वेळी 'वड्याचं तेल वांग्यावर' काढलं जाणं साहजिक असतं. 'भरल्या गाड्यास सूप जड नसतं', तसं आईवडील कितीही गरीब असले तरी त्यांना आपली मुलं भार होत नाहीत. अशक्य गोष्टी आपल्या मुलांनी करू नयेत म्हणून ते त्यांच्याशी बोलताना 'शिंक्याला आंबा नि खाली मारा बोंबा', 'मुंगी होऊन साखर खावी पण हत्ती होऊन लाकडं खाऊ नयेत', 'मांदेलीसाठी होडी बुडवू नये' (क्षुल्लक गोष्टीसाठी मोठं नुकसान सोसणं), 'डोंगरचे आवळे नि समुद्राचं मीठ', 'पाण्यात लोणी काढणं' किंवा 'लोण्याच्या पुऱ्या तुपात तळणं'(अशक्य गोष्ट करू बघणं) असा मोठा आशय सांगणाऱ्या म्हणींचा-वाक्प्रचारांचा उपयोग करतात.

कोणे एके काळी 'माय तशी बेटी नि गहू तशी रोटी' अशी समजूत असतानाही 'मुलगी पाहताना' 'भाकर पाहावी काठात अन् बायको पाहावी ओठात' असं धोरण पत्करलेलं असायचं. मुलीला बिचारीला काही मतच नसायचं. 'चुलीचं लाकूड चुलीतच जळणार' हे तिला परंपरेने ठाऊक असल्यामुळे 'पानात वाढलं तेच छपन्नभोग मानलं' अशा वृत्तीने तिने नांदायचं. नवरा मात्र 'बायकोला, घोड्याला नि भाकरीला फिरवावं लागतं' हे ओळखून असायचा.

'ओठात एक नि पोटात भलतंच' असं वागणाऱ्या माणसाची संगत 'धरलं तर चावतंय अन् सोडलं तर पळतंय' अशी असते. जगरहाटीचं काय, 'धीट खाई मिठाई अन् गरीब खाई गचांडी' ह्या म्हणीनुसार ती चालूच असते.



## स्वभावदर्शन

'तीळभर दुखणं न् मणभर कुंथणं', 'ताटाखालचं मांजर', 'चुलीपुढे शिपाई न् दाराबाहेर भागुबाई', 'बारा सुगरणी तरी कढी अळणी', 'उष्ट काढ तर, म्हणे जेवले किती?' 'खाऊ जाणे तो पचवू जाणे', 'खादड बसलं खायला नि हिंबटं बसलं वाढायला', 'आपलंतुपलं पारखलं नि खिरीवर तूप झटकलं', 'कोरांटीच्या वेलीला काकड्या', 'जिच्या घरी ताक, तिचंच वरती नाक', 'म्हशीनं रांधलं न् रेड्यानं खाल्लं', 'शिंकाळ्याचं तुटलं न् बोक्याचं फावलं' ह्या म्हणी स्वभावदर्शन करताना पुरेशा नाहीत असं कोण म्हणेल?

## नावातच सारे आहे...

नावात व्यक्तिमत्त्वाचं सार असतं तर आडनावात आपल्या कुटुंबाचा इतिहास लपलेला असतो. आपल्याकडे कधी जातीचा तर कधी व्यवसायाचा तपशील नुसत्या आडनावावरून कळू शकतो. मराठी आडनावं कुटुंबाची जात-पात, धर्म-संस्कृती, संस्कार आणि प्रादेशिकताही दर्शवतात. निवासदर्शक, व्यवसायसूचक, हुद्दासूचक, स्वभाव-सवयी-देहयष्टी- शारीरिक व्यंग, वस्त्राभूषणे, पशु-पक्षी, संख्यादर्शक, घरगुती वापराच्या वस्तू

अशी अनेक प्रकारची मराठी आडनावे आहेत. काही आडनावे जाहीरपणे उच्चारण्यास संकोच वाटावा अशीही आहेत. मराठी आडनावांची संख्या अंदाजे एक लाख पन्नास हजाराच्या घरात असावी असं म्हणतात.

### अन्नावरून नावे

अन्न शिजवतानाच्या प्रकारांवरून 'उकडे', 'तळेकर', 'तळणीकर', 'भाजे', 'भाजेकर', अन्नपदार्थांवरून 'भाकरे', 'भाजीभाकरे', 'धोंडस', 'आंबिले', 'आंबुलकर', 'आमटे', 'कढीखाये', 'काटेखाये', 'भजे', 'भजेकर', 'कालवणकर', 'वरणकर', 'वरणगावकर', 'श्रीखंडे', भातात 'भाते', 'भातकांडे', 'भातखंडे', 'भातखळकर', 'भातणकर', 'भातंबरेकर', 'भातुसे', 'शितभाते', 'वडाभात', 'भगर' आणि फराळातील 'चिरोटे', 'करंजीकर', 'पेठे', 'बरफे', 'फेणे', 'मांडे', 'खाजे', 'खिरीकर', 'शेवकर', 'शेवगावकर', 'घारगे' ही आडनावं येऊन बसली आहेत.

## भाषेचा मळा



**पालेभाज्या-फळभाज्यांवरून 'घोसाळे', 'कोहळे', 'कारले','कार्लेकर', 'भोपळे', 'भेंडे', 'मायाळू', 'कांदे', 'चाकवते', 'कोथमिरे', 'कोथिंबिरे', 'तोंडले', 'टोडके', 'पडवळ', 'पडवळकर', 'सरपडवळ', 'शिराळे', 'डिंगरे', 'गाजरे', 'काकडे', 'मुळे', 'कणसे', 'शेंगे', 'गवारे' , 'खिरे', 'वालमोडे', 'वालकर' 'वांगे', 'वागीकर' ह्यांनी भाषेचा मळा फुलवलाय.**

### तेलातुपावरून नावे

तेला-तुपावरून तर केवढी तरी आडनावं आढळतात'तेली', 'तेलगुडे', 'तेलतुंबडे', 'तेलमोरे', 'तेलरांधे', 'तेलंग', 'तेलवणे', 'तुपे', 'तूपकर', 'तूपदाळे', 'तूपलोंढे', 'तूपसाखरे', 'तूपविहिरे', 'तुपट' आणि दुधदुभत्यावरून 'दुधे', 'दुधाटे', 'दुधाणे', 'दुधाटे', 'दूधकर', 'दूधमोगरे', 'दूधसागर', 'दूधवडकर', 'दूधवडेकर', 'दूधभाते', 'दूधगावकर', 'दहीकर', 'दहीफळकर', 'दहीफळे', 'दहीवाले', 'दहीभाते', 'दहीवडे', 'दहिवाडकर', 'दहीबावकर', 'ताकमागे', 'ताकमोगे', 'ताकसांडे', 'ताकवले', 'ताकवाले', 'ताकभाते' अशी आडनावं दिसतात.

चवीवरून 'कडू', 'गोडे', 'आंबटे', 'आंबटकर', 'गोडसे', 'गोडांबे', 'गोडकर' आहेत तर गूळ-साखरेशी संबंधित 'गुळवे', 'गुळवणी', 'गुळवणे', 'गुळदगड', 'गुळेदगड', 'गुळदगुड्डकर', 'गुळदगुड्ड', 'गुळेदगुड', 'गुळंबे', 'साखरे', 'साखरदांडे', 'साखरपेकर' अशी आडनावं आहेत.

स्वभावावरून 'गोडबोले', 'भुकेले', 'चाटे' आणि फळांवरून 'फळ', 'आंबे', 'आंबेकर', 'आंबेगावकर', 'बाठे', 'केळकर', 'केळवणकर', 'केळवकर', 'केळेकर', 'कवठे', 'कवठेकर', 'करवंदे', 'केरवे', 'नारिंगे', 'आठळे', 'बोरे', 'बोरकर','बोरीकर', 'बोरवणकर','बोरकुटे', 'फणसे', 'डाळिंबे', 'ताडफळे', 'ताडीवाले', 'जांबे', 'जांभळे', 'जांभुळे', 'जांभुळकर', 'आवळे', 'डांगरे' ह्या आडनावांचा उगम झालाय.

धान्यावरून 'जोंधळे', 'गव्हाणे', 'गव्हाळे' तर कडधान्यावरून 'तूरकर', 'मसुरे', 'मसुरकर', 'डाळे', 'वाटाणे', 'घुगरे', 'चणे', 'चणेचोर', 'घेवडे', 'घाटे', 'फुटाणे','भडंगे', 'शिंगाडे', 'मूगगिळे' आपल्या समोर येतात.

मसाल्याच्या पदार्थातील 'खोबरे', 'खोबरेकर', 'खोब्रागडे', 'नारळे', 'नारळीकर', 'जायफळकर', 'रातांबे', 'मिरे', 'मेथे', 'मोहरीर', 'मिरगुंडे','हिंग', 'हिंगमिरे','हिंगोणेकर', 'हळदे', 'हळदकर', 'हळदणकर', 'हळदीपूर', 'हळदीपूरकर', 'हळकुंडे', 'जगधने', 'चिंचोलीकर', 'चिंचलीकर', 'चिंचाळकर',

'सुंठे', 'सुंठणकर', 'मिठे', 'मिठबावकर', 'लवंगे', 'लवंगारे' आणि मुखवासाच्या पदार्थातील 'वेलदोडे', 'सुपारीवाले', 'तांबोळी' ही अत्यावश्यक आहेत.

### मिठाचे महत्त्व

अन्नात मिठाला अनन्यसाधारण महत्त्वाचं स्थान आहे. भाषेनेही हे महत्त्व ओळखून 'मिठाला जागणं' (कृतज्ञता बाळगणं), 'मिठाची गुळणी धरणं' (मौन बाळगणं), 'मीठ चोळणं' (मनाला लागेल असं बोलणं), 'मीठ-मिरची लावून सांगणं', 'मीठ तोडणं' (उपजीविकेचं साधन बंद करणं), 'मीठ-मोहऱ्या ओवाळणं' (नजर काढणं), 'मिठा-पिठाला बरकत असणं', 'पिठात मीठ घालणं' (श्रमात सहभाग देणं) अशा वाक्प्रचारांनी मिठाला न्याय दिलेला आहे.

शाकाहारीबरोबरच मांसाहाराशी संबंधित आडनावांचं स्वागत झालेलं दिसतं. खाद्यसंस्कृती कशालाच मज्जाव करत नाही, ह्याचं उदाहरण पाहायचं झाल्यास 'झिंगे', 'कालवे', 'सारंग','सुकटे', 'मत्स्यावार', 'बकरे', 'बोकड', 'बोकडे', 'सांड', 'डुकरे', 'कोलंबे', 'होले', 'शिकारखाने', 'खाटिक' ही आडनावं पाहा.

याखेरीज 'अन्नपूर्णे', 'अन्नापुरे', 'अन्नदाते', 'सदावर्ते', 'पूर्णपात्रे', 'भोजने', 'जेवणे', 'जेऊघाले', 'उपासे', 'उपाशी', 'खरकटे', 'खानावळवाले', 'सहस्रभोजने', 'सगळगिळे', 'चहांदे','अमृते', 'अमृतकर', 'भाजीपाले', 'सब्जीवाले', 'पोटे', 'पोटफोडे', 'पोटभरे' आणि भांड्याकुंड्यांशी संबंधित 'पराते', 'तांबे', 'लाटणे', 'चिमटे', 'सराटे', 'सरोते', 'पाटकर', 'पाटे', 'पाटेकर', 'ताटे', 'तांबे', 'गडवे', 'सहाणे', 'सालकाढे' अशी किती आडनावं सांगावीत!

या लेखातील निवडक मराठी भाषेतल्या म्हणी-वाक्प्रचारांवर आणि आडनावांवर नुसती नजर टाकली तरी खाद्यसंस्कृतीने भाषादेखील किती समृद्ध केली आहे, ह्याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

**(लेखिका खाद्यसंस्कृतीच्या अभ्यासक आहेत.)**

# सायबर फसवणुकीपासून सावधान

**सध्या समाजात अनेक क्षेत्रांमध्ये घडत असलेल्या सायबर गुन्ह्यांमध्ये ऑनलाइन खंडणी वसूल करण्याचा गुन्हा अर्थात रॅन्समवेअर (खंडणी मागण्यासाठी वापरले गेलेले सॉफ्टवेअर ) हा सर्वात अग्रक्रमांकावर आहे. आज या घडीला या गुन्हेगारांना आणि या गुन्ह्याला थोपवण्यासाठी उपयुक्त असा उपाय जागतिकस्तरावर कुठल्याही देशाकडे नाही, ही वस्तुस्थिती आहे.**

दहा दिवसांपूर्वी माझ्याकडे एक राजकीय-उद्योजक व्यक्ती भेटण्यास आली होती. त्यांच्या कार्यालयात असणाऱ्या एकूण १५ संगणकांना एनक्रिप्ट (कूटबद्ध पद्धतीने सर्व डेटा अर्थहीन करून वापरणाऱ्यासाठी निरुपयोगी करणे) कुठलीही फाईल उघडल्यास त्यात असलेला मजकूर न दिसून त्यात न समजणारे शब्द आणि चिन्हे (.%,*)दिसत होती. तसेच प्रत्येक संगणकामध्ये फक्त एकच चित्र असलेली फाईल दिसत होती.कुणालाही धक्का बसेल असा मजकूर त्यावर होता ३०० बिटकॉइन इतकी रक्कम अदा केल्यास तुमचा डेटा सुखरूपपणे डिक्रिप्ट (उकल) करून तुम्हाला दिला जाईल अशाप्रकारे सायबर गुन्हेगारांचा ऑनलाइन खंडणी वसूल करण्याचा जागतिक व्यवसाय झाला आहे. त्या राजकीय नेत्याला मात्र सुरुवातीला असे वाटले की, त्यांच्या कुणी विरोधकांनी केलेला डाव असावा.

महत्त्वाचे म्हणजे त्या नेत्याच्या कार्यालयातील आय. टी. विभागात काम करणाऱ्या स्टाफने गेल्या सहा महिन्यापासून कुठल्याच डेटाचा बॅकअप घेतलेला नव्हता. त्यामुळे त्यांची परिस्थिती अतिशय बिकट झालेली होती. त्या डेटामध्ये या नेत्याच्या आर्थिक व्यवहाराची सर्व गोपनीय माहितीचा समावेश होता; जो सध्याच्या घडीला संपूर्णपणे अर्थहीन झालेला. राजकारणाच्या कामासाठी जो डेटा वापरला जात होता तोही चोरी झाल्याचा आभास होत होता. यासर्व गोष्टींमुळे हा नेता अत्यंत त्रस्त झाला होता.

अनेक प्रकारचे रॅन्समवेअर सध्या कार्यरत आहेत.त्यातलाच एक लॉकी व्हायरस. हा एक अशा प्रकारचा व्हायरस आहे जो इ-मेल अटॅचमेंटद्वारे बनावट पावती करून तुमच्यापर्यंत येतो. त्यानंतर हा व्हायरस सर्व संगणकामधील माहिती काही चिन्हांमध्ये रूपांतरित (जसे की) करून एन्क्रिप्ट करून त्या डेटाला अर्थहीन करतो. अशा वेळी, तुम्ही केवळ जे. पी. जी. (चित्र असलेली फाईल) फाईल संगणकामध्ये उघडू शकता.या जे. पी. जी. फाईल मध्येच खंडणी वसुलीबाबतच्या सूचना नमूद केलेल्या असतात आणि ही खंडणी बिट कॉइन्समार्फत वसूल




केली जाते. खंडणीचे पैसे दिले गेल्यानंतर तुमची हार्ड डिस्क पुन्हा पूर्ववत डिक्रीप्ट (उकल) करून अर्थपूर्ण केली जाते.

रॅन्समवेअरच्या अटॅक पासून वाचण्यासाठी

**ॲड. प्रशांत माळी**

काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. त्या खालीलप्रमाणे आहेत

- आपल्या डेटाचा नियमितपणे बॅकअप घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
- आपल्या इमेल वर येणाऱ्या अनोळखी इमेल उघडून त्यातील जोडप्रती, उघडू नये किंवा त्यात नमूद केलेल्या कुठल्याही लिंकवर क्लिक करू नये.
- फिशिंग इमेल म्हणजे, बँकेमधून आलेल्या इमेलसारखा दिसणारा हा मेल असतो, ज्यामध्ये एखाद्या संकेतस्थळाची लिंक दिलेली असते. या संकेतस्थळाच्या लिंकवर क्लिक करताक्षणी रॅन्समवेअर संगणकात व नंतर नेटवर्कवर प्रसारित होतो.
- सायबर गुन्हेगारांकडून 'इन्वॉइस' असा विषय असलेला इमेल केला जातो. आपण इमेल उघडून ही अटॅच्ड फाईल डाउनलोड केली, की फाईलमध्ये दडलेला रॅन्समवेअर व्हायरस आपोआप आपल्या संगणकात इन्स्टॉल होतो. एकदा का हा व्हायरस आपल्या संगणकात शिरला की, आपल्या संगणकातील सारी गुपित माहिती सायबर गुन्हेगारांपर्यंत आपल्या नकळत इंटरनेटच्या माध्यमातून पोहोचते. ज्या सायबर गुन्हेगाराकडे या व्हायरसचे नियंत्रण आहे तो, जेव्हा त्याला या रॅन्समवेअरला कार्यरत करायचे असेल; तेव्हा तसे आदेश इंटरनेटद्वारे देतो. हा रॅन्समवेअर व्हायरस मग आपल्या हार्ड डिस्कला इनक्रिप्ट करून खंडणीची मागणी करतो.
- यू.एस.बी पेन ड्राइव्हज किंवा मेमरी कार्डवरून फाइल्स हस्तांतरित करताना किंवा टोरंटवरून चित्रपट अथवा अन्य कुठलीही फाईल डाउनलोड करताना देखील हा रॅन्समवेअरचा व्हायरस संगणकात प्रवेश करतो. त्यामुळे काही प्राथमिक गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.

(लेखक सायबर सुरक्षा व सायबर कायदातज्ज्ञ आहेत.)
संपर्क:०९८२१७६३१५७





# दिवाळीतील किल्ले

**दिवाळी सुरू झाली की, मुलांना वेध लागतात ते किल्ले बनवण्याचे. ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा असलेल्या महाराष्ट्रातील बालमनावर शालेय जीवनापासूनच ऐतिहासिक किल्ल्यांचा पगडा बसलेला असतो. त्यातूनच त्यांच्या कल्पनेतून व त्यांच्या भावविश्वातून स्वतः निर्माण केलेले किल्ले वेगळी प्रेरणा देणारे ठरतात. ऐतिहासिक काळापासून किल्ले बनवण्याची परंपरा सांगितली जाते. २०० ते ३०० वर्षानंतर आजही ही कला जोपसण्याचे काम बालवयात कायम राहिले आहे. दिवाळीतील किल्ले त्यामुळेच एक अविभाज्य असा भाग बनून गेला आहे.**

पश्चिम महाराष्ट्रात रायगड, प्रतापगड, पन्हाळागड अशा अनेक किल्ल्यांची परंपरा आहे. हे किल्ले म्हणजे भारताच्या इतिहासातील एका ज्वलंत संघर्षाचे आणि देशवासीयांना मुक्त करण्यासाठी त्या काळच्या लढाऊ बाण्याने लढलेल्या शूरवीरांची गाथाच आहेत. विशेषतः शालेय जीवनात प्रत्येक विद्यार्थ्यांने शिवाजी महाराज व त्यांच्या लढाऊ मावळ्यांपासून वेगळी प्रेरणा घेतलेली असते. मुगलांशी संघर्ष करत असताना शिवाजी महाराजांपासून अनेक राजांनी स्वराज्य स्थापनेसाठी किल्ले बांधले. हे किल्ले म्हणजे तत्कालीन लढाईच्या रणनीतीचे वेगळे नमुने ठरले आहेत. प्रत्येक किल्ल्याची रचना ही त्या प्रांताच्या संरक्षणासाठी निर्माण केलेली त्या काळची एक राजधानी होती. अशा राजधानीच्या संरक्षणासाठी बांधकामातील ज्या क्लुप्त्या वापरल्या गेल्या त्या आजही थक्क करणाऱ्या आहेत. त्या काळच्या विचारांची साक्ष देणाऱ्या या वास्तू आहेत. भविष्याचा वेध घेत ज्या पद्धतीने या किल्ल्यांची रचना झाली आहे, ती रचना आज स्थापत्यशास्त्राच्या इतिहासात एक आदर्श नमुना ठरला आहे. असे किल्ले

**संजय खूळ**

बालकांना शालेय वयापासूनच बघण्याची संधी मिळून जाते. त्यामुळेच असे किल्ले निर्माण करण्याचे वेध मुलांना लागतात.

### माती व दगडाचा वापर

किल्ले बनवण्यासाठी दिवाळीचा कालावधी हा नैसर्गिकदृष्ट्या योग्य असतो पावसाळ्यामध्ये खुल्या जागेत किल्ले बनवणे शक्य नसते तर उन्हाळ्यात तयार केलेला माती व दगडाचा किल्ला फारसा टिकत नाही. त्यामुळे हिवाळ्याचा काळ हा योग्य असतो. याला काही ऐतिहासिक संदर्भ सांगितले जाते. इतिहासात लढाईला जाताना दसऱ्याला सीमोल्लंघन करून बाहेर पडायचे व ऐतिहासिक कामगिरी करून दिवाळी साजरी करायची अशी ही परंपरा सांगितली जाते. शैक्षणिक वर्षातील निम्मे वर्षे परीक्षा देऊन संपल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव असतो. त्यामुळेच दिवाळीच्या सुट्टीत किल्ला हे समीकरण निश्चित झालेले असते. परीक्षा संपली की, दुसऱ्या दिवशी बालचमूंची किल्ले बांधण्यासाठी तयारी सुरू होते.

पश्चिम महाराष्ट्रात किल्ले, मराठवाड्यात दिवाळीच्या काळात वाडे तर कोकण भागात दगडी घराच्या उंबऱ्यावरवरील बाजूस मातीपासून देवी देवता बनवण्याची पद्धत आहे. मराठवाड्यात मातीचा वापर करून जुन्या वाड्यांची प्रतिकृती, पांडवलेणी तयार केली जाते. या काळात गवताचे व कुरडूचे तुरे मोठ्या प्रमाणात शेतामध्ये आले असतात.



त्यामुळे त्याचाच वापर या प्रतिकृतीमध्ये केला जातो. पश्चिम महाराष्ट्रातील किल्ल्यांचा डौल वेगळा असतो. प्रत्येकांच्या डोळ्यासमोर किल्ल्याची रचना ठरलेली असते. किल्ला कसा असावा, त्या किल्ल्यावर कोणता प्रसंग सादर करावा, सैनिक, पक्षी, प्राणी हे कोठे वापरावेत, जंगल व झाडे दाखवण्यासाठी कोणत्या धान्याचा वापर करावा जेणेकरून त्याची रोपे तत्काळ किल्ल्यावर डोलू लागतील यासाठी चर्चा होते. बालवयातच ऐतिहासिक प्रेरणेबरोबरच त्यांच्या सुप्त कलागुणांनाही या माध्यमातून वाव मिळतो.

प्रतापगड, रायगड, पन्हाळा हे किल्ले तर सिंधुदुर्ग, जंजिरा हे जलदुर्ग, बालमनाच्या कल्पनेतून साकारले जातात. दगड, माती आणि वीटेचा वापर करून मुले किल्ल्याची प्रतिकृती बनवतात. किल्ला, त्याचा दरवाजा, बुरूज, प्रवेशद्वार, तटरक्षक भिंत असे अनेक घटक यामध्ये समाविष्ट केले जातात. वाघ, सिंह, घोडे, हत्ती, मावळे, शिवाजी महाराज यांच्या प्रतिकृती बाजारातून खरेदी केल्या जातात. एकदा किल्ला तयार झाला की, कोणत्या ठिकाणी कोणास स्थान द्यायचे या कल्पनेला अनेक फाटे फुटत जातात. वेगवेगळ्या कल्पनेतून, आणण्यात आलेल्या वस्तूंचे स्थान निश्चित करण्यात येते. प्रत्येक किल्ल्यावर शिवाजी महाराजांची प्रतिकृती अविभाज्य घटक असतो. कधी त्यांच्या राज्याभिषेकाचा सोहळा गडावर साकारला जातो, तर कधी मुगलांशी सुरू असलेली लढाई या किल्ल्यावर साकारली जाते. गडाभोवती किंवा गडावर जंगल आणि झाडी दाखवण्यासाठी हाळीव व मोहरींच्या बियांचा वापर केला जातो. या वनस्पती अल्प कालावधीत वाढत असल्यामुळे किल्ल्याच्या सौंदर्यात एक वेगळी भर पडते.

## कल्पकतेला वाव

अलीकडच्या काळात शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक प्रकल्पांचा समावेश मोठ्या प्रमाणात असतो. अशा या ऐतिहासिक किल्ल्यावर विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापरही केला जातो. यातूनच पाण्यांचा उपसा, फवारा, धबधबा, गडावर पवनचक्की फिरणे असे सादरीकरण दिसते.

किल्ला बनवण्याचा वेध एवढा लागलेला असतो की, सकाळी उठली की, मुलांचा पहिला कार्यक्रम हा किल्ल्याभोवती जमणे असाच असतो. माती आणि विटांच्या वापराबरोबरच अलीकडच्या काळात विद्यार्थी वह्यांच्या पुठ्ठ्यांचा वापरही वेगवेगळ्या प्रतिकृती तयार करण्यासाठी करतात. या पुठ्ठ्यांना रंगीबेरंगी कागद व रंगाचा वापर केला जातो. तयार झालेल्या किल्ल्याला झळाळी मिळते ती रोषणाईची. ही रोषणाई मेणबत्त्या आणि पणत्यांचा वापर करून तर अलीकडच्या काळात विद्युतमाळांचा वापर करून केली जाते. रात्रीच्या वेळी मंद दिव्यांनी किल्ल्याचा थाट हा प्राचीन काळाची आठवण करून देतो.

## किल्ले स्पर्धा

मुलांच्या या कल्पकतेला प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या प्रमाणात किल्ल्यांची स्पर्धा घेण्याची प्रथा वाढली आहे. मुलांना यातून एक वेगळी प्रेरणा मिळते. आपला किल्ला अधिक आकर्षक व्हावा व त्यात प्राचीन तंत्रज्ञानाचा वापर वेगळ्या पद्धतीने दाखवता यावा यासाठी त्यांची धडपड सुरू राहते. विविध मंडळाच्या वतीने मुलांच्या या स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसे जाहीर केली जातात. त्यामुळे विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा आजही कायम आहे.

बदलत्या मनोरंजनाच्या माध्यमात अनेक पारंपरिक प्रथा लुप्त होत चालल्या आहेत. अनेक ग्रामीण भागातील खेळ फक्त चित्रापुरतेच उरले आहेत. याला अनेक गोष्टी कारणीभूत ठरत आहेत. या किल्ल्यांच्या माध्यमातून एक प्रगल्भ इतिहास मुलांसमोर उभा राहतो. त्याचबरोबर देशप्रेम आणि एकोप्याची भावना वाढत जाते. काही शाळांमध्ये शालेयस्तरावर अशा स्पर्धांना प्रोत्साहन दिले जात आहे. तर उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांची प्रतिकृती साकारून त्यांचे ऐतिहासिक महत्त्व लिहिले जात आहे. अशा उपक्रमातून इतिहासाची ओळख भक्कम करण्याच्या प्रयत्नाबरोबरच वीरपुरुषांची गाथा मुलांच्या मनामध्ये बिंबवण्यासाठी पाठबळ मिळत आहे. यासाठी दिवाळीतील किल्ला हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

(लेखक दै. सकाळ वृत्तपत्र समूहात इचलकरंजी येथे प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत.)
संपर्क : ०९८८११२९२७१










**महाराष्ट्र माझा**
**छायाचित्र स्पर्धा २०१६**

**महाराष्ट्र माझा छायाचित्र प्रदर्शनातून बदलत्या महाराष्ट्राचे प्रतिबिंब उमटले. या प्रदर्शनासाठी राज्यातून मोठा प्रतिसाद मिळाला. सुमारे ३८०० छायाचित्रे या स्पर्धेत सहभागी झाली होती.**












## विजेते

१ देवदत्त कशाळीकर

२ विद्याधर राणे

३ दिनेश भडसाळे

## उत्तेजनार्थ

अ सचिन मोहिते

ब अशोक पाटील

क चंद्रकांत पाटील

ड शरद पाटील

इ सतीश काळे









# नयनरम्य गौताळा...

**अजिंठ्याच्या डोंगररांगात म्हणा किंवा सातमाळ्याच्या रांगात २६०.६१ चौ. किमी. परिसरात असलेले गौताळा मराठवाड्यातील सर्वात मोठे अभयारण्य. बिबट, हरिण, काळवीट, नीलगाय, सायळ या ठिकाणी आढळतात. औरंगाबादपासून ७५ किमी. अंतरावर असलेले हे अभयारण्य कन्नड तालुक्यात येते. निसर्गसहलीसाठी आवर्जून भेट द्यावे असे हे ठिकाण. डोंगरदऱ्यांच्या कपारीतून वाट काढत, उंचावरून कोसळणारे धबधबे, उंचचउंच डोंगर डोळ्याचे पारणे फेडतात.**

गौताळा अभयारण्याची १९८६ साली स्थापना झाली. कन्नड तालुक्यातील १७ गावातील वनक्षेत्राचा या अभयारण्यात समावेश होतो. कन्नडपासून अवघ्या १५ कि.मी. अंतरावरच अभयारण्य सुरू होते. तर चाळीसगावपासून २० कि.मी अंतरावर एक फाटा आहे. त्या फाट्यापासून सरळ गेल्यास गौताळा अभयारण्याचे प्रवेशद्वार लागते. तिथे एक चौकी आहे. चौकीत नोंद केल्यानंतर आत प्रवेश मिळतो. अभयारण्यात पायी अथवा वाहनाने फिरता येते. वन विभागाने उपलब्ध करून दिलेल्या काही ठिकाणी अतिशय चांगल्या प्रकारचे ट्रेकिंग ट्रॅक पर्यटकांना आकर्षित करतात.





### आनंददायी व आल्हाददायक

पर्यावरण व निसर्गप्रेमींना आनंददायी, आल्हाददायक असा परिसर अभयारण्यात अनुभवयास मिळतो. पावसाळ्यात हिरवाईने नटलेला परिसर, पक्षांचे आवाज मनाला प्रसन्न करून टाकतात. हा परिसर, अध्यात्मिक आनंद देतो.

### ऐतिहासिक स्थळे

चंडिका देवीचे मंदिर व अन्य प्राचीन मंदिरे याठिकाणी पाहावयास मिळतात. शक्तीची देवता असणाऱ्या चंडिका देवीचे मंदिर अभयारण्याच्या सीमेतच आहे. नवरात्रात याठिकाणी भाविकांची मोठ्या

**श्याम टरके**

प्रमाणात गर्दी होते. वनातील पितळखोऱ्याच्या प्रसिद्ध लेणीसमोर एकेकाळी साधे, पवित्र जीवन जगणाऱ्या बौद्ध भिक्षूंचा निवास याच वनात होता. चंडिका देवी मंदिरापासून काही मीटर अंतरावरच ११ व्या शतकात सिद्धांत शिरोमणीसारखे गणितावरील मूलभूत ग्रंथ लिहिणारे थोर गणिती आणि खगोलतज्ज्ञ भास्कराचार्यांचे पीठ आहे. भास्कराचार्यांचे वास्तवही या वनात होते.

### जैवविविधता

अनेक प्रकारची झाडे, वनौषधी याठिकाणी आहेत. चंदनाच्या वनामधून वाहणारा चंदननाला आहे. या नाल्याच्या काठालाच अनेक प्राण्यांची ये-जा अनुभवता येते. काठावरच पोपट, मोर दिसतात. विविध रंगांचे पक्षी मनाला मोहित करतात. रानभाई, सुगरण, बिबट्या, लांडगा, कोल्हा, नीलगाय, सायाळ, वानर, घोरपड आणि साप या प्राण्यांसह २०० हून अधिक पक्षांच्या प्रजातींची नोंद या अभयारण्यात आहे. बुलबुल, कोतवाल आणि चंडोल, गरुड, भारद्वाज, धनेज, पोपट, हरियाल आदी पक्षी येथेच दिसतात. नाल्यानंतर दाट जंगलाने हिरवाईचा अविष्कार आपणाला भुलवतो.

पुढे मारुतीचे मंदिर आहे. या मंदिरासमोरच गौताळा तलाव आहे. तलावाच्या सभोवतालचा संपूर्ण परिसर गवताळ आहे. मारवेल, पवण्या, गोडाळ, चारवळ, कुसळी, बेटेगवत, कुंदा, शहाडा, शिंपी आदी गवतांच्या प्रजाती येथे दिसतात. पूर्वी या ठिकाणी गवळी लोक राहत. त्यांच्या गाई याच परिसरात चरत. त्यावरूनच या परिसराला गौताळा नाव पडले असावे. अन् तेच पुढे अभयारण्यालाही.

कन्नड, चाळीसगाव, नागद वनपरिक्षेत्राचा समावेश अभयारण्यात आहे. सीताखोरी, सीता नान्ही, गौतम ऋषी मंदिर, केदार कुंड, धवलतीर्थ हेही येथे पाहण्याजोगे असेच आहे. उन्हाळ्यात अभयारण्यातील पक्षांना, प्राण्यांना पाण्याची चणचण भासते. परंतु तरीही निसर्गाच्या साहाय्याने तयार झालेल्या नैसर्गिक पाणवठ्याशिवाय वन्यजीव विभागातर्फे पाणवठ्यांची व्यवस्था करण्यात येते. यंदा २२ कृत्रिम पाणवठे वन्यजीव विभागामार्फत तयार करण्यात आले. वनपरिक्षेत्रात पाणीसाठ्यासाठी विविध कामे करण्यात आली. येथूनच जवळ असलेल्या उपलखेडा या ठिकाणी डोंगरावर समतल चरखड्डे २५ हेक्टरवर खोदण्यात आले आहेत. त्यामुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला.

तसेच २८ मीटरचे दोन मातीनाले बांधल्यामुळे ४० मीटर पाण्याचा ओसारा या ठिकाणी पाहावयास मिळतो. किन्ही या ठिकाणी १५ हेक्टरवर मंडशी, लिंबू, सीताफळ, करंजी, वड, मोहा, आवळा व लिंबाच्या झाडांची लागवड शासनाच्या वनविभागामार्फत २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत करण्यात आली आहे.

### वनौषधींचा खजिना

विहंगम असे निसर्गसौंदर्य व पावसाळी पर्यटनाचा आनंद या ठिकाणी पर्यटकांना घेता येतो. यासाठी वन विभागामार्फत विविध सोयीसुविधा पर्यटकांसाठी करण्यात आल्या आहेत. या परिसरातच अभयारण्याबाबत माहिती व्हावी, या दृष्टिकोनातून पर्यटकांसाठी निसर्ग निर्वचन केंद्राची निर्मितीही वन्यजीव कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. यामध्ये गौताळा अभयारण्यातील आंबा, आवळा, बाभूळ, बेल आदी वनसंपदा व वनौषधींबाबत माहिती या केंद्रात देण्यात आली आहे.

मराठवाड्यात केवळ सुपुष्प वनस्पतीच्या सुमारे १,६५० प्रजाती असून त्यापैकी ५०० हून अधिक प्रजातीचा औषधींसाठी उपयोग होतो. वन औषधीचा खजिना म्हणूनही गौताळा अभयारण्याकडे पाहिले जाते. अशा विविध प्रकारच्या वनौषधी या ठिकाणी आढळतात. त्यात चिंच, कडुनिंब, कवठ, पळस, पिंपळ आणि उंबर आदींचा समावेश आहे.





वन्यजीव विभागाने उत्तमप्रकारे व्यवस्थापन आणि संवर्धन करून या जैवविविधतेची जपणूक केली आहे. त्यामुळे पर्यटक, पक्षी अभ्यासक, पर्यावरणप्रेमी यांनी गौताळ्यात निसर्गसहलीचा, भ्रमंतीचा आनंद घ्यायलाच हवा.

(लेखक औरंगाबाद येथे माहिती केंद्रात माहिती सहाय्यक आहेत.)
संपर्क : ०९८६००७८९८८

भ्रमंती

**केव्हा जाल ?**
**जुलै ते जानेवारी हा या अभयारण्याला भेट देण्याचा उत्तम काळ आहे.**

**कसे जाल ?**
**औरंगाबादपासून ७५ कि.मी अंतर. औरंगाबाद आणि धुळे यांना जोडणारा राज्य महामार्ग क्र. २११ या अभयारण्यातूनच जातो. अभयारण्य चाळीसगावपासून २० कि.मी. तर कन्नडपासून १५ कि.मी. अंतरावर आहे. हिवरखेडा, पाटणादेवी, पितळखोरा, सायगव्हाण या दरवाजातून अभयारण्यात प्रवेश करता येतो. औरंगाबादहून राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस उपलब्ध.**
**जवळचे रेल्वे स्टेशन व विमानतळ : औरंगाबाद**

**जवळची पर्यटनस्थळे**
**हिवरखेडा गेटपासून अजिंठा १०० कि.मी. अंतरावर, वेरूळ ४० कि.मी. तर दौलताबाद किल्ला ५० कि.मी. अंतरावर आहेत. औरंगाबाद ते कन्नड रोडच्या डावीकडील आकर्षक असा पितळखोरा लेणीसमूह सह्याद्री पर्वतराजीच्या सातमाळ पर्वतश्रेणीत वसलेल्या गौताळ्यात कोरलेला आहे.**

**संपर्क**
**उपवनसंरक्षक वन्यजीव कार्यालय, औरंगाबाद**
**(दूरध्वनी ०२४०-२३३१०२७)**

# किनारीदुर्ग आणि जलदुर्ग

**महाराष्ट्राला अंदाजे ७०० किमी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. पण एवढ्या विस्तीर्ण समुद्र किनाऱ्याचे जसे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत. ही किनारपट्टी म्हणजे खरेतर भारताची सरहद्दच म्हणावी लागेल. भारताबाहेरून समुद्रमार्गे येणाऱ्या शत्रूचा धोका या किनाऱ्याला गेल्या ५०० वर्षांपासून आजपर्यंत आहे. मध्ययुगीन काळात या पश्चिम किनाऱ्यावर समुद्री चाच्यांचा त्रास असायचा. याशिवाय इंग्रज, पोर्तुगीज आणि डच यासारख्या अनेक परकियांनी या किनाऱ्याच्या आधाराने भारतात आपली सत्ता प्रस्थापित केली. हा समुद्रकिनारा संरक्षित करण्यासाठी मध्ययुगीन काळात किनारपट्टीवर अनेक छोटेमोठे किल्ले बांधले गेले.**

**डॉ. सचिन जोशी**

सह्याद्रीच्या मुख्य रांगेवरील उंच शिखरांवर कृष्णा आणि गोदावरी या महाराष्ट्रातून वाहणाऱ्या दोन मुख्य नद्यांचा उगम होतो. सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून वाहत पूर्वेकडे या नद्या समुद्राला जाऊन मिळतात. सह्याद्रीच्या पश्चिमेला असलेल्या साधारणतः ६०० मी उंच अशा कड्यांवरून पश्चिमेलादेखील पाणी वाहते. हे पाणी ओढे धबधबे या माध्यमातून खाली आल्यावर नदीच्या रूपात पश्चिमेकडील किनाऱ्याजवळ अरबी समुद्राला जाऊन मिळते. कोंकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधून जवळजवळ छोट्यामोठ्या २० नद्या अरबी समुद्राला जाऊन मिळतात. या नद्यांचा उगम सह्याद्रीच्या मुख्य रांगेत होऊनदेखील मुख्य रांगेपासून या नद्या जास्तीत जास्त १०० किमी अंतराचा प्रवास करून समुद्राला मिळतात. याउलट सह्याद्रीत उगम पावून पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्या ५०० किमी पेक्षा जास्त अंतर कापून समुद्राला मिळतात.

## शिवपूर्व काळ

कोंकणातील समुद्रकिनारा हा इसवीसनाच्या १५ व्या शतकापर्यंत राजकीय आणि लष्करीदृष्ट्या खूप शांत होता. शिवपूर्वकालीन महाराष्ट्रातील बहामनी, आदिलशाही, निजामशही या राजसत्तांची सत्ताकेंद्रे सह्याद्रीच्या पठारी भागात अनुक्रमे बिदर, अहमदनगर आणि विजापूर येथे म्हणजेच कोंकण किनारपट्टीपासून खूप दूर होती. पण या सर्वांची चौल, दाभोळ, कल्याण, राजापूर, इ. व्यापारी बंदरे कोंकणातच होती आणि तेथे छोटेमोठे किल्ले बांधून त्यांनी ती सुरक्षित केली होती. इ. स. १४९८ साली वास्को द गामा पश्चिम किनाऱ्यापर्यंत पोचला आणि कोंकणातील राजकीय आणि लष्करी स्थित्यंतराला खरी सुरुवात झाली. इतके वर्ष शांततेने चाललेला व्यापार आणि बंदरांवरील शांतता पोर्तुगीजांच्या आगमनाने संपुष्टात आली. ते व्यापार करण्यासाठी आलेच नव्हते, त्यांना व्यापाराच्या नावाखाली कोंकण किनारपट्टीवर आपली सत्ता प्रस्थापित करायची होती. हा भूभाग आणि बंदरे काबीज करण्यासाठी त्यांनी कोंकणात अनेक किल्ले आणि चौक्या बांधायला सुरुवात केली. यादरम्यान पोर्तुगीजांचा सर्वप्रथम निजामशहा मग आदिलशाह आणि शेवटी शिवाजी महाराज यांच्याशी वेळोवेळी संघर्ष झाला.

## किल्ल्यांची शृंखला

पोर्तुगीजांचा सामना करण्यासाठी या एतद्देशीयांनी पश्चिम किनाऱ्यावर किल्ले बांधणीला मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली. निजामशाहाने कुंडलिका नदीच्या काठावर कोर्लई नावाचा भक्कम किल्ला बांधला. आदिलशाहने रत्नागिरीजवळ जयगड, विजयगड यासारखे किल्ले बांधले. १५ व्या शतकाच्या सुरुवातीला सिद्दी या इथियोपिया येथून आलेल्या हबशी लोकांनी रायगड जिल्ह्यातील मुरुड गावाजवळील समुद्रात जंजिरा नावाचा भक्कम किल्ला बांधला. या किल्ल्याच्या आधाराने ते जवळजवळ ४५० वर्षे पश्चिम किनाऱ्यावर राहिले. मध्ययुगीन कालखंडात पाहता पाहता पश्चिम किनाऱ्यावर किल्ल्यांची एक प्रकारे शृंखलाच तयार झाली. पश्चिम किनाऱ्यांवरील किल्ले बांधणीमध्ये तर मराठे या सर्व राजसत्तांच्या पुढे गेले होते. मराठ्यांनी तर कोंकणातील किनाऱ्यावरच नाही तर समुद्राला येऊन मिळणाऱ्या वेगवेगळ्या नद्यांवर देखील किल्ले बांधले. कोंकणातील नद्यांमार्गे देशावर वाहतूक होत असे. पश्चिमेला समुद्राला मिळणाऱ्या खाड्यांमधून पूर्वेकडे एका ठरावीक अंतरापर्यंत



कुलाबा किल्ला



जंजिरा बुरूज


रत्नदुर्ग


विजयदुर्ग


सुवर्णदुर्ग


खंदेरी


वैभव गडकिल्ल्यांचे

जलवाहतूक होत असे. नंतर पुढे माल गाढव आणि बैलांवर लादून जमिनीवरील मार्गाने देशावर पोहोचवला जात असे.

### शिवरायांची जलदुर्गनीती

मराठ्यांनी किनाऱ्यावर आणि कोंकणातील नद्यांच्या खाड्यांवर किल्ले बांधून कोंकणातील जलवाहतुकीवर आणि पर्यायाने कोकणावर आपली सत्ता प्रस्थापित केली. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडपासून जवळ असलेल्या अरबी समुद्रात सिद्दीचा धोका ओळखून खांदेरी, पद्मदुर्ग आणि कुलाबा असे तीन भक्कम जलदुर्ग बांधले. सिद्दीला मराठ्यांविरुद्ध लढताना मुंबईच्या इंग्रजांकडून वेळोवेळी मदत मिळत होती. ही मदत थांबविण्याच्या दृष्टीने महाराजांनी पद्मदुर्ग आणि खांदेरी हे जलदुर्ग बांधले. मध्ययुगीन काळात अशा प्रकारे एखाद्या बेटावर दुर्ग बांधणी करणे ही सोपी गोष्ट नव्हती. मराठ्यांकडे पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्यासारखे प्रगत तंत्रज्ञान नसतानादेखील महाराजांनी स्थानिक लोकांच्या मदतीने हे तीन जलदुर्ग समुद्रातील बेटांवर बांधले. हे तीन किल्ले बांधून ते थांबले नाहीत, तर या किल्ल्यांच्या जवळील किनाऱ्यावर देखील, सामराजगड, थळ, यासारखे दुय्यम किल्लेदेखील बांधले. किनाऱ्यावरील किल्ले हे विशेषतः भूशिरावर बांधलेले दिसून येतात. याचे मुख्य कारण म्हणजे समुद्राजवळ असलेल्या भूशिरावरून लांबपर्यंत सहज नजर जाऊ शकते आणि दूरवरचा परिसर न्याहाळता येतो. पोर्तुगीजांनी बांधलेल्या किल्ल्यांमध्ये पाच मजली उंच असे मनोरे असायचे. याच्या आधारे समुद्रामार्गे येणाऱ्या शत्रूवर नजर ठेवली जात असे.

मध्ययुगीन काळात कोंकणात दोन प्रकारची बंदरे होती. एक मुख्य बंदर जे समुद्रकिनाऱ्यावर खाडीच्या मुखावर बांधलेले असायचे आणि दुसरे दुय्यम बंदर जे खाडीच्या पूर्वेकडे म्हणजे सह्याद्रीच्या मुख्य रांगेच्या दिशेला खाडीचे पाणी ज्या ठिकाणापर्यंत येते तेथे लहान बोटी उतरण्यासाठी केलेले असते. परदेशातून आलेला माल मुख्य बंदरावर उतरवून खाडीतून नदीमार्गे दुय्यम बंदरावर आणला जायचा आणि तेथून पुढे जमिनीच्या मार्गाने देशावर पाठविला जात होता. या मार्गावर संरक्षणाच्या दृष्टीने किल्ले बांधलेले होते. रत्नागिरी जिल्ह्यातील वासिष्ठी नदीच्या मुखावर दाभोळ या मुख्य बंदराजवळ दाभोळ आणि अंजनवेल किंवा गोपाळगड असे दोन किल्ले बांधले होते. याच नदीच्या दुय्यम बंदरावर म्हणजे पूर्वेकडे चिपळूणजवळ गोवळकोट किंवा गोविन्द्गड नावाचा किल्ला बांधला होता. अशा प्रकारे कोंकणातल्या सर्व नद्यांच्या खाडीच्या मुखाशी एक किंवा दोन किल्ले आणि खाडीच्या आतील बाजूस रोहा, महाड, चिपळूण, राजापूर, साटवली, खारेपाटण अशा दुय्यम बंदरांवर एक किल्ला अशी रचना केलेली होती. ज्याची खाडीवर सत्ता त्याची त्या परिसरातील व्यापारावर सत्ता असायची. कोंकणातील किनाऱ्याजवळ छत्रपती शिवाजी महाराजांनी वेगवेगळ्या छोट्या बेटांवर सात जलदुर्ग बांधले. खांदेरी, कुलाबा, सर्जेकोट, पद्मदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग आणि पद्मगड यापैकी चार जलदुर्ग हे आज रायगड जिल्ह्यात येत असून एक रत्नागिरी आणि दोन सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. कोंकणातील किनाऱ्याजवळ असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये मिळून साधारणतः ७५ किल्ले हे पश्चिम किनाऱ्यावर किंवा नद्यांच्या खाड्यांवर वसलेले आहेत. यातील अनेक किल्ल्यांवर इंग्रजांच्या काळापासून जलवाहतुकीच्या सोयीच्या दृष्टीने दीपगृह बांधलेली आहेत. मध्ययुगीन कालखंडात सागरी संरक्षणाच्या दृष्टीने त्या त्या राजकर्त्यांनी वेळीच पावले उचलली आणि किल्ले बांधले. तसेच आजही पश्चिम किनारा आणि सागरी संरक्षण हा महत्त्वाचा विषय आहे. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने ३०० ते ५०० वर्षांपूर्वी बांधलेले हे किल्ले आजही अत्यंत उपयोगी पडत आहेत. पूर्वी जलवाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असल्याने किनाऱ्यापासून ते खाडीच्या आतील बंदारांपर्यंत संरक्षणाच्या दृष्टीने किल्ले बांधले होते. आता वाहतूक रस्त्याने होते त्यामुळे या किल्ल्यांचे महत्त्व संपून, त्याची जागा आता किनाऱ्यापासून मुख्य महामार्गाकडे येणाऱ्या रस्त्यांवर असलेल्या छोट्या छोट्या कोस्ट गार्डच्या चौक्यांनी घेतली आहे.

संपर्क : ०९८२२१०९३६२

# प्रभावी 'गुगलिंग'साठी!

इंटरनेटवर माहितीच्या शोधांपैकी सुमारे ७० टक्के शोध हे गुगल सर्च इंजिनच्या साहाय्याने केले जातात. उर्वरित ३० टक्के शोध अन्य सर्च इंजिन्सच्या साहाय्याने घेतले जातात. इंटरनेटवर कोणत्याही माहितीचा शोध घेण्यासाठी गुगलचा वापर करावा, हे एव्हाना प्रत्येकाला ठाऊक झाले आहे. किंबहुना, इंटरनेट सर्फिंगची सुरुवातच मुळी गुगलच्या होमपेजपासून होते. गुगलवरून हव्या त्या माहितीचा शोध प्रभावीपणे कसा घ्यावा, याची माहिती आपण घेणार आहोत.







आलोक जत्राटकर

आजघडीला आपल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी आपण इतर कोणाहीपेक्षा गुगलची मदत घेणे पसंत करतो. गुगल या कंपनीचा हा एका शब्दापासून ते क्रियापद होण्यापर्यंतचा प्रवास चकित करणारा आहे. आपल्या प्रत्येक शंकेचे समाधान करणारे गुगल हे जणू आपल्या दैनंदिन जीवनातला वाटाड्या, व्हर्च्युअल गुरू बनले आहे.

गुगलवर वापरकर्त्यांच्या सोयीसाठी अनेक विविध महत्त्वाचे प्लॅटफॉर्म विकसित केलेले आहेत. त्या त्या ठिकाणी जाऊन संबंधित कॅटेगरीमध्ये अधिक प्रभावीपणे शोध घेणे सोयीचे जाते. गुगलच्या या प्लॅटफॉर्ममध्ये छायाचित्रांसाठी इमेजिस, फोटोज, पिकासा इ., व्हिडिओज, युट्यूब, न्यूज (बातम्या), ट्रान्सलेट (भाषांतरासाठी उपयुक्त), मॅप्स (नकाशे) व गुगल अर्थ, डॉक्स (कागदपत्रे), बुक्स (पुस्तके), ब्लॉगर (ब्लॉग लेखन, वाचन इ. साठी), स्कॉलर (संशोधनविषयक माहितीसाठी) आदींचा समावेश आहे. व्यावसायिकांना व्यवसायवृद्धीसाठी डवर्ड्स, डसेन्स, जी-सूट, गुगल बिझनेस, डमोब असे काही स्वतंत्र प्लॅटफॉर्म आहेत. विविध विराम चिन्हांचा वापर करून आपल्याला हव्या असलेल्या नेमक्या माहितीचा शोध आपण घेऊ शकतो.

गुगलच्या सर्च बारमध्ये अवतरण चिन्हात आपल्याला शोधायचा असलेला शब्द किंवा शब्दसमूह टाकल्यास केवळ त्या शब्दाचा

अथवा शब्दसमूहाचा समावेश असलेल्या माहितीची पानेच गुगल आपल्याला दाखवेल.

आपल्याला काही विशिष्ट माहिती वगळून त्याखेरीज अन्य माहिती हवी असल्यास वजा चिन्हाचा वापर करता येतो.

जेव्हा आपल्याला एकापेक्षा अधिक शब्दांशी निगडित माहिती शोधावयाची असते, अशा वेळी स्वल्पविरामाचा वापर करावा.

### AND आणि OR या शब्दांचा वापर:

उपरोक्त शोध अधिक प्रभावी करण्यासाठी AND किंवा OR या शब्दांचा वापर करता येतो. आपल्याला शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. देवानंद शिंदे या दोहोंचा समावेश असणारी पानेच केवळ पाहायची असतील, अशा वेळी त्या दोहोंमध्ये कॅपिटल AND वापरावे. तसेच, दोहोंपैकी कोणत्याही एकाचा समावेश असणारी पाने पाहावयाची असतील, तर अशा वेळी त्या दोहोंमध्ये कॅपिटल OR वापरले जाते.

### स्टेरिस्क (*) चिन्हाचा वापर

जेव्हा आपल्याला एखाद्या कवितेमधील किंवा सुविचारामधील काही ठरावीक शब्दच माहिती असतील, अशा वेळी स्टेरिस्क चिन्ह आपल्या मदतीला धावून येते. आपल्याला माहिती असणाऱ्या शब्दांच्या मध्ये हे चिन्ह टाकले की, त्या संपूर्ण कवितेचा, ओळीचा समावेश असणारी पाने गुगल आपल्यासमोर सादर करते.

उदा. समजा, आपल्याला शिवमुद्रेमधील सुरवातीचे 'प्रतिपश्चंद्रलेखेव' आणि अखेरचे 'मुद्रा भद्राय राजते' एवढेच शब्द ठाऊक आहेत. परंतु, हा संपूर्ण श्लोक जाणून घेण्यासाठी आपल्याला या दोन शब्दांच्या मध्ये स्टेरिस्क (*) चिन्ह टाकावे लागेल. त्यानंतर आपल्यासमोर 'प्रतिपश्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता। शाहसुनोशिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते।।' हा संपूर्ण श्लोक समाविष्ट असणारी पाने सादर होतात.

### वेबसाइटवरील माहिती शोधण्यासाठी

आपल्याला संपूर्ण इंटरनेटवरील माहितीपेक्षा एका विशिष्ट वेबसाइटवरीलच माहिती शोधावयाची असल्यास site: असे टाइप करून त्यापुढे त्या वेबसाइटचा पत्ता आणि त्यापुढे त्यावर आपल्याला काय शोधायचे आहे, ते टाइप करावे.

उदा. महाराष्ट्र शासनाच्या वेबसाइटवर शासन निर्णय शोधावयाचे असतील, तर त्यासाठी सर्च बारमध्ये site:www.maharashtra.gov.in Government Resolution असे टाइप करावे.

### शब्दार्थ, व्याख्या जाणून घेण्यासाठी

एखाद्या शब्दाचा अर्थ किंवा व्याख्या जाणून घ्यावयाची असल्यास सर्च बारमध्ये कॅपिटलमध्ये DEFINE: असे टाइप करून ज्या शब्दाचा अर्थ, व्याख्या हवी आहे, तो टाइप करावा. त्याची व्याख्या गुगल आपल्यासमोर सादर करेल.

असे टाइप करून त्यापुढे अभिप्रेत शब्द टाइप करावा. आपल्याला अपेक्षित वेबपेजेस गुगल सादर करेल.

### कन्व्हर्जन

आपल्याला एखादी रक्कम किंवा आकडा अन्य चलन अथवा मोजमाप यांत रूपांतरित करावयाचा असेल, तर त्यासाठी तो आकडा लिहून पुढे km to miles किंवा US dollar to Indian Rupees असे लिहिले की, ते कन्व्हर्ट होऊन आपल्यासमोर सादर होईल.

### व्हॉईस सर्च

स्मार्टफोन्समध्ये विशेषतः ॲन्ड्रॉईड सपोर्टेड मोबाइल फोनमध्ये होम स्क्रीनवरच




## इतर सर्च इंजिन

**गुगलची सर्च इंजिनच्या क्षेत्रात ७० टक्के मक्तेदारी प्रस्थापित असली तरी इतरही काही महत्त्वाची सर्च इंजिन आहेत. त्यामध्ये बिंग (Bing), याहू (Yahoo), चीनचे बैडू (Baidu), एओएल (AOL), आस्क डॉट कॉम (Ask.com), एक्साईट (Excite), डक-डक-गो (DuckDuckGo) आणि वुल्फ्रामअल्फा (Wolfram-lpha) यांचा समावेश आहे. डक-डक-गो हे सर्च इंजिन वापरकर्त्यांची प्रायव्हसी जपण्याला अधिक महत्त्व देते. त्यांची बिंग, याहू आणि यमली या सर्च इंजिनबरोबर भागीदारी आहे. त्याचप्रमाणे वुल्फ्रामअल्फा हे सर्च इंजिन कम्प्युटेशनल (गणितीय) नॉलेज इंजिन वापरले जाते.**

### लेख शोधण्यासाठी

एखादा शब्द लेखाच्या शीर्षकामध्ये असेल आणि आपल्याला केवळ त्यावरून लेख शोधावयाचा असेल, तर, allintitle: असे सर्च बारमध्ये टाइप करून त्यापुढे आपल्याला हवा असणारा शब्द लिहावा. केवळ अशी शीर्षके आपल्यापुढे सादर होतील. त्याऐवजी केवळ मजकुरातील शब्द शोधण्यासाठी allintext: असे टाइप करून शब्द लिहावा. त्याचप्रमाणे विशिष्ट यु.आर.एल.मधील शब्द शोधण्यासाठी allinurl:

गुगल सर्चचा महत्त्वाचा ऑप्शन असतो. त्यामध्ये सर्च बारच्या उजव्या बाजूला माईकचे चित्र असते. त्यावर क्लिक केले, की टाईप न करता केवळ आवाजाच्या माध्यमातून काय शोधायचे आहे, याच्या सूचना फोनला देता येऊ शकतात. आपण बोललेला शब्द सर्च बारमध्ये आपोआप टाईप होतो आणि तदनुषंगिक रिझल्ट स्क्रीनवर दिसू लागतात.

(लेखक शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे जनसंपर्क अधिकारी आहेत.)
संपर्क : ०८६९८९२८०८०

# नागपूरचा कांदा परदेशात



**‘कांदा नेहमी रडवतो’ हा सर्वसाधारण समज आहे. उत्पादित केलेला शेतमाल बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्याचा तसेच साठवणुकीचा प्रश्न नेहमीच शेतकऱ्यांना भेडसावतो. शिवाय त्याची मिळेल त्या भावात विक्री करावी लागते. त्यामुळे उत्पादनानंतरही आणि प्रत्यक्ष वापरतानासुद्धा कांदा रडवतो हे सत्य आहे. मात्र ठरवले तर हाच कांदा शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर भरघोस हसू आणू शकतो हे नागपूरचे युवा उद्योजक दाम्पत्य हसन खुजेमा शफिक व त्यांच्या पत्नी श्रीमती सारा हसन शफिक यांनी वर्धा जिल्ह्यातील त्यांच्या बी.वाय.ग्रो ॲण्ड इन्फ्रा प्रकल्पाद्वारे सिद्ध करून दाखवले. चालू वर्षी या प्रकल्पाने कांद्याच्या ७००० टन फ्रोजन स्लाइसची निर्यात दुबई, सौदी अरेबिया, इराक व अबुधाबीसारख्या देशांना करून उत्पादकांच्या झोळीत दोन जादा पैसे व चेहऱ्यावर परिश्रमाचे समाधान फुलवले आहे.**

**अनिल गडेकर**

नागपूर-अमरावती महामार्गावर कोंढाळीच्या थोडे पुढे सिंदी विहिरी गावात असणाऱ्या बी.वाय.ग्रो ॲण्ड इन्फ्रा या प्रकल्पाने या आदिवासी बहुल परिसरातील १७ गावांच्या सुमारे ५०० शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कांदा, फळे व भाज्यांना खरेदी करून, बाजार भावापेक्षा २० ते ३५ टक्के अधिक भाव मिळवून दिला आहे.

हे गाव वर्धा जिल्ह्याच्या कारंजा तालुक्यात आहे. येथून फक्त कांदाच नव्हे तर संत्रा, पपई, आंब्यासारखी फ्रोजन फळे, पालक, भेंडी, कोहळे, लसूण आदी उत्पादनाच्या निर्यातीला सुरुवात झाली आहे. अरब देशासोबतच चीन व इतर देशांमध्ये फ्रोझन फळे व भाज्यांच्या निर्यातीमुळे शेतकरी गटांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणारा हा प्रकल्प ठरला आहे.

## उत्साही उद्योजक

कोण आहे हे कल्पक युवा उद्योजक? काय आहे त्यांचा बी.वाय.ग्रो ॲण्ड इन्फ्रा प्रकल्प? हे जाणून घेण्याची जिज्ञासा घेऊन त्यांच्या या प्रकल्पाला भेट दिली. शेतकऱ्यांनी पिकवलेल्या भाज्या व फळांसारखी नाशिवंत उत्पादने फ्रोजन तंत्रज्ञानाने अठरा महिन्यापर्यंत कुठलीही रासायनिक प्रक्रिया न करता, ताजेपणा व पौष्टिकता कायम ठेवण्यासाठी अत्यंत आधुनिक प्रणालीचा वापर त्यांनी केला आहे. या दाम्पत्याने उद्योग उभारणीमागची उर्मी विषद करताना त्यांनी सांगितले. पारंपरिक पद्धतीच्या शेतीमधून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडणे शक्य नाही, हे जाणवल्यावर मागास व आदिवासी क्षेत्रातील या अभिनव प्रकल्पासाठी नागपूर-अमरावती महामार्गा जवळ असल्याने, १०० एकर जमीन या गावी आम्ही खरेदी केली. ४ एकर जमिनीत तलाव निर्माण करून पाणी व ११ किलोमीटर लाईन टाकून वीज पुरवठा शेतात आणला. परिसरातील १७ गावच्या सुमारे ५०० शेतकऱ्यांकडून सेंद्रिय पद्धतीने शेतीचे प्रयोग राबवून घेतले. शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन, तंत्रज्ञानाची जोड व उत्पादित मालाला जास्त भाव मिळण्याची हमी देणारी यंत्रणा निर्माण केल्याने केवळ २ वर्षात आमचा प्रकल्प





**फ्रोझन कांदा निर्मिती उद्योजक शफिक दाम्पत्य**

निवडक फळ-भाजीपाल्याची परदेशात निर्यात करू लागला,' हे सांगताना शफिक दाम्पत्यांचा चेहरा अभिमानाने उजळून निघाला होता.

जागतिक बाजारपेठेची मागणी व आंतरराष्ट्रीय मानकानुसार प्रशिक्षित शेतकऱ्यांनी आधुनिक सेंद्रीय पद्धतीने कृषी उत्पादन घेतले. विविध देशातून आयात केलेली आधुनिक फ्रोजन तंत्रज्ञानाच्या शीतगृहामुळे कांदा, लसूण, भाज्या व संत्रा-पपई व आंब्यांसारखी फळे १८ महिन्यांपर्यंत ताजी राहू लागल्याची माहिती, शफिक दाम्पत्याने दिली.

उत्पादित झालेला कांदा, पालक, संत्रा आज जगातील सात ते आठ देशात निर्यात होत आहे. स्लाईस कांदा, लसूण, पालक, मुगण्याच्या शेंगा आदी फ्रोझन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगाच्या बाजारपेठेत उपलब्ध करून दिला जात आहेत. स्लाईस कांद्याला अरब जगतात मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने मागील वर्षभरात सात हजार क्विंटल लाल व पांढऱ्या कांद्याची निर्यात झाली आहे.

मेक इन इंडियाच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये उद्योजकांना प्रोत्साहन मिळत असल्याने औद्योगिक विकासाला नवी चालना मिळत आहे. त्याच अनुषंगाने कृषी व फलोत्पादन क्षेत्रात नवी क्रांती घडवण्याची क्षमता असलेला मेगा फूड पार्क वर्धा जिल्ह्यात साकारत आहे. याअंतर्गत साकारण्यात आलेल्या या प्रकल्पामध्ये वीज, सडक या मूलभूत गरजा भागवल्यानंतर पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी चार एकर परिसरात केलेल्या तलावामुळे सरासरी ४० टक्के पाणी भूगर्भात साठवण्यात आल्यामुळे भूजल पातळीत वाढ झाली.

जागतिक बाजारपेठेच्या मागणीनुसार स्थानिक शेतकऱ्यांना सेंद्रीय पद्धतीने शेती करण्यासाठी प्रशिक्षण देऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासोबत जैविक बियाणे प्रकल्पाद्वारे उपलब्ध करून देण्यात आले. शेतकऱ्यांच्या संपूर्ण उत्पादनाच्या खरेदीची हमी व भावाची हमी त्यांना देण्यात आली. त्यासोबत इतर फळे व फळभाज्यांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यात आले आहे.

शेतमालाची खरेदी केल्यानंतर अत्यंत आधुनिक पद्धतीने त्यांचे ग्रेडिंग निर्जंतुकीकरण, व शीतसाखळीच्या माध्यमातून कांद्याच्या स्लाईसची निर्यात परदेशात करण्यात आली. या उद्योगात सभोवतालच्या गावातील ७० तरुणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला असून अप्रत्यक्षपणे २०० ते ३०० बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत आहे.

## वर्धा मेगा फूड पार्क

वर्धा मेगा फूड पार्कच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेत फ्रोझन फळे व भाजीपाला जागतिक बाजारपेठेत पाठवण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू होणार आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने फळे व पालेभाज्या उत्पादनामध्ये बदल घडवण्यासोबत निर्यातीसाठी चांगले वातावरण व शीतसाखळी तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी बी. वाय. ग्रोने स्वीकारली आहे. वर्धा जिल्ह्यातील सरासरी ५ हजार शेतकरी या प्रकल्पात सहभागी करून घेण्यात येत असून, त्यांनी उत्पादित केलेली सेंद्रीय फळे व भाज्यांची संपूर्ण खरेदी करण्यात येऊन; त्यांना या संपूर्ण प्रक्रियेत सामावून घेण्यात येणार असल्याची माहिती श्रीमती शफिक यांनी दिली.

(लेखक हे नागपूर येथील जिल्हा माहिती अधिकारी आहेत.) संपर्क : ०९८९०१५७७८८

## जागतिक बाजारपेठेत

**अरब देशांमध्ये फ्रोझन कांद्यांची मागणी वाढत आहे. दुबई कतार, सौदी अरब, ईराक, कोरिया, जॉर्डन रशिया आदी देशात स्लाईस केलेला कांदा निर्यात करण्यात आला आहे. ताजा असलेला स्लाईस कांदा ग्राहकाच्या व पंचतारांकित हॉटेलच्या**




**स्वयंपाकगृहापर्यंत थेट वापरासाठी तयार मिळत आहे. कांद्यांच्या स्लाईससह फुलकोबी, पालक, सिमला मिरची, कारले, भेंडी, कोथिंबीर, आले, लसूण हिरवा लसूण व हिरवा कांदा, संत्रा, आंबा, पपईच्या स्लाईस अथवा फोडी तयार करून फ्रोझन केल्यानंतर शीतपेटीमधून निर्यात केला जातो. यामध्ये कुठल्याही रसायनाचा वापर करण्यात येत नाही.**

# प्रयोगातून समृद्धीकडे

**सोन्यासारखी शेती पिकवणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये अपयशाची पर्वा न करता नवनवीन प्रयोग करण्याची क्षमता असते. त्यांना गरज असते ती फक्त मार्गदर्शनाची. कृषी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि आत्मासारख्या संस्थेच्या मार्गदर्शनातून भंडारा येथील शेतकरी पांडुरंग बाजीराव कापगते यांनी भातशेतीत काटेकोहळ्याचे आंतरपीक घेऊन इतरांसमोर नवा आदर्श निर्माण केला आहे.**

भंडारा जिल्ह्यातील साकोली येथील शेतकरी पांडुरंग बाजीराव कापगते यांच्याकडे साडेपाच एकर जमीन आहे. पारंपरिक पद्धतीने ते नेहमी भातशेती करीत. मात्र प्रयोगशील असल्याशिवाय शेतीमधील उत्पन्न वाढवणे शक्य नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे तीन वर्षापूर्वी शेतीत प्रयोग आणि प्रयोगातून उत्पन्न घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. आंतरपीक घेण्यासाठी त्यांनी खटाटोप सुरू केला. त्यांनी डाळिंब पिकामध्ये आंतरपीक म्हणून काटेकोहळ्याची लागवड केली. हा प्रयोग यशस्वी होत असल्याचे लक्षात येताच त्यांनी भात शेतीतदेखील हा प्रयोग केला. त्यांनी पाच एकरात हे पीक घेतले. पहिल्याच वर्षी त्यांना दीड लाख रुपयांचे नुकसान झाले. तरीही ते खचले नाहीत. त्यांनी दुसऱ्या वर्षी क्षेत्रफळ

**जीवन सोनटक्के**

कमी करून पुन्हा काटेकोहळ्याचे पीक घेतले. त्यामध्ये त्यांना चांगला नफा झाला. आता एका एकरामध्ये सलग आंतरपीक म्हणून काटेकोहळ्याचे पीक घेऊन, श्री. कापगते यशस्वी शेती करत आहेत.

### आंतरपिकाचा प्रयोग

भातामध्ये काटेकोहळा घेण्यासाठी श्री. कापगते यांनी भंडारा येथील कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्रम समन्वयक डॉ. उषा डोंगरवार, विषयतज्ज्ञ पी. पी. पर्वते, कृषी अभियंते वाय. आर. महल्ले, फार्म प्रबंधक धनंजय मोहोड यांचे मार्गदर्शन घेतले. शेतात मलचींग व ठिबक संचाची व्यवस्था केली. लागवडीकरिता पाण्याचा निचरा होणारी जमीन तयार झाली. त्यांनी काटेकोहळा फळाचे रायपूर येथून ए. जी. (सगार्ड) वाणाचे बियाणे विकत आणले. जुलै महिन्यात त्याची लागवड केली. हे पीक तीन महिने कालावधीचे आहे. नांगरटी, खते, बियाणे, मजूर हा सर्व सरासरी एकूण खर्च प्रती एकर २० हजार रुपये एवढा आला. त्यांनी दहा फूट अंतरावर सरी व एक फूट झाडातील अंतर ठेवले. लागवडीनंतर दोन महिन्यात फुलावर येऊन एकामहिन्यात काटेकोहळा मोठा होऊन काढणीस तयार झाला.

काटेकोहळयावरती पांढरट पावडर चढली की कोहळ्याची काढणी करतात. यावर्षी कापगते यांना एका एकरामध्ये दहा टन काटेकोहळ्याचे उत्पादन मिळण्याची शक्यता आहे. मागच्या वर्षी' त्यांना ७.५० रुपये प्रतिकिलो भाव मिळाला होता. विशेष म्हणजे, प्रयोग करणारे कापगते यांनी काटेकोहळा हे पीक घेण्याआधी बटाट्याचे पीक घेतले. त्यामध्येही उत्पन्न चांगले झाले. बाजारभाव कमी असल्याने त्यांना साडेतीन लाखांचे नुकसान झाले. नुकसान सोसूनही ते खचले नाहीत.



काटेकोहळा हे पीक वर्षभर घेता येते. एप्रिल, मे व जून महिन्यात फळधारणा अधिक उपयोगी पडत नाही. जास्त उष्णतेमुळे फळधारणा कमी होऊन फळ लहान आकाराचे तयार होते. त्यामुळे एप्रिल, मे व जून महिन्याऐवजी इतर महिन्यात फळधारणा होईल अशा पद्धतीने या वाणाची

योग्य लागवड केल्यास प्रतिकोहळा वजन २० ते २२ किलोपर्यंत जाते.

बाजारामध्ये मोठ्या आकारमानाच्या काटेकोहळ्याला मागणी जास्त असून भावही चांगला मिळतो. तसेच लागवड करताना एका दिवशी लागवड न करता काही दिवसांचा कालावधी सोडून लागवड करता येईल. त्यामुळे मशागतीला सोपे होऊन विक्रीकरिता सुलभ होते.

### बाजारात मागणी

कापगते यांच्या पिकाला नागपूरच्या



**भंडारा : साकोलीतील पांडुरंग बाजीराव कापगते यांच्या शेतातील काटेकोहळ्याचे पीक**

खाद्यपदार्थ बनवणाऱ्या बड्या कंपनीकडून चांगलीच मागणी आहे. नागपूर ही त्यांच्यासाठी मोठी बाजारपेठ आहे. जवळ असलेल्या बाजारपेठेमुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. यंदा दहा क्विंटल टनापैकी त्यांनी आतापर्यंत आठ टन उत्पादन काढले आहे. अजूनही शेतातून काढणी सुरू आहे. यंदा त्यांना प्रतिएकर ६० ते ६५ हजार रुपयांचा नफा अपेक्षित आहे. शेतकऱ्यांसाठी आंतरपिकातील हा शिलकीचा नफा असल्याने पारंपरिक पद्धतीतून चांगले उत्पन्न मिळवण्याचे हे सूत्र आहे.

### प्रयोगशीलतेचा आदर्श

काटेकोहळा आंतरपीक हा परिसरातील शेतकऱ्यांसाठी कुतूहलाचा विषय ठरला आहे. त्यांचा आदर्श घेऊन बऱ्याच शेतकऱ्यांकडून त्यांच्याकडे चौकशी होत आहे. अनेक शेतकरी त्यांच्या शेतात येऊन पाहणी करीत आहेत. कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारे हे पीक ठरत असल्यामुळे शेतकऱ्यांची त्याला पसंती मिळत आहे. भात उत्पादक कापगते यांची आता काटेकोहळा उत्पादक म्हणून ओळख निर्माण होत आहे. ते आता मार्गदर्शकाच्या भूमिकेतून त्यांच्याकडे येणाऱ्या शेतकऱ्यांना आंतरपिकाचे तंत्र समजावून सांगत आहेत. शेतकऱ्यांना काटेकोहळ्याची माहिती देण्यासाठी त्यांना दररोज पाच ते दहा शेतकऱ्यांचे फोन येतात. समोरील शेतकऱ्याचा भ्रमनिरास न करता त्यांना हवी असलेली माहिती देण्यास ते तत्पर असतात.

काटेकोहळा हे पीक घेण्यासाठी फार मोठा खर्च येत नाही. योग्य नियोजन केल्यास कमी खर्चातही उत्पादन घेता येते. शासनाकडून ठिबक सिंचन योजनेचा लाभ मिळाला तर चांगलेच आहे. परंतु, तुम्ही कमी खर्चात ही व्यवस्था उभी करू शकता. तसेच सुरुवातीला पिकाला जास्त खत द्यावे लागत नाही. पहिल्यांदा पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी सुरुवातीला एका एकरात हे पीक प्रायोगिक तत्त्वावर घ्यायला हवे. पीक पद्धत माहिती झाल्यानंतर दुसऱ्या वेळेस त्याचे क्षेत्रफळ वाढवू शकता. वेगवेगळे प्रयोग राबवत असल्याने बरेच काही शिकायला मिळाले असल्याचे कापगते सांगतात.

(लेखक अकोला येथे दै. सकाळचे प्रतिनिधी आहेत.)
संपर्क : ०७७७४०५६२०८

## बदलाचे वारे

**विदर्भातील वऱ्हाड हा कापूस तर भंडारा, गोंदिया हा भाग भातशेतीसाठी प्रसिद्ध आहे. परंतु कमी पर्जन्यमानामुळे वऱ्हाडातील यवतमाळ, अकोला, अमरावती, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यातील शेतकरी कापूस पिकासह आता सोयाबीन पिकाकडे अधिक वळला. काही शेतकरी आंतर पिकांकडे वळताना दिसत असले तरी बहुतांश शेतकरी नवीन प्रयोग करण्याची हिंमत करत नसल्याचे चित्र आहे. मात्र कृषी विभाग आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाकडून दिले जाणारे पाठबळ हे शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे.**

**भातशेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या भंडाऱ्यातील शेतकरी बहुधा दुसऱ्या पिकांकडे वळताना दिसत नाहीत. मात्र काही प्रगतशील शेतकरी प्रयोगातून शेती फुलवण्यामध्ये व्यस्त असतात. शक्य ते उपाय करून उत्पन्न कसे वाढवता येईल याचा विचार करतात. कोरडवाहू असो की ओलिताची शेती असो शेतकऱ्यांमध्ये प्रयोग करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यात त्यांना चांगला फायदा होत आहे. शिवाय त्यांची प्रगती पाहून इतरही शेतकरी हा कित्ता गिरवत असल्याचे चित्र आहे. त्यासोबतच गट शेतीद्वारे स्थापन करण्यात आलेल्या शेतकरी कंपनीतून शेतकरी उद्योजक होत आहेत. शेतकरी आता व्यावसायिक होत आहेत. विदर्भातील शेतीसंदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठामध्ये मोठ्या प्रमाणात संशोधन झाले असून आंतरपीक घेताना शेतकऱ्यांनी या ज्ञानाचा उपयोग करायला हवा.**

# महाराष्ट्राबाहेरील ‘महा’राष्ट्र

**महाराष्ट्र राज्य विविध क्षेत्रांमध्ये देशात अग्रगण्य राज्य आहे. महाराष्ट्राबाहेर देशभरातील विविध राज्यांमध्ये वास्तव्यास असणारी मराठी माणसे राज्याचा हा मान उंचावीत आहेत. महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्र अर्थात बृहन्महाराष्ट्र ही त्याची ओळख. नोकरी, व्यवसाय, उद्योग आदींसाठी देशातील अन्य राज्यांमध्ये महाराष्ट्रीय नागरिक स्थायिक झाला. मराठी कला, संस्कृती जपण्यासाठी त्यांनी त्या-त्या राज्यांमध्ये मराठी संस्था स्थापन केल्या.**

**सोनाली भुयार**

आपला मराठी बाणा, मायबोली आणि सांस्कृतिक वारसा परप्रांतात टिकवून ठेवणाऱ्या या संस्थांनी महाराष्ट्रातून येणाऱ्या जनतेसाठी राहण्याची सोय उपलब्ध करून दिली. बृहन्महाराष्ट्र मंडळ ही देशभरात कार्यरत सुमारे एकहजारांहून अधिक बृहन्महाराष्ट्र संस्थांची शिखर संस्था. मराठी सण, उत्सव साजरे करत राज्याची कला, संस्कृती व परंपरा जपण्याचे व तिचा विस्तार करण्याचे फार मोठे काम या संस्थांनी समर्थपणे केले आहे. या संस्थाच्या कामांची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या वतीने या संस्थाना वेळोवेळी आर्थिक मदत देण्यात आली आहे.




देशभरात जवळपास प्रत्येक राज्यांमध्येच अशी मराठी मंडळ असून त्यांची वार्षिक अधिवेशनही होतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे या बृहन्महाराष्ट्र मंडळांचे पदसिध्द अध्यक्ष असतात त्यामुळे या अधिवेशनाला बहुतेक वेळा राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी उपस्थिती लावली आहे. महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाट्यसंमेलन यांच्यासह अन्य महत्त्वपूर्ण आयोजनात या संस्थांचा मोलाचा सहभाग असतो .

### एक नजर इतिहासावर

सतराव्या-अठराव्या शतकात मराठयांचे राज्य संपूर्ण भारतभर पसरले होते. श्रीशहाजी महाराजांनी दक्षिणेकडे चढाई केली. आजचे म्हैसूर त्यावेळी मराठयांनी जिंकले होते. त्यामुळे या संस्थानचे बरेच दिवाण मराठी भाषिक होते. राघोबा दादांनी उत्तरेकडे अटकेपार मराठी सत्तेचा झेंडा रोवला, तर नागपूरच्या भोसल्यांनी बिहार, ओरिसा, बंगालकडे स्वाऱ्या करून मराठी राज्याच्या कक्षा रुंदावल्या. त्यामुळे ग्वाल्हेर, बडोदे, इंदूर, देवास, धार इ. त्यावेळच्या मराठी राज्यांत मराठी माणसे मोठ्या प्रमाणावर स्थायिक झाले. पानीपतच्या दुसऱ्या युद्धात मराठ्यांचा झालेला निसटता पराभव आणि दिल्लीवर तख्त राखण्याची हुकलेली संधी ही सर्वज्ञात आहे. त्या वेळी महाराष्ट्रातून आलेले आणि युद्धात वाचलेले मराठी सैन्यातील लोक याच भागात (हरयाणा) स्थायिक झाले. नंतरच्या शतकात ब्रिटिशांचे राज्य आले व उद्योग धंद्यासाठी, नोकरीनिमित्त मराठी माणसे परप्रांतात जाऊ लागली. बघता बघता त्यांच्या कित्येक पिढ्यांचा जीवनकाल तेथेच लोटला.

महाराष्ट्राबाहेर वास्तव्यास असणाऱ्या मराठी बांधवांनी संघटनेच्या माध्यमातून एकत्र येऊन काम करण्याचा निर्णय घेतला. त्यातून महाराष्ट्र समाज, महाराष्ट्र मंडळ अशा संस्था स्थापन झाल्या. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला टिमरनी, झाशी, ग्वाल्हेर, उज्जैयिनी, पाटण, इंदूर, बडौदे, अजमेर, रतलाम, सागर आदी ठिकाणी या संस्था स्थापन झाल्या होत्या. मराठी शाळा, ग्रंथालये, व्यायामशाळा सुरू करून तसेच मंदिरांची स्थापना करून भजन, कीर्तन आणि प्रवचन या माध्यमांतून प्रबोधकार्य

सुरू झाले. राज्याबाहेर मराठी बाणा जपण्याचे कार्य या संस्थानी जोमाने सुरू ठेवले. १९२६ पर्यंत बृहन्महाराष्ट्रात जवळपास ५० संस्था सुरू झाल्या होत्या.

### बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्थापना

कानपूर येथे १९२५ मध्ये आयोजित काँग्रेस आणि हिंदुसभा यांच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर तात्यासाहेब केळकर यांनी देशभरात कार्यरत तत्कालीन बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना एकत्रित करून बृहन्महाराष्ट्र मंडळ ही मध्यवर्ती केंद्रीय संस्था स्थापन केली. राजधानी दिल्लीमध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यरत आहे.

### बृहन्महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन

बृहन्महाराष्ट्रात कार्यरत या संस्थाच्या कामात सूत्रबद्धता आणण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाने अधिवेश भरवण्याचे ठरवले. बृहन्महाराष्ट्रातील संस्थांच्या समान उद्देशाबाबत चर्चा घडवून आणणे, मराठी भाषा व संस्कृतीचे संवर्धन व विस्तार करणे आदी उद्देशाने १९२६ मध्ये झांशी (उत्तरप्रदेश) येथे बृहन्महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन भरले. तात्यासाहेब करंदीकर त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. येथूनच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. तात्यासाहेब करंदीकर यांनी १९२५ ते १९४५ या कालावधीत मंडळाचे अध्यक्षपद भूषवले. त्यानंतर १९४८ ते १९६५ पर्यंत काकासाहेब गाडगीळ यांनी मंडळाला नेतृत्व दिले. यानंतर महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १९८० पर्यंत मंडळाचे अध्यक्षपद भूषवले. श्री. वसंत साठे यांनी १९८० ते १९९१ पर्यंत अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडली. मध्यंतरीच्या दोन वर्षाच्या काळात श्री. शरद पवार यांनी मंडळाच्या अध्यक्षपद सांभाळले. १९९३ ते १९९६ या कालावधीत श्री. वसंत साठे पुन्हा मंडळाचे अध्यक्ष झाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष राहतील असा मंडळाच्या घटनेत बदल करण्यात आला. त्यानुसार मनोहर जोशी, विलासराव देशमुख, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण यांनी मंडळाचे अध्यक्षपद स्वीकारले. विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या मंडळाचे अध्यक्ष आहेत.

नुकतीच बृहनमहाराष्ट्र मंडळाची त्यांनी मुंबई येथे बैठक घेऊन त्यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. अमेरिकेमध्ये सुद्धा महाराष्ट्र परिचय केंद्र स्थापन करण्याचे व त्यामार्फत विविध बृहन महाराष्ट्र मंडळांना सहकार्य करण्याचे सुतोवाच त्यांनी केले आहे. त्यामुळे आता देशासोबतच जगामध्ये सुद्धा बृहनमहाराष्ट्र मंडळाकडे लक्ष वेधले जाण्याची आशा वाढवली आहे.

मंडळाची आतापर्यंत ६५ हून अधिक अखिल भारतीय स्वरूपाची अधिवेशने झाली आहेत.

भारत पारतंत्र्यात असताना देशप्रेम जागवण्याचे काम या अधिवेशनांनी केले. १९४० मध्ये कराची येथे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते.

## बृहन्महाराष्ट्रातील महत्त्वाच्या संस्थाचे पत्ते

- **बृहन्महाराष्ट्र भवन,** (दिल्ली महाराष्ट्रीय समाज बिल्डिंग ट्रस्ट) पहाडगंज पोलीस स्टेशन जवळ, नवी दिल्ली- ११००५५. दूरध्वनी : ०११-२३६७९००८/२३६७०५२०
- **वनिता समाज,** १३ इन्स्टिटयूशनल एरीया, लोदी रोड, साईबाबा मंदिराजवळ, नवी दिल्ली-११०००३.
- सार्वजनिक उत्सव समिती, यु-१७,ग्रीन पार्क एक्सटेंशन, नवी दिल्ली - ११००१६ दूरध्वनी: ०११-२६१६७४०१, भ्रमणध्वनी ०९८९९८६२१११
- महाराष्ट्र परिचय केंद्र, ए-८, स्टेट एम्पोरिया बिल्डींग, बाबा खडक सिंह मार्ग, नवी दिल्ली-११०००१. दूरध्वनी : ०११-२३३६३७७३/ २३३६७८३०

महाराष्ट्र मित्र मंडळ, जनकपुरी, शिवनगर परिसर,सी-२बी, पॉकेट १२, जनकपुरी, नवी दिल्ली-११००५८. ०११-६४६२२२८०

- **महाराष्ट्र मंडळ,** गीता मंदीर, १०७७, सेक्टर-२९, फरिदाबाद, हरियाणा - १२१००१ भ्रमणध्वनी : ९९५८८७७६८८
- **महाराष्ट्र मंडळ,** ९१, पंथाघाटी 'देवांजली' आयुर्वेदिक डिस्पेंसरी जवळ, कसम्पटी, शिमला, हिमाचल प्रदेश - १७१००९. दूरध्वनी : ०१७७ - २६२०८०८
- **महाराष्ट्र मंडळ,** प्लॉट नं.२४७, सेक्टर १९ डी, चंडीगढ, पंजाब - १६००११
- **महाराष्ट्र समाज,** ८४/१६६ कटरा मकबूलगंज, लखनऊ, उत्तरप्रदेश - २२६०१८. दूरध्वनी -०५२२-६५३४९१९, भ्रमणध्वनी ०८००९०६७१७३ (व्यवस्थापक, सदानंद जोग)
- **काशी महाराष्ट्र सेवा समिती,** सी.के. २/४८, नीळकंठ स्मृती भवन, वाराणसी, उत्तरप्रदेश - २२१००१. भ्रमणध्वनी: ०९३३५६४१२६७ (अध्यक्ष-माधव रटाटे)
- **टिळक स्मारक भवन,** ऑफ जी.टी.रोड, अलोपीबाग, अलाहबाद, उत्तरप्रदेश -२११००६. दूरध्वनी : ०५३२-२६६७४११
- **महाराष्ट्र समाज कल्याण समिती,** मंगलायतन, ४४/३, कनाल रोड, जाखन, डेहरादून - २४८००९. भ्रमणध्वनी: ०९७५९३४८५६४
- **श्री. समर्थ सेवा मंडळ,** 'नरहरी छाया' एल.आय.जी.१७७ कोटरा, सुल्तानाबाद, भोपाळ, मध्यप्रदेश - ४६२००३. दूरध्वनी:०७५५-२७६२९५०
- **गाडगीळ वाडी,** मेन हिंदी शाळे समोर, हाटकेश्वर वार्ड, खंडवा, मध्यप्रदेश -४५०००१. दूरध्वनी:०७३३-२२४९१११
- **महाराष्ट्र मंडळ,** लोहामंडी स्कूलच्या बाजूला, ३१, पंचशील नगर (स्नेहनगर), इंदौर, मध्यप्रदेश. दूरध्वनी: ०७३१-२४४६१३२

### प्रकाशने

विविध प्रकाशनांच्या माध्यमातून बृहन्महाराष्ट्रातील मराठी बांधवांना जोडण्याचे काम बृहन्महाराष्ट्र मंडळाने केले. सुरुवातीच्या काळात 'बृहन्महाराष्ट्र मासिक' या नावाने

## दिल्लीतील महाराष्ट्र

राजधानी दिल्लीत विविध मराठी संस्था आणि महाराष्ट्र शासनाच्या विभागांच्यावतीने राज्याची संस्कृती जपण्याचे काम प्रभावीपणे सुरू आहे.

पहाडगंज स्थित दिल्ली महाराष्ट्रीय शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेला १९९२ पासून महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेचे प्रादेशिक केंद्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. संस्थेच्या आरामबाग येथील नूतन मराठी शाळेतील सभागृहात या नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येते. बृहन्महाराष्ट्रातील विविध राज्यातील नाट्यसंस्था या विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. संस्थेच्यावतीने समाजातील गरीब मुलांसाठी ज्युनीअर व सिनीअर किंडर शाळा चालविण्यात येते. करोलबाग येथील फैज रोड स्थित मराठा मित्र मंडळाच्यावतीने वर्षभर विविध सण उत्सव साजरे करण्यात येतात. झंडेवालान भागात संस्थेच्या वतीने चौगुले पब्लिक स्कूल चालवण्यात येते. ही इंग्रजी माध्यमाची शाळा असून या शाळेत पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण दिले जाते इथे मराठी विषय अनिवार्य आहे. सार्वजनिक उत्सव समिती दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करते.




**दिल्ली येथे महाराष्ट्र दिन समारोह २०१६ कार्यक्रमात लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन, मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर, खासदार नरेंद्र जाधव आणि इतर मान्यवर. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आला.**

स्पर्धेत सहभाग घेतात. स्पर्धेत निवड झालेल्या पहिल्या तीन नाटकांना महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळतो. महाराष्ट्रीय शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था १९७२ पासून नाट्य व सुगम संगीत स्पर्धा, अखिल भारतीय गद्य व संगीत नाट्यस्पर्धेचे आयोजन करीत आहे. या संस्थेच्यावतीने नूतन मराठी शाळा चालवण्यात येते. ५ वी ते १२ वी पर्यंत या शाळेत शिक्षण दिले जाते. या शाळेत मराठी विषय अनिवार्य आहे.

महाराष्ट्र स्नेह-संवर्धक समाज संस्थेच्या माध्यमातून गणेशोत्सव, दासनवमी, स्वातंत्र्यदिन, कोजागिरी, संक्रांत आदी कार्यक्रम साजरे केले जातात. लोधी रोड स्थित वनिता समाजाच्या वतीने वर्षभर याशिवाय करोलबागस्थित राणी लक्ष्मी भगिनी समाज, जनकपुरी आणि लाजपतनगर स्थित महाराष्ट्र मित्र मंडळ, पूर्वांचल मित्र मंडळांच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गणेशोत्सव काळात दिल्ली व परिसरात जवळपास ३५ मराठी मंडळाच्या माध्यमांतून गणेशोत्सव साजरा करण्यात येतो.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महाराष्ट्र परिचय केंद्र या कार्यालयाच्यावतीने या सर्व मंडळाशी समन्वय ठेवला जातो. विविध शासकीय उपक्रमांत मंडळांना सहभागी केले जाते.

नियतकालिक प्रकाशित करण्यात येत असे. १९३५ पासून या नियतकालिकाचे नाव 'महाराष्ट्र विस्तार' असे करण्यात आले. १९६७ मध्ये रतलाम (मध्यप्रदेश) येथे आयोजित अधिवेशनात हे नाव बदलून 'मायमराठी' करण्यात आले. इंदूर येथील बृहन्महाराष्ट्र संस्थांनी या नियतकालिकाची व्यवस्थापकीय जबाबदारी स्वीकारली असून अश्विन खरे हे या नियतकालिकाचे संपादक आहेत.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्यावतीने 'बृहन्महाराष्ट्र संस्था परिचय सूची' हे महत्त्वाचे प्रकाशन करण्यात येते. यात देशभरातील मराठी संस्थांची माहिती देण्यात आली असून आतापर्यंत या पुस्तिकेच्या ४ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. सूर्यकांत कुळकर्णी यांनी या पुस्तिका संपादित केल्या आहेत.

**(लेखिका नवी दिल्ली येथील बृहन महाराष्ट्र भवनात व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०८४४७९०८३४७**

# प्रबोधनाची रात्र

**अंधश्रद्धांना समूळ नष्ट करून तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा, यासाठी सांगलीचे जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी विशेष पुढाकार घेऊन 'अमावस्येची रात्र स्मशानात' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत करोली एम (ता. मिरज), नागाव कवठे (ता. तासगाव) आणि कवठेमहांकाळ (ता. कवठेमहांकाळ) येथे अमावस्येच्या रात्री स्मशानभूमीत अंधविश्वासविरोधी प्रबोधनाचा जागर घडला.**

भूत, पिशाच्च आदींबाबतची नागरिकांच्या मनातील भीती आणि अंधश्रद्धेचा विळखा काढून टाकण्यासाठी 'अमावस्येची रात्र स्मशानात' हा उपक्रम उपयुक्त ठरत आहे.

जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी ही संकल्पना मांडली. त्याला सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त राधाकिसन देवढे यांनी पुढे नेत महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानूष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबतचा अधिनियम २०१३ अंतर्गत वैज्ञानिक दृष्टिकोन व जादुटोणाविरोधी कायद्याबाबत चमत्कार व प्रात्यक्षिकांसह जाणीवजागृतीसाठीचे कार्यक्रम घेतले.

जगात बदल घडवावा, पण तो दुसऱ्याने....अशी मानसिकता दूर करण्यासाठी बदलाची सुरुवात जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी स्वतःपासून केली. म्हणूनच त्यांनी चक्क स्मशानभूमीत स्वतःच्या कुटुंबाला आणले, ही बाब सर्वांसाठी आश्चर्यकारक व प्रेरणादायी ठरली. या अभिनव कल्पनेची सतत आठवण राहावी व त्यापासून सर्वांनी प्रेरणा घेऊन जादुटोण्याला सामान्य माणसाने बळी पडू नये, यासाठी स्मशानभूमी शेजारी वृक्षारोपण करण्यात आले. भडाग्नी दिल्यानंतर होणाऱ्या प्रदूषणापासून मुक्ती मिळावी, हा त्यामागचा दुसरा महत्त्वाचा पर्यावरणपूरक हेतू. या कार्यक्रमावेळी विविध प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. चेटूक, भानामती, करणी, वशीकरण आदी कशा प्रकारे करण्यात येते, त्यामध्ये असणारी हातचलाखी, विज्ञानाचा आधार घेऊन लोकांची कशाप्रकारे फसवणूक करण्यात येते, याचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमस्थळी ढोल-ताशांचा ठेका, हलगीचा कडकडाट आणि कैताळाचा नाद, रस्त्याच्या दुतर्फा आकर्षक विद्युत रोषणाई, हारफुलांची सजावट, ठिकठिकाणी भव्य-दिव्य स्वागत कमानी, बाजूला जादूटोणा विरोधी कायद्याच्या संदर्भातील संदेश... या गोष्टी होत्या.



**सांगली जिल्ह्यात अंधश्रद्धा निर्मुलनासाठी राबवण्यात आलेल्या जाणीवजागृती कार्यक्रमात सहभागी झालेले जिल्हाधिकारी शेखर गायकवाड, वरिष्ठ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि कलावंत.**

या उपक्रमाबाबत जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी सांगितले की, ग्रामीण भागामध्ये विशेषतः अशिक्षित लोकांमध्ये अमावस्येच्या रात्री भूते दिसतात, अशी भीती

**संप्रदा बीडकर**

असते. त्यामुळे महिला स्मशानभूमीत जात नाहीत. मुलांना तर येऊच देत नाहीत. ही भीती काढली नाही, तर पुढच्या पिढीमध्ये ही भीती जाईल. ती रोखण्यासाठी थेट गावपातळीवर स्मशानभूमीत जाण्याची गरज आम्हाला वाटली. या उपक्रमात महिला व मुलांची हजारोंच्या संख्येने उपस्थिती होती. विज्ञानाच्या या जागराची उत्सुकता महिलांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे जाणवत होती. अंधश्रद्धा दूर करण्यासाठी स्त्रियांचा मोठा सहभाग असतो. महिलांची गर्दी पाहता आता समाजात अंधश्रद्धा समूळ नष्ट होण्यास फार काळ लागणार नाही. या उपक्रमामुळे स्मशानात भूतपिशाच्च काही नसते, हे भावी पिढीलाही पटलेय. या उपक्रमामुळे मनातील गैरसमज, काल्पनिक भीती दूर होण्यासाठी मदत होणार आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली आहे.

(लेखिका सांगली जिल्ह्याच्या माहिती अधिकारी आहेत.)
संपर्क : ०९४२२८६८७२४

# परसबाग फुलली...

**राज्यातील माता व बालक यांच्या पोषण स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन व टाटा ट्रस्ट यांच्या प्रयत्नातून २६ जानेवारी २०१७ या कालावधीत पोषण चळवळ मोहीम राबवण्यात येत आहे.**

प्रफुल्ल रंगारी

पोषण चळवळ हे एक माहितीचे अभियान असून, यामध्ये मानव विकासाशी निगडित असलेल्या शासनाच्या विविध विभागांतील अधिकारी कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी करणे व पोषण संदर्भात समाजातील लोकांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवून आणणे, हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

पोषण चळवळीमध्ये किशोरवयीन मुले व मुली, गरोदर माता, स्तनदा माता व कमी वजनातील मुलांच्या माता यांच्यावर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे.

### खुंटित वाढ रोखणे

राज्यातील ३८.४० टक्के बालके बुटकी आहेत. बालकांच्या खुंटित वाढ रोखण्यासाठी वंदना कृष्णा, महासंचालक व प्रधान सचिव राजमाता जिजाऊ मिशन यांच्या संकल्पनेतून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. बुटकेपणा किंवा बालकांची खुंटित वाढ हे अदृश्य स्वरूपाचे कुपोषण असून, त्याचे दीर्घकालीन परिणाम बालकाच्या आरोग्यावर होत असतात. बालकांच्या उंचीबाबत त्यांच्या पालकांमध्ये जनजागृती होण्यासाठी, अंगणवाडी केंद्रांमध्ये ७ जून, २०१६ रोजी उंचीच्या रेषा आखण्यात आल्या. एकाच वयोगटातील तीन ते चार बालकांना या लाईन्सपुढे उभे करून पालकांना त्यांच्या उंचीतील फरक आणि योग्य समुपदेशन करण्यात आले.

### बदल घडवण्यासाठी मोहीम

माता व बालकांची पोषण स्थिती सुधारण्यासाठी प्रत्येक महिना हा विशिष्ट विषयाला समर्पित करण्यात आला आहे. जसे जुलै महिना गरोदर मातांसाठी समर्पित

### शास्त्रशुद्ध परसबागांची निर्मिती

**अंगणवाडीतील बालकांसह सर्वसाधारण लोकांचा आहार चौरस असावा, म्हणून संजयकुमार, (प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग) यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात परसबागा निर्मितीचे कार्य मोहीम स्वरूपात करण्यात येत आहे.**



**अंगणवाडीतील बालकांच्या आहारात विविध प्रकारच्या हिरव्या पालेभाज्यांचा वापर आणि समाजात घरगुती परसबागेची संकल्पना यशस्वी करण्यासाठी पोषण चळवळ अंतर्गत शास्त्रशुद्ध परसबागांची निर्मिती करण्यात येत आहे. यासाठी रिलायन्स फाऊंडेशनचे तांत्रिक सहकार्य घेण्यात आले. शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, देवस्थान इ. ठिकाणी परसबागा निर्माण करण्यात आल्या आहेत. यवतमाळ, वर्धा, परभणी, जळगांव, उस्मानाबाद, पुणे या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात परसबागा निर्माण करण्यात आल्या आहे. सद्य:स्थितीत राज्यात १४५० परसबागांची निर्मिती झाली आहे. परसबागेमध्ये उत्पादित पालक, वांगी, दोडकी, टमाटे इ. भाज्यांचा वापर अंगणवाडीतील बालकांच्या आहारात करण्यात येत आहे.**

होता. तसेच ऑगस्ट महिना स्तनदा मातांसाठी समर्पित, सप्टेंबर पोषण आहार महिना, ऑक्टोबर किशोरवयीन मुला-मुलींसाठी, नोव्हेंबर बालकांसाठी समर्पित करण्यात आला आहे. प्रत्येक महिन्यात दोन ते तीन उपक्रम व त्यांचे स्वतंत्र संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले. जसे जागतिकस्तरावर स्तनपानासंदर्भात जनजागृतीसाठी करण्यात येत आहे. पोषण चळवळीमध्ये स्तनपान - शाश्वत विकासाची गुरूकिल्ली! या संदेशाचे बॅनर, पोष्टर्स, माहिती विविध माध्यमांद्वारे लोकांपर्यंत पोहोचवण्यात आली आहे.

## लोकसहभागातून हिरकणी कक्ष

स्तनपानाविषयी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी जसे बस स्थानके, देवस्थान, रेल्वे स्थानके इ. ठिकाणी लोकसहभागातून हिरकणी (स्तनपान) कक्ष स्थापन करण्यात येत आहे. प्रवासादरम्यान व गर्दीच्या ठिकाणी मातेला आपल्या बालकाला सन्मानाने आपले दूध पाजता यावे म्हणून मोहीम स्वरूपात राज्यात हिरकणी कक्ष स्थापन करण्यात येत आहे.

## ऑडिओ-व्हिडीओद्वारे जनजागृती

पोषण चळवळ अंतर्गत माता व कुटुंबीयांपर्यंत प्रभावीपणे माहिती पोहोचवून त्यांच्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी ऑडिओ - व्हिडीओ शोद्वारे जनजागृती करण्यात आली. तसेच रेडिओच्या माध्यमातून पोषणाबाबत जनजागृतीसाठी संदेश देण्यात आले.



**आदिवासीबहुल क्षेत्रातील रानभाज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पोषणमूल्ये असतात. त्याची माहिती लोकांना होण्यासाठी रानभाज्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येते.**

## लोककला माध्यमांद्वारे जनजागृती

प्रत्येक जिल्ह्यातील परिस्थितीचा विचार करून त्यानुषंगाने जनजागृती उपक्रम घेण्यात येतात.

## प्रदर्शन

आहारातील पोषणमूल्यांचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विविध जिल्ह्यांमध्ये प्रदर्शन भरवण्यात येत आहे.

आदिवासीबहुल क्षेत्रातील रानभाज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पोषणमूल्ये असतात. त्याची माहिती लोकांना होण्यासाठी रानभाज्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

## ओटी भरण व डोहाळे जेवण

आयर्न फोलिक ॲसिड टॅबलेट्स (आयएफए) देऊन गर्भवती मातांची ओटी भरण्यात आली. ओटी भरताना महिला गर्भवती महिलांचा कौतुक सोहळा कार्यक्रम म्हणून ओटी भरण आणि लोकसहभागातून डोहाळे जेवणाचे कार्यक्रम राज्यातील अंगणवाडीमध्ये खूप उत्साहात घेण्यात आले. परंपरेनुसार महिलांच्या ओटीमध्ये ज्या वस्तू दिल्या जातात, त्या फेकल्या किंवा त्याकडे दुर्लक्ष केले जात नाही. म्हणून या कार्यक्रमात महिलांच्या ओटीत लोह व कॅल्शियमच्या गोळ्या टाकण्यात आल्या. या वेळी गरोदर मातांना स्तनपानाची यशस्वी सुरुवात हा व्हिडीओ दाखवण्यात आला.

## ग्रोथ चार्ट

अंगणवाडीत जाणाऱ्या बालकांची क्षमतेने वाढ होते आहे अथवा नाही, हे तपासण्यासाठी प्रत्येक अंगणवाडीत ग्रोथ चार्ट उपलब्ध करून देण्यात आला आहे. यात बाळाचे जन्मापासूनचे वजन नोंदवलेले असते. पोषण चळवळीमध्ये ज्या बालकांचे वयानुसार वजन कमी आहे, अशा बालकांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी बालकांच्या मातेला ग्रोथ चार्ट समजावून सांगण्यात येतो. ग्रोथ चार्ट, आहाराचे वेळापत्रक बालकांच्या घरी चिटकवतात.

## अक्षयपात्र

निरनिराळ्या रंगामध्ये अनेक जीवनसत्त्वे व पोषणमूल्ये असतात. अशा वैविध्यपूर्ण व विविधरंगी आहारामुळे आपले जीवन सक्षम होण्यास मदत होते.

आपल्या अन्नधान्य, भाजीपाला आणि वनस्पतींमध्ये उपजतच विविध रंगांची उधळण आहे. विविध रंगांची फळे, फळभाज्या व हिरव्या पालेभाज्यांचा समावेश बालकांच्या आहारात करण्याठी अंगणवाड्यांमध्ये अक्षयपात्र ही नावीन्यपूर्ण संकल्पना सुरू करण्यात आली आहे. या अक्षयपात्रामध्ये लोकसहभागातून विविध प्रकारचा भाजीपाला, धान्य टाकले जाते. काही अंगणवाड्यांमध्ये गरीब व गरजू गरोदर मातांना अक्षयपात्रातून एक वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे.

**(लेखक राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, मुंबई येथे सल्लागार (आयईसी) आहेत.)**
**संपर्क : ०९०११२१५७५७**

# लोकसेवेची स्वयंप्रेरणा...



**हरेश्वर विश्वनाथ स्वामी,**
**सहायक आयुक्त, दिल्ली (भा.पो.से)**

**कुठल्याही क्षेत्रात यशाच्या शिखरावर पोहोचायचे असेल तर आपल्या ध्येयाएवढेच सेल्फ मोटिव्हेशनही तेवढेच मजबूत असायला हवे. लातूर जिल्ह्यातील स्वयंप्रेरित हरेश्वर स्वामी यांनीही प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, कुठल्याही शिकवण्या न लावता शिक्षक ते आयपीएसपर्यंतची यशस्वी वाटचाल केली. स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणारा हरेश्वर स्वामी यांचा यशस्वी प्रवास त्यांच्याच शब्दात..**

यूपीएससी व एमपीएससीची तयारी करताना आपले ध्येय ठाम असायला हवे. शिवाय त्यासाठी प्रेरणा ही चांगल्या कारणातून यायला हवी. एखादा मित्र यूपीएससी परीक्षेची तयारी करतोय म्हणून आपणही करायची किंवा मोठा अधिकारी होऊन समाजात वावरायचे असा दृष्टिकोन आपला मुळीच नसावा. उलटपक्षी आपण अधिकारी होऊन सामान्य जनतेच्या उपयोगी पडू, मोठ्या पदावर जाऊन लोकांच्या अडचणी सोडवू अशी आपली स्वयंप्रेरणा असायला हवी. स्वयंप्रेरणा असली की तयारीमध्ये आपण कमी पडत नाही. आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करत राहतो. यूपीएससी परीक्षेचे स्वरूप आणि अभ्यासक्रम समजून घेणे खूप महत्त्वाचे ठरते. कारण यातच यशाचे सूत्र दडलेले आहे. या परीक्षेची व्याप्ती खूप मोठी असल्याने नेमका आणि नियोजबध्द अभ्यास होणे गरजेचे आहे. अभ्यासक्रम समजून घेतल्यास अभ्यासाची दिशा ठरवता येते. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी बाजारात असलेली जाडजूड पुस्तके सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचण्यातही वेळ घालवण्यात अर्थ नसतो. त्यातील नेमके कुठले विषय महत्त्वाचे आहे हे आपल्याला कळले पाहिजे. थोडक्यात काय वाचायचे नाही हे कळणेही खूप महत्त्वाचे असते. शिवाय या परीक्षेच्या तयारीदरम्यान निराशा, तणावाला दूर ठेवून नेहमी सकारात्मक राहून अभ्यास करायला हवा. शिवाय शिकवणी वर्ग लावलेच पाहिजे असेही नाही. न्युनगंड दूर ठेवत अभ्यासाची दिशा ठरवून सेल्फ स्टडी केली तर या परीक्षेत नक्कीच यश मिळते, हे स्वानुभवातून सांगतोय.

### ध्येयासक्ती

लातूर जिल्ह्यातील लोहारा (ता. उदगीर) हे माझे मूळ गाव. दहावीपर्यंतचे शिक्षण लोहाऱ्यातच झाले. नंतर उदगीरला येऊन विज्ञान शाखेतून ११ वी - १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. एमबीबीएससाठी प्रवेश मिळत होता पण प्रवेश शुल्क भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे डी. एड करून शिक्षक झालो. डी. एड. करत असतानाच पीएसआय परीक्षेची तयारी करणाऱ्या मित्रांचा आमचा एक ग्रुप तयार झाला. येथूनच स्पर्धा परीक्षेच्या माझ्या तयारीला सुरुवात झाली. दरम्यान एलआयसीच्या परीक्षेत पहिले यश मिळाले. औरंगाबाद येथे एलआयसीच्या कार्यालयात विकास अधिकारी म्हणून रुजू झालो. मात्र यूपीएससी परीक्षेत यश मिळवण्याची खूणगाठ आधीच मनाशी बांधली होती. त्यामुळे अभ्यासात मात्र खंड पडू दिला नाही. २०११ च्या एमपीएससी परीक्षेत राज्यात ३२ व्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन नांदेड येथे वित्त व लेखाधिकारी म्हणून रुजू झालो. कुठल्याही शिकवण्या न लावता यशाचा एक एक टप्पा पार करत २०१३ मध्ये आयपीएस झालो.

### निर्धार

यूपीएससी परीक्षेच्या माध्यमातून आयपीएस सेवेसाठी निवड झाल्यानंतर १८ महिन्यांच्या प्रशिक्षणामध्ये पोलीस सेवेविषयीच्या जाणीवा आणखी घट्ट झाल्या किंबहुना आयएएसपेक्षा आपला पिंड पोलिसी सेवेचा असल्याची जाणीव झाली. या सेवेत लोकांना एकहाती न्याय मिळवून देण्यामुळे कामाचे समाधान अधिक मिळत असल्याची प्रचिती झाल्याने पोलीस सेवेतच राहण्याचा मी निर्णय घेतला.

### पोलिसांची संवेदनशीलता

पोलिसांना नेहमी संवेदनशील राहून आपले काम करावे लागते. एखाद्या गुन्ह्यामध्ये पीडिताचे पुनर्वसन आणि गुन्हेगाराला त्वरित गजाआड करण्याची प्राथमिकता पोलिसांसमोर असते. जनक्षोभ उसळल्यावर बळाचा वापर करण्यापेक्षा पोलीस समजावून सांगण्याच्या भूमिकेत असतो. शिवाय पोलीस विभागाने आधुनिकीकरण स्वीकारले असून समन्वय वाढल्याने गुन्ह्यांचे सिद्धीकरण वाढले आहे. संघटित गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्याने केलेला मकोका



## यशाची सूत्रे

- न्यूनगंड बाळगू नका
- घोकंपट्टीपेक्षा गुणात्मक अभ्यासावर भर द्या.
- सदैव स्वयंप्रेरित राहा.
- उजळणी व आत्मचिंतन करा
- शिकवणी वर्गाच्या मागे न लागता अभ्यासावर भर द्या
- मुख्य परीक्षेसाठी कमी शब्दात आशय मांडण्याचा सराव करा
- मुलाखतीत स्वत:शी प्रामाणिक राहा.

प्रेरणा

(एमसीओसीए) कायदा दिल्ली पोलिसांनी जसाच्या तसा लागू केला आहे, हे एकरूपीकरणाचे उदाहरण सांगता येईल.

### संधी

यूपीएससी परीक्षेच्या माध्यमातून आयपीएस होऊन सुरुवातीला एखाद्या जिल्ह्याचा पोलीस अधीक्षक होणे एवढेच काही उमेदवारांच्या डोक्यात असते. परंतु या परीक्षेच्या माध्यमातून अनेक क्षेत्रात काम करण्याची संधी असते. सीबीआय, इंटेलिजन्स ब्युरो, रिसर्च ॲण्ड नलिसेस विंग (आरएडब्ल्यू), संयुक्त राष्ट्रसंघ पोलीस तसेच सीआरपीएफ, बीआयएसएफ सारख्या अर्ध सैन्यदलामध्ये काम करण्याची संधी या परीक्षेच्या माध्यमातून उपलब्ध आहेत.

### अभ्यास

स्पर्धा परीक्षेच्या तयारीदरम्यान अभ्यासाच्या पद्धती या व्यक्तिपरत्वे बदलतात. कुणाला चर्चात्मक अभ्यास आवडतो, कुणाला सेल्फ स्टडी तर कुणी शिकवणी वर्गावर भर देतो. मात्र तासनतास अभ्यास किंवा घोकंपट्टी करण्यापेक्षा, अभ्यासक्रमाप्रमाणे काठीण्य पातळीनुसार आपली आकलन क्षमता लक्षात घेऊन; गुणात्मक अभ्यास कसा करता येईल याचा विचार करावा.



### मुलाखत

मुलाखत ही आपल्या ज्ञानापेक्षा आपल्या व्यक्तिमत्त्वाची असते. पुण्यात काही मॉक इंटरव्ह्यू दिले. त्याच्या व्हिडीओ कॅसेट्सही आम्हाला मिळाल्या. त्यामुळे होणाऱ्या चुका कळल्या. या चुका लक्षात घेऊन त्यावर काम केल्याने यशस्वी मुलाखत देता आली. मुलाखत घेणारे पॅनल आपण संबंधित पदासाठी असलेल्या निकषांस पात्र आहोत की, नाही याची पडताळणी करत असते. एखादा प्रसंग आपण कसा हाताळतो, आपण आपली बाजू किती ठामपणे मांडतो, प्रशासक होण्याच्या दृष्टीने आपण दबावाखाली येतो की, नाही आदी बाबी तपासल्या जातात. बोलण्याची भाषा ओघवती, विचारात स्पष्टता आणि उत्तरात प्रामाणिकता असेल तर मुलाखत यशस्वी झालीच समजा.

### यशाचे श्रेय

एखाद्या यशात प्रयत्न जरी आपले असले तरी त्यामागची प्रेरणा, सहाकार्य अधिक महत्त्वाचे असते. आई भगिरथी, वडील विश्वनाथ स्वामी, भारतीय राजस्व सेवेत दाखल झालेला व मोलाचे मार्गदर्शन करणारा माझा मोठा भाऊ शांतेश्वर स्वामी व दिलीप स्वामी, लहान भाऊ महेश स्वामी व कुटुंब माझी प्रेरणा बनून सदैव माझ्यासोबत होते. त्याचबरोबर माझ्यासोबत सुरुवातीपासून या परीक्षेची तयारी करणारा आयएएस मित्र नरसिंग पवार तसेच विनय पाटील यांच्या सहकार्यामुळे माझ्या करिअरला आकार आला. नरसिंग व मी सोबतच या परीक्षेच्या तयारीला सुरुवात केली व निवडही एकाच वर्षी झाली हे विशेष. त्यासोबतच उदगीर येथील श्यामलाल मेमोरियल हायस्कूलचे माझे मित्र, एलआयसीच्या औरंगाबाद कार्यालयामधील स्नेही तसेच माझ्या लोहारा गावामधील कुटुंब माझे सदैव प्रेरणास्थान राहिले.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

### मराठी टक्का वाढवण्यासाठी...

**यूपीएससीच्या परीक्षेत प्रादेशिक तीव्रता अधिक जाणवते. या परीक्षेत यशस्वी होण्याचा महाराष्ट्राचा टक्का तसा कमीच आहे. तो वाढवण्यासाठी दिल्ली येथे रुजू असलेले आम्ही सर्व महाराष्ट्रीयन अधिकारी महाराष्ट्र सदनमध्ये येणाऱ्या उमेदवारांसाठी आवर्जून वेळ काढून मार्गदर्शन करतो. कुणी शिकवणी घेतो तर कुणी मॉक इंटरव्ह्यूसाठी वेळ काढतो. महाराष्ट्र सदनात दाखल होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला मार्गदर्शन करण्यासाठी त्याच्या शंकाचे निरसन करण्यासाठी, सर्व अधिकारी तत्पर असतात. यासाठी राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (एसआयएसी) समन्वयक म्हणून काम पाहते.**

# गाव हेची तीर्थ

**राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी सक्षम ग्राम निर्माण करण्यासाठी आपले संपूर्ण जीवन खर्ची घातले. गावाचे सर्वांगीण उत्थान कसे करता येईल, याकरिता गावातच संघटना करून आदर्श ग्रामराज्य तयार करावे असे सुचवले. राष्ट्रसंतांची पुण्यतिथी अश्विन वद्य पंचमीला दरवर्षी साजरी केली जाते. यावर्षी २० ऑक्टोबर रोजी गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंतांचे लाखो अनुयायी त्यांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.**

**गाव विश्वाचा नकाशा ।**
**गावावरून देशाची परीक्षा ।**
**गावची भंगता अवदशा ।**
**येईल देशा ।। - ग्रामगीता**

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी सन १९३६ मध्ये अमरावती-नागपूर महामार्ग क्र.६ वर श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमाची पायाभरणी केली आणि येथूनच खऱ्या अर्थाने ग्रामविकासाच्या चळवळीस सुरुवात झाली. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व इथेच घडले. समाजसुधारणेच्या प्रत्येक पैलूचे त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केले. स्वत: प्रत्यक्ष काम करत समाजासाठी आदर्श जीवनाची आचारसंहिता असलेला ग्रामगीता हा ग्रंथ पूर्णत्वास नेऊन शेतकऱ्यास म्हणजेच ग्रामनाथास अर्पण केला. गाव हाच विश्वाचा नकाशा असून यावरून देश किती

## जनार्दन बोथे

प्रगत आहे याची परीक्षा होते. ग्रामगीतेत ग्रामाचे चिंतन करतांना ग्रामरक्षण, ग्रामशुद्धी, ग्रामनिर्माण, ग्रामआरोग्य आदी अध्यायातून संपूर्ण गावाचा विकास कसा साधता येईल याची ओवीबद्ध मांडणी केली आहे.

**ग्राम सुधारेचा मूलमंत्र ।**
**सज्जनांनी व्हावे एकत्र**
**संघटना हेची शक्तीचे सूत्र ।**
**ग्रामराज्य निर्माण करी ।। - ग्रामगीता.**

ग्रामविकासाचे कार्य करत त्या काळात राष्ट्रसंतांनी प्रत्यक्ष कृती करून, अनेक गावे आदर्श करून दाखवली. या कार्याची दखल घेत तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी आमगाव या आदर्श, (ता. पवनी, जि. भंडारा) गावाची प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले होते. शासनाच्या

आमगाव येथे तृतीय गांधी स्मृती दिनानिमित्त उपस्थित राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांसमवेत, लालबहादूर शास्त्री, राधादेवी गोयंका हे आमगाव गावाची पाहणी करताना. (छाया : सुधाकर यादव)



हागणदारीमुक्त गाव, आदर्श ग्राम, सामूहिक विवाह योजना, ग्रामस्वच्छता आदी अनेक योजना राष्ट्रसंतांनी त्या काळात प्रत्यक्षात उतरवल्या.

**कच्चा-माल मातीच्या भावे ।**
**तो पक्का होता चौपटीने घ्यावे ।**
**मग ग्रामजन कैसे सुखी व्हावे ? ।**
**पिकवोनीहि ते उपाशी ।। - ग्रामगीता**

राष्ट्रसंत आपल्या ग्रामगीतेत म्हणतात - शेतीतील माल जेव्हा बाजारात जातो तेव्हा त्याची अतिशय अल्पदरात विक्री होते. परंतु त्यावर कारखान्यात प्रक्रिया होऊन पक्क्या स्वरूपात येतो तेव्हा तोच माल चारपट भावाने ग्राहकांना मिळतो. त्यामुळे गावातील शेतकरी कसा सुखी होईल याची चिंता राष्ट्रसंतांनी सुरेखपणे मांडली आहे. संपूर्ण गाव सर्वांगीण उन्नत करावयाचे असल्यास, त्या गावातील उत्पादित कच्च्या मालावर त्याच गावात पक्रिया होऊन; त्याचे पक्क्या मालात रूपांतर करून, नंतरच तो बाजारपेठेत गेल्यास उत्पादक शेतकऱ्यास त्या कामाची योग्य किंमत मिळून; ग्राहकांनाही दर्जेदार माल प्राप्त होईल. ग्राम सुखी करावयाचे झाल्यास त्या गावातील पायाभूत समस्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे. आजच्या परिस्थितीत शेतीची उत्पादनक्षमता कमी झाल्याने शेतीपूरक उद्योगासह नैसर्गिक शेतीस चालना देणे गरजेचे वाटते. आर्थिकदृष्ट्या शेतकरी सक्षम झाल्यास आपोआप गाव सक्षम होईल. हे होत असताना संपूर्ण राष्ट्र त्या दिशेने वाटचाल करेल यात शंका नाही. कर्जबाजारीपणातून शेतकऱ्याला वर काढण्यासाठी ग्रामगीतेवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम राबवून गावातील श्रमजिवींना खऱ्या अर्थाने उद्योगशील बनवून साक्षर बनवणे आवश्यक आहे. जीवन शिक्षण मिळाल्यास जीवनाचे महत्त्व कळून त्याचे अर्थशास्त्रही सुदृढ होईल. आज यासाठी पुढाकार घेऊन याबाबत प्रत्यक्ष कार्य करणे आवश्यक वाटते.

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ साली झाला. संपूर्ण भारतात लाखो भाविकासह हजारो शाखा असलेल्या श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या माध्यमातून त्यांचा जन्मदिवस साजरा व्हावा ही संकल्पना पुढे आली. त्यावर खुद्द राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी ३० एप्रिल हा दिवस माझा जन्मदिवस म्हणून साजरा करू नये. त्याऐवजी ग्रामजयंती उत्सव म्हणून साजरा करावा असे सुचवले. त्यांच्या सूचनेस श्रद्धेने मान देत तेव्हापासून श्रीगुरुदेव सेवामंडळांच्या संपूर्ण शाखांमार्फत गावागावात ३० एप्रिल हा दिवस ग्रामजयंती म्हणून साजरा केला जातो. या ग्रामजयंतीच्या निमित्ताने गावातील संपूर्ण लोक एकत्रित येऊन ग्रामस्वच्छता करतात. विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आपल्या गावातच आयोजन करतात.

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी स्थापन केलेल्या व वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या गुरुकुंज आश्रमाच्या दिनचर्येचा अभ्यास केल्यास, प्रत्येकाचे गाव स्वयंपूर्ण होण्यास निश्चित प्रेरणा प्राप्त होईल. श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमाची निर्मितीच जणू इतर गावांना व प्रत्येक नागरिकास सक्षम जीवन जगण्याची प्रेरणा देणारे केंद्र व्हावे, याच उद्देशाने केली गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अतिशय सुंदर कार्यप्रणाली व संस्कारासोबतच जीवन जगण्याचे शिक्षण देणारे हे केंद्र पत्येक व्यक्तीस प्रेरणादायी ठरू शकते. या स्थळाचे महत्त्व लक्षात घेऊनच तत्कालीन राष्ट्रनेते डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. हेडगेवार, श्री. गोळवलकर गुरूजी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राधाकृष्णन, श्री. सी. डी. देशमुख, लोकनायक जयप्रकाश नारायण, ढेबर भाई, श्री गुलजारीलाल नंदा, इंदिरा गांधी, सरहद गांधी खान अब्दुल गफ्फार खान, आचार्य कृपलानी, स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य डॉ. आर्यनायकम, पद्श्री खांडेकर, माँऊट बैटन, क्रांतिसिंह नाना पाटील आदि नेत्यांनी गुरुकुंजला भेटी दिल्या. ही परंपरा आजही अनेक देशपातळीवरील नेत्यांच्या सततच्या भेटीने कायम आहे. या स्थळाचे महत्त्व तीर्थक्षेत्र म्हणूनच नाही तर हे एक अभ्यास केंद्र म्हणूनसुद्धा आहे. याच ठिकाणी असलेली वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांची महासमाधी जी त्यांच्याच कल्पनेतून साकार झाली, त्या महासमाधीतूनही समाजशिक्षणच प्राप्त व्हावे व हा अखंड झरा अविरत सुरू राहावा हीच राष्ट्रसंतांची इच्छा होती.

(लेखक अ.भा. श्रीगुरुदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रमचे सरचिटणीस आहेत.)

## तुझं गावच नाही का तीर्थ?



ग्रामातील नागरिकांना व युवकांना भजनाच्या माध्यमातून सांगतात की,

**अरे । रिकामा कशाला फिरतं ?**
**तुझं गावच नाही का तीर्थ ? ।।**
**गावी राहती गरीब उपवासी ।**
**अन्नसत्र लावितोसि काशी ।**
**हे दान नव्हे का व्यर्थ ? ।।**
**आपुल्या गावाची सेवा जो करतो ।**
**तोचि कीर्तीने, मानाने तरतो ।।**

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज ग्रामातील युवकांना संबोधून म्हणतात की, तू रिकामा कशाला फिरतोस, तुझे गावच तीर्थ आहे. आपल्या गावात गरीब उपाशी राहतात आणि आपण काशीला जाऊन अन्नदान करतो. हे दान व्यर्थ आहे. जो आपल्या गावाची सेवा करतो तो कीर्ती आणि मानाने तरून जातो. त्याचे जीवन सार्थकी लागते. अशा या महान ईश्वरीय अवताराने गावाच्या समृद्धीसाठी आपली तळमळ प्रत्येक शब्दात व्यक्त राष्ट्रसंतांनी केली. हे करीत असताना इतर प्रबोधनकारांसारखे भाषणे न देता सामान्य जनतेत मिसळून प्रत्यक्ष कार्य केले. याचा परिणाम म्हणून तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादांनी त्यांना राष्ट्रसंत या उपाधीने गौरवान्वित केले.



# राखण रान

**जंगलात चरण्यासाठी जाणाऱ्या गुराढोरांमुळेही जैवविविधतेचे नुकसान होते. जंगलातील नैसर्गिक संपदेचे जतन होण्यासाठी, कळसुबाई, हरिश्चंद्रगड परिसरातील परंपरागत पशुपालक आदिवासी जमाती तसा विचार करतात. या पट्ट्यातील ग्रामस्थ देवराईंचे संरक्षण-संवर्धन करतात. शिवाय खास गुरांच्या चाऱ्यासाठी असलेल्या ‘राखण राना’ची पिढ्यान्‌पिढ्या निगुतीने देखभाल करतात.**



सुनील लिमये

१ जुलै २०१६ रोजी महाराष्ट्र वन विभाग तसेच वनेतर विभागांनी आणि नागरिकांनी एका लोकचळवळीद्वारे महाराष्टात एकाच दिवशी वनजमिनीवरील १.५ कोटी रोपे लागवडीच्या उद्दिष्टापेक्षा जास्त म्हणजे २.२० कोटी रोपे लावली, तर वनेतर क्षेत्रात ५० लाखाच्या उद्दिष्टाऐवजी ६१ लाख रोपे लावून ही ‘हरित लोक चळवळ’ मोठ्या जोमाने सुरू केली आहे. कारण त्या एकाच दिवशी एकूण २ कोटी उद्दिष्टाऐवजी आपण सुमारे २.८१ कोटी रोपे लावली आहेत.

मागील एका अभ्यासानुसार असे दिसून आले आहे की, २००३ ते २०१४ या कालावधीमध्ये देशात निरनिराळ्या योजनांतर्गत सुमारे १९ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावर विविध रोपे लागवड करण्यात आली आहेत. परंतु त्या मानाने एकंदर ‘वन/वृक्षाच्छादनात’ वाढ झालेली नाही. पण येथे सर्वांनीच हे लक्षात ठेवायला पाहिजे की, फक्त वन विभागाने रोपे लावून वनक्षेत्रात अथवा एकंदर वृक्षाच्छादनात वाढ होणार नाही, तर त्या रोपांचे जतन करण्यासाठी लोक सहभाग अत्यंत जरूरी आहे. जेणेकरून रोपांची / वृक्षांची अवैध वृक्षतोड, रोपवन क्षेत्रात अवैध गुरे चराई व रोपे/वृक्ष तोडून अतिक्रमण करून रोपांचा नाश होणार नाही. म्हणूनच लोकचळवळीतून रोपवने करून ती जगवल्यास आपण लावलेल्या रोपांमुळेच रोप लागवडीच्या प्रमाणात नक्कीच वनक्षेत्र/वृक्षाच्छादन क्षेत्र वाढेल.

### मोठे आव्हान

स्थानिकांनी वनक्षेत्रात केलेल्या गुरे चराईमुळे रोपांची वाढ होत नाहीच; त्याशिवाय गुरांच्या खुरांमुळे ती जमीन कडक होऊन त्या जमिनीत नंतरही रोपे लावणे व वाढवणे शक्य होत नाही. त्यामुळे वन विभागासमोर ही अवैध गुरे चराई रोखणे एक फार मोठे आव्हान आहे. परंतु त्यातही एक आशेचा किरण नुकत्याच पाहणी केलेल्या अहमदनगर/ नाशिक जिल्ह्यातील कळसूबाई हरिश्चंद्रगड परिसरातील ‘चाळीस गावं डांगर’ नावाने ओळखल्या जाणाऱ्या विशेषत: अहमदनगरमधील अकोले तालुक्यातील काही गावांमधून दिसून आला. महादेव कोळी व ठाकर यांची प्रामुख्याने वस्ती असलेल्या ‘फोफसंडी’ या गावात काम करणाऱ्या लोकपंचायत या स्वयंसेवी संस्थेचे विजय सांबरे, सारंग पांडे व निसर्ग अभ्यासक जुई पेठे यांच्याबरोबर ते करत असलेल्या फोफसंडीमध्ये हे प्रामुख्याने दिसून आले. गवत व चारा प्रजातींचा अभ्यास व ‘डांगी’ जनावरांचे संवर्धन करण्यासाठीचे प्रयत्न या अनुषंगाने या परिसरातील यासाठी सुमारे १५ गावांत व ४० वाड्यांमध्ये खाजगी रानातील तसेच वनक्षेत्रातील संपदेचे स्थानिकांकडून खूप चांगल्या प्रकारे संवर्धन केले जात आहे. येथील आदिवासी हे विविध पद्धतीने येथील खालील जैवविविधतेचे संरक्षण करत आहेत. जशा गावानजीकच्या जंगलातील छोट्या मोठ्या देवराई स्थानिकांच्या सहकार्याने राखल्या जातात. तशाच प्रकारे येथील स्थानिक आपल्या रानाच्या काही भागाची गुरे चराईपासून संपूर्णत: काळजी घेऊन त्यातील गवताचे व चारा प्रजातीच्या वृक्षांचे संवर्धन

करून त्यांच्या उपजिविकेला आधार देणारी ही राने 'राखण राने' म्हणून सांभाळतात.

## परंपरा

अभयारण्य परिसरात राहणारा हा समाज मूलतः पशुपालक असून पिढ्यानपिढ्या स्थानिक डांगी वंशाच्या गुरांची जोपासना करत आहे. अभयारण्य परिसरात राहणारा हा समाज पशुपालक असल्याने त्यांच्या उपजिविकेशी निगडित असणाऱ्या परंपरा देखील गुरांशी जोडल्या गेलेल्या आहेत. 'राखण रान' ही देखील याच परंपरेतील एक टंचाईच्या काळात त्यांच्या गुरांसाठी वापरतात. सद्य:स्थितीत सर्वत्र होत असलेल्या अतिचराईच्या या पार्श्वभूमीवर राखणरानांकडे स्थानिक पातळीवर नामशेष होत चाललेल्या गवताच्या जातींनाही संरक्षण मिळाले आहे. ही राने निम्न सदाहरित जंगलामधील गवताळ वनस्पतींचे पारंपरिक बीजकोषांचे महत्त्वपूर्ण काम करत आहेत. थोडक्यात ही राखण राने गवताळ वनस्पतींच्या देवराया आहेत. ही पद्धत किमान वनक्षेत्राजवळच्या गावांमध्ये राबवण्यासाठी वन विभागाकडून आता निश्चितच प्रयत्न केले जाणार आहेत. कारण आहेत? याविषयीचा अभ्यास करण्यात येणार आहे. कारण या राखलेल्या रानांमध्ये खूप अशा चराऊ असलेल्या गवताच्या जाती राखल्या गेल्या आहेत.

पुणे विभागातील भिमाशंकर अभयारण्य परिसरात अवैध गुरे चराईचा प्रश्न उद्‌भवत असल्याने येथे स्थापन करण्यात आलेल्या ग्राम परिसर विकास समित्यांमार्फत हा प्रयोग राबवण्याचे प्रयत्न आता केले जाणार आहेत. आम्हाला खात्री आहे की, ग्रामस्थांना सुद्धा जेव्हा या राखण रानांचे महत्त्व कळेल, त्या वेळेस त्यांच्या गुरांसाठी तर फायदा होईलच;





आहे. येथील कुटुंबे त्यांच्या मालकीतील रानापैकी ठरावीक राने अथवा रानाचा भाग पिढ्यान्‌पिढ्यापासून गवताच्या उत्पन्नासाठी राखून ठेवतात. अशा राखलेल्या रानांमध्ये गावातील गुरांच्या मोकाट चराईवर परस्पर सामंजस्यातून निर्बंध घातले जातात. त्यामुळे तेथील वाढणाऱ्या गवताचे जीवनचक्र पूर्ण होऊन त्यापासून बीज प्रसार झाल्यानंतर स्थानिक लोक हे गवत चारा म्हणून कापतात. ते घरामध्ये किंवा जवळपासच्या गुहांमध्ये उन्हाळा व पावसाळ्याची सुरुवात या यामुळे स्थानिकांना उपजिविकेचे साधन तर मिळेलच, त्याचबरोबर गावाजवळच्या वृक्षाच्छादनाचे चांगल्या प्रकारे संरक्षण होऊन जनावरांसाठी उपयुक्त गवतही मोठ्या प्रमाणावर मिळेल, त्यासाठी कळसुबाई परिसरात किती क्षेत्रामध्ये ही राखणराने आहेत? त्यामुळे कोणत्या प्रजातींचे संवर्धन झाले आहे? ही राखण राने व जेथे गुरे चराई आहे, अशी राने यामधील वृक्षाच्छादन व गवतातील फरक काय? तसेच पिढ्यान्‌पिढ्या ही राखण राने कशा प्रकारे राखली गेली पण तेवढाच फायदा हा वन विभागाला, वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी वनविभाग जो अविरत प्रयत्न करत आहे. त्यासाठी नक्कीच होईल. त्यामुळे हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर लावण्यात आलेली रोपे व त्यामुळे वाढणारे वन / वृक्षाच्छादन हे कोणत्याही प्रकारचे भिंग घेऊन बघायची पाळी नक्की येणार नाही.

**(लेखक मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे येथे कार्यरत आहेत.)**

# संसदीय गुरुकुल

**नवी दिल्ली येथे संसदेच्या परिसरात संसदीय लोकशाहीबद्दल संपूर्ण जगाला माहिती देणारी बीपीएसटी (ब्युरो ऑफ पॉर्लमेंटरी स्टडी अॅण्ड ट्रेनिंग) अर्थात संसदीय अभ्यास आणि प्रशिक्षण संस्था कार्यरत आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारताची संविधानिक ओळख जागतिक स्तरावरील लोकशाही राष्ट्रांना ही संस्था करून देते.**

**प्रवीण टाके**

जगाचा नकाशा हळूहळू लोकशाही राष्ट्रांनी व्यापत आहे. लोकशाही मूल्यांवर विश्वास असणाऱ्या तत्ववेत्त्यांना संपूर्ण जगात लोकशाही स्थापन होण्याची स्वप्न पडत असून पुढच्या काही शतकामध्ये जगाची एक सार्वभौम संसद आणि आणि सर्व देश संघीय लोकशाहीमध्ये सदस्य राष्ट्र होतील, अशी आशा आहे. जगातील सर्व नागरिकांना समप्रमाणात मुलभूत गरजा मिळाव्या आणि त्यांच्यात बंधुभाव नांदावा असे स्वप्न जगाच्या लोकशाहीचे शुभचिंतन करणाऱ्यांना पडत आहे....हे सत्यात उतरवण्याचे कार्य जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीकडून अर्थात भारतीय संसदेकडून होत आहे. त्याचे दायित्व पार पाडण्याचे कार्य संसदीय अभ्यास आणि प्रशिक्षण संस्था करीत आहे.

नवी दिल्ली येथे संसद परिसरात या संस्थेचे कार्यालय आहे. लोकशाही बळकट करण्यासाठीचा अभ्यास, संशोधन आणि प्रशिक्षण याठिकाणी चालते. जगभरातील देशाचे प्रतिनिधी या ठिकाणी लोकशाही यंत्रणेचा अभ्यास करण्यासाठी येतात. त्यांना या ठिकाणी जागतिक लोकशाहीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारतीय लोकशाहीच्या अंतरंगाची माहिती करून दिली जाते. विभाजनाची जखम घेऊनच भारत स्वतंत्र झाला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर अनेकांनी भाषा, परंपरा, परिवेश, अस्मिता, धर्म, पंथ, मान्यता यामध्ये विखुरलेला





**संसदीय अभ्यास आणि प्रशिक्षण संस्थेतील एका अभ्यासक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी.**

हा देश एकत्र राहूच शकत नाही, अशी भविष्यवाणी केली गेली. मात्र भारतीय संसदेने या भीतीला खोटे ठरवले आणि सार्वत्रिक विकासाची हमी देणारी लोकशाही ६५ वर्षांनंतर जगातील प्रगल्भ लोकशाही म्हणून पुढे आली.

## बीपीएसटीची स्थापनेचा उद्देश काय?

संसदीय कार्य प्रणाली अधिक बळकट करायची असेल तर या यंत्रणेची जबाबदारी असणारा संसद सदस्य अर्थात खासदार यांना संसदीय लोकशाही प्रणालीची, परंपरेची आणि या परंपरेच्या उच्च मूल्यांची माहिती होणे आवश्यक आहे. यासाठी मूलतः या संस्थेची स्थापना झाली.

भारतीय लोकशाहीमध्ये खासदार हे जनतेचे प्रतिनिधी असतात. बऱ्याचवेळा किमान शैक्षणिक पात्रतेचे, अर्धशिक्षित प्रतिनिधी देखील निवडून येतात. मात्र तरीही प्रत्येक सदस्य सभागृहाच्या कामकाजात सहभागी होतातच. ही सहभागाची क्षमता निर्माण करण्याचे श्रेय बीपीएसटीला जाते. सभागृहातील प्रत्येक सदस्याला संसदेच्या पावित्र्याची, येथील परंपरेची आणि शिष्टाचाराची जाणीव करून दिली जाते. यासोबतच संसदेमध्ये बोलण्यासाठी आपला प्रश्न मांडण्यासाठीची पद्धत आणि त्यासाठी वापरायची संसदीय आयुधांची माहिती दिली जाते. लोकसभेचे ५४५ आणि राज्यसभेचे २४५ सदस्य कामकाजामध्ये सहभाग घेतात. या कामकाजातील जी सुसूत्रता आहे, त्याचे प्रशिक्षण या संस्थेमार्फतच दिले जाते.

## कोणाकोणाला प्रशिक्षण दिले जाते?

या संस्थेमार्फत नवनियुक्त खासदार, यासोबतच संसदेमध्ये कार्य करणारे विविध अधिकारी, साहाय्यभूत असणारी यंत्रणा, भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी, माध्यमात काम करणारे पत्रकार, विद्यापीठातील प्राध्यापक, विविध राज्यातील विधीमंडळ सचिवालयातील अधिकारी आदींना प्रशिक्षण देण्याचे कार्य बीपीएसटीमार्फत केले जाते. याशिवाय देशविदेशातील संसदीय मंडळाचे सदस्य, पत्रकार आणि विचारवंतांनाही याठिकाणी माहिती देण्याचे कार्य केले जाते.

## माध्यम प्रतिनिधींचे प्रशिक्षण

भारतीय लोकशाहीमध्ये माध्यमांना फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे संसदीय कार्यप्रणाली आणि तिच्या वृत्तांकनाची एक पद्धत रूढ झाली आहे. बीपीएसटी यासाठी नियमित कार्यशाळा आयोजित करते. संसदीय वृत्तसंकलनाचे प्रशिक्षण यामध्ये दिले जाते. वर्षातून एकदा किमान प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. याशिवाय लोकशाही प्रणाली आणि माध्यमाचे कर्तव्य यावर देशपातळीवर कार्यशाळा आयोजित केल्या जातात. देशविदेशातील तज्ज्ञ पत्रकार, दिग्गज राजकीय नेते, विविध स्तरातील मान्यवर या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करतात. संसदीय वृत्तांकनातील दर्जा राखण्यासाठी प्रयत्न करणारी बीपीएसटी ही महत्त्वपूर्ण संस्था म्हणून पुढे आली आहे.

## कार्यशाळा

महाविद्यालयीन जीवनातच संसदीय कार्यप्रणालीची माहिती व्हावी, यासाठी एका आठवड्याचा अभ्यासक्रम बीपीएसटीने तयार केला आहे. विद्यापीठ, महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांसाठी बीपीएसटी नियमित कार्यशाळा आयोजित करते. यासाठी विहित नमुन्यामध्ये रितसर अर्ज मागवले जातात. याच परिसरातील संग्रहालयात भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास दाखवला जातो.

## संसद व विधिमंडळ सचिवालय प्रशिक्षण

खासदार किंवा आमदार यांना संसदेमध्ये प्रभावी काम करता यावे, त्यामाध्यमातून देशातील सर्वसमावेशक प्रश्नाचे प्रतिनिधीत्व उमटावे, संसदीय आयुधांचा वापर करून त्यांना सुलभतेने प्रश्न मांडता यावे यासाठी संसद व विधिमंडळ सचिवालयासाठी प्रशिक्षण घेतले जाते. संसदेचे कोणते आयुध कशासाठी वापरण्यात येते यापासून कामकाजाची गतीशील नोंद, त्यांचे लेख तयार करणे, दस्तऐवज संग्रह करणे आदी विविध आघाड्यांवर अतिशय काटेकोर प्रशिक्षण दिले जाते. बीपीएसटीचे प्रमुख मार्गदर्शक लोकसभा अध्यक्ष असतात. वरिष्ठ आणि निष्णात संसदपटूला बीपीएसटीचे मानद सल्लागार नियुक्त केले जाते. भारतीय लोकशाहीच्या या प्रशिक्षण संस्थेच्या अधिक माहितीसाठी या संकेतस्थळावर http://bpst.nic.in/ संपर्क साधता येईल.

**(लेखक वरिष्ठ सहाय्यक संचालक आहेत.)**

# सर्वत्र 'लोकराज्य'

**भरपूर माहितीचा खजिना, उपयुक्त आणि प्रेरक माहिती यामुळे लोकराज्यच्या वर्गणीदारात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. ४ लाखांचा आकडा लोकराज्यने कधीच पार केला असून महाराष्ट्रामध्ये हा लोकहिताचा साहित्यठेवा जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहे. जिल्हा माहिती कार्यालयांकडून वर्गणी वाढीसाठी विविध अभिनव उपक्रम राबवले जात आहेत.**

### नागपूर

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर येथील विभागीय माहिती केंद्रात विविध स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन व अभ्यासिका सुरू केल्यामुळे विविध स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांना लोकराज्य क्लबच्या माध्यमातून सुविधा निर्माण झाली आहे. स्पर्धा परीक्षा व अभ्यासिकेसाठी १६० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यांना संदर्भ ग्रंथासह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लोकराज्य क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या या उपक्रमाचा लाभ ग्रामीण भागातील विशेषत: गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना होत आहे.


स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व अभ्यासिकेचे उद्घाटन नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. माहिती केंद्राचे जिल्हा माहिती अधिकारी अनिल गडेकर यांच्या पुढाकाराने माहिती केंद्रात स्पर्धा परीक्षासाठी १६० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत आहे.



**नागपूर-लोकराज्य क्लब अभ्यासिकेतील विद्यार्थी.**

### उस्मानाबाद

शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात जनहितार्थ कार्य केले जाते. माहिती तंत्रज्ञानाच्या विस्फोटात आता सामान्य जनतेलाही मुंबईत काय घडले हे कळायला काही क्षणांचाही वेळ लागत नाही. मात्र अधिकृत माहिती देण्याचे कार्य सुरू असते ते फक्त लोकराज्यमध्येच. गेल्या काही महिन्यात लोकराज्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हास्तरावर काही प्रयत्न झाले. यामध्ये उस्मानाबाद जिल्ह्याने लक्ष वेधून घेतले.




राज्यातील पहिले लोकराज्यग्राम, पहिली लोकराज्यशाळा, पहिले लोकराज्य शासकीय कृषी महाविद्यालय,पहिले लोकराज्य जीवन विमा योजना कार्यालय, पहिले लोकराज्य कृषी विज्ञान केंद्र, पहिली लोकराज्य महिला सामाजिक संस्था, पहिली लोकराज्य मोबाइल रिपेअरिंग बॅच, पहिला लोकराज्य शेतकरी प्रशिक्षण वर्ग, पहिले लोकराज्य व्यसनमुक्ती केंद्र, अशा वैविध्यपूर्ण पध्दतीने लोकराज्य मासिकाचा प्रचार व प्रसार उस्मानाबाद जिल्हयात जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने धडाक्यात सुरू आहे. शासनाच्या अशा या प्रयत्नांना उस्मानाबाद येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच नितीन काळे यांनी स्वत:च्या वाढदिवसाचे औचित्य साधून १०० सामाजिक कार्यकर्त्यांना व पक्ष कार्यकर्त्यांना लोकराज्य मासिकाचे वार्षिक सभासदत्व भेट म्हणून दिले आहे. त्यांनी नुकताच १०० सभासदांच्या वार्षिक सभासदत्व शुल्काचा धनादेश जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांच्याकडे सुपुर्द केला. उस्मानाबाद जिल्ह्यात या वर्षातील पहिले लोकराज्यग्राम बनण्याचा बहुमान उस्मानाबाद जिल्ह्यातील दारफळ गावाने मिळवला आहे.

### मुंबई

मुंबईमध्ये या वर्षात लोकराज्य वाढीसाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत. यासाठी



अंजूमन-ए-इस्लाम या शिक्षण संस्थेत उर्दू लोकराज्यच्या ऑक्टोबर २०१६चे प्रकाशन झाले. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक खालिद कैसर, अंजूमन-ए-इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. झहीर काजी, ज्येष्ठ निवृत्त सनदी अधिकारी शहजाद हुसेन, उर्दू बुऱ्हाणी महाविद्यालयाच्या उर्दू विभागाचे प्रमुख डॉ. कासीम ईमाम तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ उपस्थित होते.

**महाराष्ट्रात सध्या जिल्ह्याजिल्ह्यात उर्दू लोकराज्यच्या माध्यमातून अल्पसंख्याक समुदायापर्यंत शासकीय योजना पोहोचवण्याची मोहीम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत राबवली जात आहे. या अनुषंगाने ऑक्टोबर २०१६च्या उर्दू लोकराज्यचे प्रकाशन नुकतेच अंजुमन-ए-इस्लाम या संस्थेत मुंबईत पार पडले. यानिमित्त 'आसमान और भी है' हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन तज्ज्ञांद्वारे करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली.**






मंत्रालयात नियमितरीत्या लोकराज्यचा स्टॉल लावला जातो. याशिवाय विविध शासकीय कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकराज्यचे स्टॉल लावले जात आहेत. पोलीस महासंचालक आणि मुंबई पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात लोकराज्य विक्रीचा स्टॉल लावण्यात आला. त्यास अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला.

**अनिल गडेकर, माहिती अधिकारी, नागपूर**
**मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद आणि टीम लोकराज्य**

# ईमेलद्वारे...

## वाचनीय

लोकराज्य ऑक्टोबर २०१६चा अंक माहितीपूर्ण आहे. शासनाच्या विविध योजना व निर्णयांची संपूर्ण माहिती या अंकात वाचायला मिळाली.

**- अंकिता गावंडे,** मलकापूर, बुलढाणा

## उपयुक्त माहिती

'लोकराज्य'च्या 'आपले पोलीस' या विशेषांकातून भरपूर नवीन माहिती मिळाली. 'पोलीस अधीक्षक आता विभाग प्रमुख' या मथळ्याखाली दिलेली माहिती एकदम नवीन आहे. 'सायबर डिफेमेशन'ची माहिती सर्वांनाच उपयुक्त आहे. 'पोलीस दलात कसे याल' या लेखातील माहिती उपयुक्त आहे. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायला हवी.

- **सुषमा शिरभाते**, यवतमाळ

## माहितीपूर्ण

लोकराज्यचे सर्वच अंक वाचनीय असतात. या अंकात माहितीपूर्ण लेखांसोबतच मनाला आठवणीत रमवणारे लेखही वाचायला मिळतात.

- **सायली सुर्वे,** मुंबई

## माहितीस्रोत


लोकराज्य मासिक हे माहितीचे स्रोत आहे. नवी उमेद आणि प्रेरणा देणारे महाराष्ट्राचे मुखपत्र असलेल्या लोकराज्यच्या सर्वच अंकांचे संदर्भमूल्य अधिक असते. देशात महाराष्ट्र अग्रेसर आहे. त्याचे वास्तविक चित्रण मासिकातून स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्याची खरी ओळख मासिकातून होते.

- **मंगल इंगोले,** जयपुर, वाशिम

## ज्ञानात भर

मी लोकराज्यचा नियमित वाचक आहे. या मासिकातून सर्वच विषयांना स्पर्श केला जात असल्याने माझ्या ज्ञानात खूप भर पडत आहे. माझी आपणांस एक विनंती आहे की आपण या मासिकात संपूर्ण महिन्यातील महत्त्वाच्या घडामोडी द्याव्यात. याचा आम्हा मुलांना स्पर्धा परीक्षेत नक्की फायदा होईल.

**- महेश पगार,** कळवण, जि. नाशिक




## मार्गदर्शक

सप्टेंबर २०१६ चा अंक हा आम्हा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खूपच मोलाचा ठरला. विशेषतः पोलीस दलात काम करण्याची इच्छा असणाऱ्या माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना हा अंक संग्रही ठेवावा असाच आहे.

**- धनराज बेलवाले,** पुणे

## प्रेरणादायी

लोकराज्यचे सर्वच अंक आकर्षक व बोलके आणि वाचनीय असतात. प्रत्येक अंक माहितीचा खजिना घेऊन वाचकांच्या ज्ञानात भर घालणारा असतो. प्रेरणा सदर तरुणवर्गासाठी अत्यंत प्रेरणादायी व नवी उमेद देणारे आहे.

- **वैशाली आहेर**, वसई-विरार, जि.पालघर

## संग्राह्य

लोकराज्य या मासिकाची मी चातकाप्रमाणे वाट पाहतो. स्वच्छ, सुंदर, समृद्ध, सर्वसमावेशक, संवेदनशील असा हा अंक असतो. उमेद आणि प्रेरणा, मुकाबला दुष्काळाशी यासारख्या लेखामधून शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळाली. पुढील अंकास माझ्या शुभेच्छा.

- **सतीश नाईक,** आंबोडा, बुलडाणा

## सर्वसमावेशक

लोकराज्यचा प्रत्येक अंक सर्वसमावेशक असतो. अंकातील भ्रमंती, गडकिल्ले, निरामय, संस्कृती या सदरांमधून उपयुक्त माहिती मिळते. प्रेरणा हे सदर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरते.

- **शैलेंद्र चौधरी पाटील,** सोलापूर

### आपली पत्रे मिळाली

**वाय. पी. गुरव** (लांजा),
**प्रमोद भगवान सरोदे** (जळगाव),
**सुभाष नखाते** (नौपाडा, ठाणे),
**राजेश हिवाळे** (नाशिक),
**विनोद मेश्राम** (भंडारा),
**बळीराम कांबळे** (डोंगरज चाकूर, जि-लातूर),
**मारुती व्हॅनखंडे** (कानडवाडी, सांगली),
**दे. ना. जोशी** (असोली, चिखली-बुलडाणा),
**ग्वालंदास आचार्य** (हिंगणघाट).

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

### वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# ‘महाराष्ट्र माझा’ या छायाचित्र स्पर्धेतील लक्षवेधी छायाचित्रे


छायाचित्रकार: सुमित अहिरे


छायाचित्रकार: आदित्य येवले


छायाचित्रकार: राकेश वाटेकर


छायाचित्रकार: उमेश मोहोळकर


छायाचित्रकार: भिलाजी जिरे


छायाचित्रकार: महेंद्र गजभिये

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th November 2016
Date of Publication : 10th of every Month

# नगरपरिषदा/ नगरपंचायती सार्वत्रिक निवडणुका- २०१६

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

**परीक्षेत एक गुण**
**तुमचं आयुष्य बदलतो**

**लोकशाहीमध्ये तुमचं एक मत**
**देश बदलतो...!**



मतदानाचा अधिकार गाजवा!
लोकशाही बळकट बनवा!!

## मतदान करायला विसरु नका !

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति/TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक ब्रिजेश सिंह, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह